डॉ. मनोहर सुरवाडे



जन्मपत्र

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

जन्मपत्र

(कादंबरी)

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

जन्मपत्र

लेखक: डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर जि.
जळगाव,४२५५०३
वैशाली नगर, फैजपूर, जि. जळगाव,
मोबाइल ९९७०११७४३९
ई-मेल : msurwade09@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : २० जून २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २४०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. मनोहर झगडू सुरवाडे - ९९७०११७४३९

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

प्राध्यापक, विभागप्रमुख व उपप्राचार्य

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर

- **<u>सामाजिक व शैक्षणिक कार्य</u>**

१. **पीएचडी :** 'मराठवाड्यातील कथाकारांचे प्रादेशिक वेगळेपण', स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २००३

२. संशोधन प्रकल्प

२.१ - समकालीन दलित कथेतील सामाजिक जाणिवा, यु.जी.सी., पुणे विभाग,२००४

२.२ - भटक्या विमुक्तांच्या मराठी साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास, यु.जी.सी., नवी दिल्ली, २०१४

३. शोधनिबंध

३.१ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : अक्षरवैदर्भी, ऑक्टो-नोंव्हे. २०१०

३.२ - दलितेतर लेखकांच्या कथांमधील दलित जीवनदर्शन : अस्मितादर्श,एमेजू, २०१०

३.३ - मराठवाड्याच्या कथांतील आशयसूत्रे : अनुबंध, एप्रिल, २०११

३.४ - आदिवासी काव्यातील सामाजिक आणि वाङ्मयीन जाणिवा : अक्षरवैदर्भी, मे, २०११

३.५ - मराठवाड्याच्या कथांतील दुष्काळविषयक आशयसूत्रे : आत्मप्रत्यय, ऑक्टो- डिसे., २०११

३.६ - संत साहित्यातील दुष्काळाचे संदर्भ : पंचधारा, ऑक्टो-डिसे,२०११

३.७ -आदिवासी काव्यातील आंबेडकरी विचारदर्शन :अस्मितादर्श,२०१२

३.८-स्त्रियांचे सक्षमीकरण आणि त्यांचे अधिकार:प्लाटीनम,एप्रिल, २०१२

३.९-दलित चळवळ आणि आत्मकथन: एक अनुबंध:आधार,सप्टे.२०१२

३.१० - साहित्यातील गांधीविचार : अक्षरवैदर्भी, नोव्हें २०१२

३.११- उन्नती चौधरी लिखित 'स्त्रीत्त्वाची सूत्रे' : स्त्रीस्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा शोध घेणारा नाविन्यपूर्ण काव्याविष्कार, अक्षरवैदर्भी दिवाळी विशेषांक, २०२४

३.१२- नव्वदोत्तर ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा **:** Conference Sovenier**,** दारापूर, २०११

४. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर : एकूण -२१

५. संपादित पुस्तकांतील लेख

५.१'राघववेळ आणि तणकट' या कादंबऱ्यातील ग्रामीणता:ग्रंथवेद,२०१२

५.२ - स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी कादंबरीतील मानवतावादी दृष्टिकोन : मराठी साहित्यातील मानवतावाद, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२

५.३ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : १९८० नंतरचे मराठी साहित्य, ----२०१२

५.४ 'गावरंग' माणदेशी माणसांची बदलती जीवनशैली : कृष्णाक्षर,२०१५

५.५- लोकमान्य टिळक यांच्या लेखनातील दुष्काळविषयक संदर्भ आणि दृष्टिकोन : मराठी साहित्य आणि आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन,---- २०१६

५.६- १९७५ नंतरच्या मराठी नाटकातील आशय आणि पात्रचित्रणास पूरक ठरलेल्या भौतिक घटकांचे अन्वयार्थ : १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना, --- २०१७

६ - प्रकाशित पुस्तके

- **कवितासंग्रह**

१- षटकार : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

२- पुरुषनामा : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

३- तो-ती-ते : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

४-पुरुषाच्या व्यथा : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

- **कथासंग्रह**

१. खूळ : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

२. शापित : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

- **वैचारिक गद्य**

१. डिजिटल युगातील माणूस : ई-साहित्य प्रतिष्ठान, ठाणे, २०२६

- **संपादन**

१. नकलाकार दिलीप अलोणे गौरवग्रंथ : ईसाहित्य प्रतिष्ठान, ठाणे,२०२५

- **साहित्य : समीक्षा व संशोधनपर ग्रंथ**

१ - समकालीन दलित कथा : हार्मिस प्रकाशन, पुणे, २००८

२ - १९८० नंतरची ग्रामीण कथा : बळीवंश प्रकाशन, नांदेड, २०१०

३ - साठोत्तरी साहित्य प्रवाह: विविधता आणि वेगळेपण : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

४ - स्वातंत्र्यपूर्व मराठी साहित्यातील सामाजिक संदर्भ : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

५ - ग्रामीण समाज आणि कथासाहित्य:सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

६ - आदिवासी साहित्य प्रवाह : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

७ - दलित आत्मकथा आणि कथा : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

८ - ग्रामीण साहित्यप्रकार : स्वरूप आणि चिकित्सा, सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

९ - मराठी ग्रामीण कथा- लेखिकांचे योगदान : स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,२०१३

१०- उन्नती चौधरी लिखित-'साहित्य आणि समाजशास्त्रीय संशोधन' (सहलेखक) : प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०२३

७. पीएच.डी. मार्गदर्शक : कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

८. संशोधन विद्यार्थी : १२ विद्यार्थ्यांना Ph.D. प्राप्त

९. विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. प्रबंधांचे बहि:स्थ परीक्षक

१०. सामाजिक व शैक्षणिक प्रबोधनपर व्याख्याने

११. जळगाव विद्यापीठस्तरीय विविध समित्यांवर शैक्षणिक कार्य

पुरस्कार -

१- महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, २००९

२- भीमरत्न पुरस्कार, सम्राट फाउंडेशन, सावदा, जि. जळगाव,२०१३

३- १९८० नंतरची ग्रामीण कथा, या शोधग्रंथास तीन राज्यस्तरीय पुरस्कार,२०११

४- आदर्श शिक्षक पुरस्कार, युनियन बँक ऑफ इंडिया, २०१०

५- टीचर एक्सलंट अवार्ड, लोकमत वृत्तपत्र समूह, २०२५

६. विद्याभूषण, वार्ता फौंडेशन वार्ताहर संघ,फैजपूर,२०२६

उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीसाठी –

१. आशीर्वाद पुरस्कार,वंदना प्रकाशन, मुंबई ,२०११

२. भि.ग.रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार,२०११

*** *** ***

अर्पण

आय. टी. क्षेत्रामध्ये करिअर करतांना

जीवनाकडे भोगवादी दृष्टीने न पाहता

प्रत्येक वेळी स्वतःला विकसित करीत जाणाऱ्या

ध्येयवादी तरुणांना - - - - -

मनोगत

सगळ्यांना मृत्यूपत्र माहित आहे; पण हे एका प्रातिनिधिक तरुणाचे जन्मपत्र आहे. कोणाला काही देण्याच्या हेतूने एखादी व्यक्ती मृत्यूपूर्वी एखाद्याच्या किंवा काहींच्या नावाने लेखी मजकूर लिहून ठेवून जातो, ते मृत्यूपत्र असते. त्या उलट एकाने स्वतःचे जीवन सावरून धरतांना काही गोष्टी पत्ररूपाने सांगून ठेवलेल्या आहेत. एकेका पत्रामध्ये त्याच्या मनाची आणि भावनांची संपत्ती आहे. कारण आजच्या काळात माणसे जिवंत असूनही मेल्यासारखे जगताहेत, त्यांना आपलं मरण आपल्या डोळ्यांना दिसत नसतं. जिवंतपणी वाट्याला आलेल्या मरणातून जीवनाला उभारी देण्यासाठी एक नवा जन्म घ्यावा लागतो, हेही त्यांना कळत नाही. ते नेणिवेत जगून दुःखाला उगाळत बसतात; जन्म-पत्रातील मॅनेजर मात्र वेगळा आहे. त्याच्या नव्या जन्माच्या निमित्ताने त्याने त्याची कहाणी सांगितली आहे.

जीवनात तुटलेला, फाटलेला उदासीन माणूस, त्याचा तोच जन्मावा लागतो, याचे भान त्याला आहे; म्हणून त्याने पत्राच्या रुपाने त्याच्या जन्माची कहाणी तिच्या नावाने केलेली आहे. त्याचा जन्म असा-तसा नसतो. तो फार आगळावेगळा असतो. स्वतः स्वतःसाठी केलेला तो स्वीकार असतो. कशाची अपेक्षा न करता सारं सोडून अंतर्मुख होणारा आणि स्वतःला ओळखणारा असा तो आहे. पकडून ठेवण्याने दुःखाशिवाय हाती काही लागत नाही, याची जाणीव त्याला होते. आजच्या काळात कोणी कोणाचा स्वीकार करत नाही, हे सत्य त्याला जाणवते. अशावेळी स्वतःच्या मनाला दिशा देणं फार आवश्यक असतं आणि इथे दिशा देण्यासाठी कोणी उपलब्ध असेलच, याची काही खात्री देता येत नाही; म्हणून तो स्वतः आतमध्ये डोकावून उलट-सुलट विचार करतो.

त्यातून त्याला उमगते ते खरे जगण्याचे सूत्र. ते म्हणजे स्वतःशिवाय इथे आपल्या सोबत कोणीच नसतं; म्हणून स्वतःला विसरू नये. त्यासाठी स्वतःच स्वतःचे मार्गदर्शन करणे फार महत्त्वाचे असते. हेही त्याला कळून चुकते.

कोणी म्हणेल की, इथे पैसे घेऊन मार्गदर्शन करणारे, उपदेश करणारे समुपदेशक आहेतच की, तर तेही खरंच आहे; पण समुपदेशन करणारे प्रोफेशनल असतात. पैसे द्यावे लागतात. शिवाय दुसऱ्याच्या सांगण्याचा आपल्या मनावर फारसा परिणाम होत नाही; आपला खरा समुपदेशक असतो, तो आपला आत्मा. हा आत्मा अध्यात्मिक नसतो किंवा कुठल्या श्रद्धेतून आलेला नसतो, तर ते एक अबोध मन आहे. या अबोध मनाला जागृत केले किंवा त्याला विचारले की, ते बोध मनाला नियंत्रित करू शकते आणि इकडेतिकडे, वाकडतिकडं फिरणाऱ्या चेतन मनाला ठिकाणावर आणू शकते. आतील अवचेतन मन प्रोफेशनल नसते किंवा त्याला पैशांची गरज नसते. तेव्हा आपणच आपले ठरवायचे असते. अबोध मनाला एक मार्गदर्शक किंवा समुपदेशक म्हणून प्रशिक्षित कसे करायचे? तसे केले तर ते मनाला योग्य दिशा देऊ शकते. असे झाले तर जे जिवंत असूनही रोज मरणाचे अनुभव घेतात, त्यांचा मरता मरताच नवा जन्म होतो. हा पुनःर्जन्म नसतो, तर जीवनाला मिळालेली एक नवी दिशा असते आणि ही दिशा स्पष्ट होण्यासाठीच एका मनाने दुसऱ्या मनाला हे पत्ररूपाने केलेले मार्गदर्शन आहे. तिला समोर ठेऊन एका मनाने दुसऱ्या मनाशी साधलेला तो संवाद आहे. त्यासाठी त्याला काही विचारवंत, दार्शनिक व मानसतज्ञ यांचा आधार त्याने घेतला आहे.

'जन्म-पत्र' म्हणजे आयटी क्षेत्रात करियर करणाऱ्या तरुणाची एकतर्फी प्रेमकथा आहे. त्यात समृद्ध जीवनाचे सिद्धांत आणि विचार गुंफलेले आहेत. विचारवंत आणि दार्शनिक यांच्या विचारांच्या आधारे तो पत्ररुपाने त्याच्या सोबतच्या फ्रेशरला त्याच्या भावना व्यक्त करून सांगतो. फ्रेशर म्हणजे कंपनीत

नव्याने शिकाऊ असलेली नोकरदार व्यक्ती. अशीच ती एक आहे. तिची एका मॅनेजरच्या प्रोजेक्ट टीममध्ये निवड होऊन त्याच्या सोबत सहकारी म्हणून काम करते, अशी गोष्ट यात असून 'ती आणि तो' यांच्यातील हे भावसंबंध आहेत. ते अतूट का होऊ शकले नाही?, याचे कार्यकारणभाव या पत्रांमध्ये आहेत.

सध्याच्या काळात करीअरीस्ट म्हणून धडपडणाऱ्या स्त्री-पुरुषांचे एका ठिकाणी काम करणे आणि दोघे एकमेकांमध्ये गुंतून जाणे किंवा एकतर्फी प्रेम होणे, या गोष्टी मोठ्या शहरांमध्ये फार घडत आहेत. खेड्यातून आलेली ट्रॅडिशनल वृत्तीची धूर्त तरुणी 'फ्रेशर' म्हणून प्रोजेक्ट टीममध्ये काम करतांना प्रोजेक्ट मॅनेजरकडून बरेच सहकार्य घेते. प्रमोशननंतर त्याच्यापासून दूर जाते. तेव्हा तिच्याविषयी त्याचा प्रेमभंग आणि भ्रम-निराश होतो. हे त्याने तिला लिहिलेल्या जन्म-पत्रांमध्ये सांगितला आहे. एका मजबूत व आगळ्यावेगळ्या तरुणाची ही एकतर्फी प्रेमाची काल्पनिक गोष्ट आहे. प्रेमभंगाने स्वतःचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ न देता जीवनाला समृद्धपणे आकार देणाऱ्या मजबूत तरुणाची मानसिकताही इथे स्पष्ट केली आहे.

आयुष्यातील व्यथा-वेदनांनी स्वतःचे आयुष्य संपू न देता, अपेक्षाभंगाचे व त्यातून आलेल्या दुःखाचे ऊर्जेत रूपांतर करणारा, समृद्ध आयुष्य बनविणारा तरुण, म्हणजे त्याचा झालेला नवा जन्म आणि त्याविषयी त्याने तिच्याबाबत पत्ररुपाने व्यक्त केलेल्या भावना, म्हणजे त्याचे जन्म-पत्र आहे. इथे मृत्यूपत्र टाळणारा तरुण फार मजबूत वाटतो. वाचक-रसिक त्याच्या भावनांचा स्वीकार करतील अशी, अपेक्षा आहे.

मा. सुनीळ सामंत सर आणि त्यांची ई-साहित्याची टीम यांनी दिलेल्या प्रतिसादामुळे नेहमीच नवीन काही तरी लिहिण्याचे बळ आणि प्रोत्साहन मिळत गेले आहे. त्यामुळे त्या सर्वांचे आभार ----

जन्मपत्र

(कादंबरी)

या कथानकातील सर्व पात्रे व प्रसंग काल्पनिक आहेत. कोणत्याही संस्थेतील कोणा पात्रांशी वा प्रसंगांशी यांचे साम्य आढळल्यास तो योगायोग आहे असे समजावे.

१-

प्रिय फ्रेशर

तुझी आठवण झाली आणि मला सुनील सावंत यांची कविता आठवली. ती कविता तुला फॉरवर्ड करण्याआधी तू बोललेले शब्द माझ्या कानात गुंजत आहेत. त्या शब्दातील आशय तुझ्यासाठी होता की, माझ्यासाठी? हे मला कळलं नाही; पण कळलं एवढंच की, तुझं म्हणणं खरं होतं, "अंधारात राहू नका सर.....अडकून पडू नका सर" तुझ्या या शब्दांनी माझी ती रात्र वैरी झाली होती आणि ओव्हर थिंकिंग करीत गेल्याने झोप उडाली होती. शेवटी लक्षात आला होता, त्या कवितेतील आशय. त्यात कवी असं म्हणतो की,

जिथे मी गुंतलो तिथे, माझ्यात कुणी गुंतले नव्हते
जिथे मी रंगलो तिथे, माझ्यात कुणी रंगले नव्हते !
जिथे मी पेरले तिथे, अंकुरले बीज मजसाठी नव्हते
इथे या माणसांच्या जगी, माणुसकीचे दान कणभरही नव्हते!
जिथे मी जन्मलो तिथे, जन्मालाही मरण नव्हते
पैशांच्या या दुनियेत, मनातील भावनेला अंतरंग नव्हते !
जिथे प्रेम वाटले तिथे, मजसाठी रडणारे कुणी नव्हते

बघ, अशीच असते ही माणसांची दुनिया. या दुनियेत स्वतःला हरवून घेणं, हा आपला दोष ठरतो आणि दुनियेला ओळखून त्या पद्धतीने चालत

राहणं, यातच शहाणपणा असतो; पण आमच्यासारख्या साध्या माणसांच्या ते उशिरा लक्षात येतं. तोपर्यंत डोक्यावरून पाणी फिरलेलं असतं; म्हणून तर जीव गुदमरतो. कारण 'दगडा खालचा हात' निघाला की, दगडाला बाजूला लोटून दिले जाते. तसं माणसं माणसाला 'कामापुरता मामा' बनवून त्याला दुर्लक्षित करतात. हेच सांगायचं होतं तुला.

आणखी एक सांगायचं आहे. तू सुरुवातीला आली तेव्हा तू मला पसंत करावे; म्हणून तुला खूप काही गोष्टी सांगितल्या व शिकविल्या होत्या; परंतु मी तुला पसंत नव्हतो. माझं काम तेवढं तुला आवडत होतं. मी तुझ्यात अडकलो आहे, हे तू ओळखलं आणि नियंत्रणात ठेवून मला हेतुपूर्वक हाताळलं. 'प्रामाणिक रहा, पारदर्शक बना, स्वतःला उघड करा, हे माणूस म्हणून मी शिकलो होतो आणि तू बाई म्हणून एकदम गूढरम्य राहिली होती. वरतून म्हणायची 'बाईला कधी समजून घेता येत नाही.' कसं समजणार? तू मोकळी कधी झालीच नव्हती. त्यामुळे तू शक्तिशाली ठरली. माझ्यात गोंधळ निर्माण करून दिशा बदलत गेली आणि शेवटी अदृश्य झाली. नंतर मला तुझे हस्तक्षेप, कटकारस्थान आणि तू केलेला विश्वासघात जाणवू लागला होता. तू कोल्हयासारखी चतुर राहून अज्ञात बनली आणि तुझे रहस्य मला आकर्षित करत गेले. मी मात्र उघड होऊन सहज उपलब्ध होत गेलो आणि तू माझी कमजोरी ओळखून मला खेळवत राहिली.

तुला खुश ठेवण्याचा प्रयत्न करीत असतांना तू मला खूप वापरून घेतलं. त्यासाठी तू मित्रत्त्वाचं नातं जोडलं. ते काही शिकण्यासाठी, काही वापरण्यासाठी, काही सोडण्यासाठी होतं, हे तू दूर गेल्यानंतर मला कळलं. खरं

सांगू, बाई म्हणून तुझा स्वभाव गूढ वलये निर्माण करणारा आहे, असं म्हणून मनावर घेत नव्हतो. तुला सावरून धरत होतो आणि तुझ्या करियरला चार चाँद लावत होतो; पण शेवटी 'बाई ती बाईच.'

काही असो, कुठेही असो. तू तुझ्या स्वभावामध्ये बदल कर आणि एक वेगळे आयुष्य जगण्याची दिशा ठरव, असंही आता म्हणावंसं वाटत नाही. कारण 'जित्याची खोड मेल्याशिवाय' जात नाही म्हणतात; पण बदलल्याशिवाय तुला इथे मणभर, मनासारखा आनंद मिळणार नाही आणि ज्या स्वर्गाची कल्पना तू केली असेल, त्या स्वर्गाची अनुभूती येणार नाही. कारण परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. जो तो नियम स्वीकारत नाही, त्याला आयुष्यात सुख-समाधान लाभत नाही. असो, तुला माझी आठवण असो की नसो, मला काही फरक पडणार नाही. कारण आता मी पुढे आणि फक्त पुढेच जायचे ठरविले आहे. थांबण्यात अर्थ नाही वाटत. इथे गमावण्यासारखं काही नसतं. कारण आपण काही घेऊन आलेलो नसतो. मिळविण्यासारखं बरंच काही असतं. त्यासाठी एकाच्या भरोशावर कधी बसायचा नसतं, हेही मला कळून चुकले आहे.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२-

प्रिय फ्रेशर

मला आठवतो, आपल्या अचानक भेटीचा तो पहिला दिवस. तुझा टेक्निकल इंटरव्ह्यू चांगला झाला होता. तुझ्यात काही चांगले स्कीलही जाणवले होते; पण समस्या सोडवण्याची क्षमता आणि संवाद कौशल्ये तेवढे खास नव्हते, तरीही तुझी मी निवड केली होती. टीम मॅनेजर म्हणून मला तो अधिकार होता. तुझे तांत्रिक ज्ञान, कौशल्य आणि कामासाठी योग्य आहे की नाही, हे काही पाहिले नव्हते. कारण त्या दिवशी तुझं सुंदर आणि आकर्षक रूप क्षणभरातल्या नजरा-नजरेतून समुद्र-तळाशी मोती असलेल्या शिंपल्यासारखं मनात रुतून बसलेलं होतं. तुझी मोहीत करणारी नजर आणि चाहत दर्शविणारा चेहरा, हे फार लोभस आणि आकर्षक वाटलं होतं. तुझ्या नजरेतील गंध वेडावून गेला होता; म्हणून तुझ्या सहवासासाठी आतुरलो होतो. तुला मिळविण्यासाठी तुझे सिलेक्शन केले होते.

तुला स्वावलंबी बनविण्यासाठी अधिक महत्त्वाची व मोठी कामे दिली होती. त्यासाठी तुला खूप मदतही केली होती. तेव्हा तू फार मोकळी व खुश वाटली होती. खूप जवळ आली होती. त्यामुळे तू आनंदी जीवनाचा एक भाग वाटायला लागली होती; पण तुला सांगू, तो माझा केवळ भ्रम ठरला आणि शेवटी कळलं की, तुझ्या मनातल्या कप्प्यात जे काही रुतून बसलेले होते, ते शिंपले नव्हते, तर तो मनात साचलेला परंपरेचा गाळ होता. आता हा गाळ काढायचा की, त्यात फसून गुदमरून मरायचं? हा प्रश्न माझ्या डोळ्यासमोर नेहमीच यायचा आणि शेवटी मी ठरवलं की, कोणत्याही गोष्टींमध्ये अडकून

पडणं, म्हणजे आपणच आपल्या हातून गळ्याला फास लावून घेण्यासारखं आहे. बरेच दिवस याच विचारात गेले आणि एकदा साक्षात्कार झाला की, 'नाही. पकडण्याला अर्थ नसतो. सोडून देणं हेच आपल्या नव्या जन्माची तयारी असते आणि मी तेच करायला लागलो; म्हणून तू गैरसमज करून घेऊ नकोस.

अजूनही तुझ्यासाठी मी दोन दरवाजे उघडे ठेवले आहे. एक माझ्या घराचा आणि दुसरा माझ्या हृदयाचा; पण तुझं परत येणं, हे पूर्वीसारखं असेलच याविषयी माझं मन साशंक आहे. यश-अपयश आणि सुख-दुःख, हे स्थायी स्वरुपाचं नसतंच. ते येतं आणि जातं, तशी काही माणसे आपल्या आयुष्यात येतात आणि जातात. ती कायम काही आपल्याला चिकटून राहत नाहीत. हे मला तुझ्या सहवासाच्या धुंदीत कळलंच नव्हतं. तुझ्यात झालेला बदल मला जाणवू लागला होता. एकेक अनुभव काट्यासारखा टोचत होता. तो तुझा दोष नव्हता. वाटेवरचे सहप्रवासी म्हणून आपण सोबत चाललो होतो आणि मी मूर्खासारखं तुला माझ्या आयुष्याचा एक भाग म्हणून समजून घेतलं होतं. प्रत्येकाचे मार्ग वेगळे असतात. कोणीच कोणाची जिंदगी पूर्ण असू शकत नाही. ते केवळ एक भाग असतात, हे नंतर लक्षात आलं. ज्याला त्याला, ज्याच्या त्याच्या ठिकाणी जायचं असतं. ज्याची त्याची जागा ठरलेली असते; म्हणून उगीच कुणाला कशाला पकडून ठेवायचं, हे नंतर मला समजत गेलं होतं आणि मी सोडून देण्याच्या तयारीला लागलो होतो.

तुझ्याकडून येणारा दुःखदायक अनुभव हा एकेक पाठासारखा शिकवून गेला होता; परंतु मी त्याकडे वाईटपणाने किंवा दुःखाने कधी पाहिलंच नव्हतं. तर त्या अनुभवांना एक शिक्षक म्हणून पाहिलं होतं. तुझे ते मनाला ताण देणारे

अनुभव लक्षात घेऊनच मी शिकत गेलो आणि शहाणा झालो. तेव्हा हळूहळू लक्षात येत होतं की, 'खरंच या जगात पकडण्यासारखं काहीच नसतं आणि उगीच धरून ठेवण्याच्या मोहापाई आपण स्वतःला सोलून घेत असतो. मी तर सोलून गेलो होतो भरपूर; पण त्यात मला माझं अस्तित्व नष्ट करायचं नव्हतं; म्हणून तुला सांगतो, 'जुनी कात टाकून दिल्याशिवाय इलाज नाही.', याचं भान मला येऊ लागलं होतं. तुझ्याविषयीचे आकर्षण आणि तुझी निर्माण झालेली आवड, हे मला दुःख देऊन गेली, हे खरे होते. कुणाला सांगूही शकत नव्हतो. फक्त तुलाच सांगतो की, त्या दुःखाची मी परवा करत नाही. कारण मला कळलं आहे, इथे जन्माला कसं यायचं ते. ते म्हणजेच निराशा व दुःख पायाखाली तुडवून सशक्तपणे चालत राहायचं. मी तेच केलं; म्हणून मी आता कुठे खरा जन्माला आलो आहे.'

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३-

प्रिय फ्रेशर

तुझी एक तक्रार होती माझ्याबद्दल की, मी चारचौघांमध्ये उठत-बसत नाही, टीममध्ये मिसळत नाही, हसत-खेळत राहत नाही आणि गप्पा मारत नाही. 'चार चौघात उठावं, बसावं, मनमोकळ्या गप्पा माराव्यात आणि मस्त जीवनाचा आनंद घ्यावा.' हे तुझं म्हणणं ठीक होतं; पण खरं सांगू. गर्दीमध्ये माझा जीव घुसमटत असतो. का? कुणास ठाऊक? माझ्या आयुष्यात मला काही चांगलं देणारा कोणी भेटला नसेल कदाचित; म्हणून मला माझ्याशीच मैत्री करून, माझ्यातल्या माणसाशी काहीतरी व्यवहार करून काही मिळवायचा होतं आणि ते मी मिळवत गेलो; म्हणून मला गर्दीची आशा वाटत नाही. मीच माझा पूर्ण होण्याच्या मार्गाला लागलेला आहे. लक्षात ठेव, नदीच्या प्रवाहासारखे मार्ग बदलत राहणे, हे जिवंतपणाचे लक्षण असते. गर्दी ताण देते. उपद्रव निर्माण करते. आपली शक्ती अकारण खर्च होते. मला ते नको वाटते.

तुझ्याशी नकारात्मक बोलून तुला त्यावेळी दुखवायचं नव्हतं. कारण तुझे सारे खेळ झेलून तुला सहचर बनवायचं होतं; पण ते स्वप्नच ठरलं. आता मात्र सांगतो. गर्दीत आरामदायक वाटणं स्वाभाविक आहे. तेथे कामाचा ताण नसतो. तेथे मिळणारा आराम माणसाला हळूहळू कमजोर बनवतो; मजबूत माणसं कधीच गर्दीत तयार होत नसतात. कारण गर्दीत उर्जा आणि वेळ अनुत्पादकतेत खर्च होते. मला ते नको असते. 'घाबरू नकोस, तू ठीक आहेस ना' असं कोणी विचारणारं, आधार देणारे किंवा मार्गदर्शन करणारे मला भेटले नाही. त्यामुळे एकटा राहून स्वतःचा मार्ग तयार करत गेलो. कोणी वाचवायला

येत नाही; म्हणून स्वतःला मजबूत करायचं, स्वतःला ओळखायचं, बहाणे आणि अहंकार सोडून द्यायचे, हेच एकटेपणात शिकता येते आणि मी ते शिकलो. चारचौघात शिस्त आणि नियंत्रण नसते. कोणीही काहीही बडबडत असतो. ते स्वतःवर नियंत्रण ठेवत नाहीत. घातक आणि हिंसक बनतात. कोणी बोलतो, कोणी फायदा घेतो. मात्र आपल्यासोबत कोणीच नसतो. मी हे सारं निरीक्षणातून सांगतोय. शांत राहून निर्णय घ्यायला शिकणं आणि जग जिंकणं हे माझ्या जगण्याचे उद्दिष्ट मी ठरविले आहे. फ्लर्टबाजी मला आवडत नाही; पण मी फार निरस आणि गंभीर आहे, असे समजू नको. कोणत्या वेळेला काय करायचे, हे मला चांगले कळते.

खरं तर माणूस एकटाच पाहिजे. त्याला कोणाची गरज भासू नये. तो त्याचा एकटा असला ना, तर एकदम स्वर्गीय आनंद घेतो; पण त्याला तसं कोणी शिकवलेलंच नसतं; म्हणून तो इतरांच्या सहवासाची अपेक्षा बाळगत असतो; परंतु कोणी या स्वार्थी जगामध्ये इतका स्वस्त नसतो की, स्वतःचं सोडून दुसऱ्यासाठी त्याच्यासारखं होऊन जाईल. इथे कोणी कोणाचं रूप होत नसतं; म्हणून तर जुळवावं लागतं नातं, आपलंच आपल्याशी. कारण मला कळलेलं आहे, इथे माझ्या इच्छा, अपेक्षा याच्याशी कोणाला काही घेणं-देणं नाही. त्यामुळे मी स्वतःला सांगितलं की, 'मीच माझं कसं पूर्ण करू शकतो?' हा प्रश्न पडला आणि फार मोठा कठीण वाटला. इथे तर कोणाच्या आधाराशिवाय किंवा कोणाचं कोणाशिवाय पूर्ण होत नसतं. हे तर जगाची रीत आहे ना?; पण मग ती रीत खोटी ठरली आणि मला एक धडा शिकवून गेली की, नको. 'तूच तुझ्या गरजा पूर्ण करू शकतो'; म्हणून मी ठरवलं. 'मीच माझा झाला पाहिजे'

बरंच काही पाहिलं, अनुभवलं आहे मी. 'जगामध्ये असं काही तत्त्वज्ञान आहे का?' की, जे स्वतःला स्वतःच परिपूर्ण बनवू शकतं. हो, दिसलं मला सारं काही. या जगात सर्व आहे; पण एकच नाही आणि ते म्हणजे 'ज्याला आपलं म्हणायचं, तोच आपला म्हणून कधी दिसलाच नाही.' शेवटी अनेक ठोकरा खाऊन ठिकाणावर आलो आणि एकच ठरवलं. आपणच आपलं होऊन चालणं फायद्याचं आहे. विचार करून चाललं की, माणूस आयुष्यात अडकत नाही. स्वतःच स्वतःला मान्यता दिली की, कोणाच्या मान्यतेची गरज नसते; म्हणून self-sufficient असा विचार करून आत्मरत व्हावं, हे पटलं होतं मला. कारण जो माणूस एकट्याने उभं राहायला शिकतो, त्याला पाडायला जगालाही खूप मेहनत करावी लागते. तुला शक्य झालंच तर करून पाहा, स्वतःशी मैत्री आणि प्रेम. 'चल अकेला, चल अकेला, तेरा साथ ना दे कोई तो खुद से प्रीत जोडलो.' हे तुझ्याच दुराव्याने मला शिकविले. बघ, तुला काय पटतं ते-----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

४.

प्रिय फ्रेशर

तुला प्रश्न पडला असेल की, 'हा पहिल्यासारखा का नाही राहत?' पण तुला सांगू, काही माणसं या जगामध्ये अजूनही शिल्लक आहेत, की जे माणसांसाठी आणि माणुसकीसाठी जगतात, म्हणून तुटत नाहीत की फुटत नाहीत. ती त्यांचं काम करत असतात. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन जिवाचे रान करतात; पण स्वार्थी लोकांनी त्यांना समजूनच घेतलं नाही. माणसाने माणसाला समजून न घेणं, हे एक त्यांचं अज्ञान असतं. अशा अज्ञानी लोकांकडून काही अपेक्षाच करू नये. झालंच तर त्यांच्यापासून दोन हात दूर राहणंच आपल्या हिताचं असतं. आपला स्वभाव, विचार आणि सवयी, हे आपण कोणासोबत असतो, यावर अवलंबून असतं. मला हे कळलं, तेव्हापासून सकारात्मक, प्रामाणिक आणि मेहनती लोकांशी जुळत गेलो. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आत्मविश्वास आणि संधी वाढवत गेलो.

या उलट सांगतो तुला. मूर्ख आणि अहंकारी लोक आपली मोठी समस्या बनतात. ते शिकायला तयार नसतात. खोटं वागूनही स्वतःला नेहमी बरोबर समजतात. नेहमी गोष्टी बदलतात, अशा विश्वसास अपात्र असलेल्यांकडून आपली फसवणूक होते. काही आळशी आणि टाळाटाळ करणाऱ्या लोकांमुळे आपला वेळ वाया जातो आणि प्रगतीला अडथळे येतात. बऱ्याच लोकांना लगेच राग येतो. ते समजून घेत नाहीत, अशा लोकांशी मला नातेसंबंध राखण्याची अजिबात इच्छा नसते. कारण त्यांच्यामुळे वातावरण बिघडते. विशेष म्हणजे जे लोक नकारात्मक आणि सतत तक्रार करणारे

असतात. ते तर मुळीच नको. कारण त्यांच्या सहवासामुळे ऊर्जा कमी होते आणि आत्मविश्वास ढासळतो. गोड-गोड बोलणारे तर नकोच. ते केसाने गळा कापतात. विश्वासघात करतात. आपल्यासमोर गोड बोलतात; पण मागे धोका देतात. त्यांच्या शब्द आणि कृतीत फरक असतो. असे काही लोकं लालचीही असतात. ते नेहमी स्वतःच्या फायद्याचा विचार करतात आणि इतरांचा उपयोग करून घेतात, अशा लोकांची बेरंगी दुनिया मी पाहिली आहे. त्यास रामराम ठोकून मी बदलत गेलो. मात्र त्याचे अर्थ तुला लावता आलेले नाहीत. हा तुझा दोष नाही. तुझ्या सभोवतीच्या वातावरणाचा आहे.

हे बघ, तुला सांगू? चांगली माणसं प्रोत्साहन देतात आणि मी त्यांना प्रतिसाद देतो, अशा जोड्या फार कमी असतात. आयुष्याच्या वळणावर एक सहकारी माझाशी जुळला होता. तो कायम सोबत राहिला आणि आजही आहे. त्याने वेळोवेळी मला लढायला शिकवलं. मी लढलो आणि आयुष्याचं युद्ध जिंकलं. त्यालाच म्हणतात खास मित्र. माणसाचे आयुष्य साधे-सरळ नसते. फार तिरपे-तारपे आणि वळणावळणाचे असते. पीजी'चा प्रोजेक्ट करीत असतांना अशाच एका ताणदायक, जीवघेण्या वळणावर माझ्यावर मनापासून प्रेम करणारे एक मार्गदर्शक भेटले. त्यांनी मला सावरलं. वारा-वादळात कोलमडून पडू पाहणाऱ्या झाडाला काठीचा आधार देतात किंवा दोरीने बांधून ठेवतात ना, तसं त्यांनी मला एका ध्येयाशी बांधून ठेवलं होतं. त्यांनी आधार दिला आणि मी ताटपणे उभे राहून जगायला शिकलो. त्यांनी 'उद्दिष्ट आणि हेतूशिवाय कुठे काही वेळ घालवू नये', हे बीज माझ्यामध्ये रुजवलं आणि वाढवलं. त्यामुळे फालतू वाया जाणारी माझी ऊर्जा, ही माझ्या आयुष्यातील

गुंतवणूक ठरली आणि मला रिच लाईफ जगता आलं. कारण त्यांनी सांगितलं तेव्हाच मी ठरवलं होतं 'आता फक्त एकच...चार चौघांमध्ये वेळ आणि ऊर्जा वाया घालवून स्वतःचे मरण स्वस्त करायचे नाही, त्याचे धोके लक्षात घेऊन पुढे चालत गेलो. तसे सोनेरी दिवस उगवत गेले. त्याच वेळी ऐकणे व समजून घेणे किती महत्वाचे असते, हे मी चांगले अनुभवले आहे.

आणखी एक सांगतो, एकाने ठोकर मारली म्हणून दुसऱ्याकडे पाठ फिरवायची नसते, हे तत्त्वही मला कळलं आणि ते शिकलो मी, एका निस्वार्थ माणसाकडून. ते एक ध्येय असतं, आपण आपलं काम करत राहावं, आजच्या तंत्रज्ञान युगात, सोशल मीडियाच्या जाळयात अडकलेल्या माणसांसाठी लाख मोलाचे कार्य करणारे अनेक आहेत. मानवतेसाठी ध्येयनिष्ठ कार्य करणारे काही मोजक्या व तत्पर असलेल्या माणसांविषयी अमीर खान यांनी 'सत्यमेव जयते' ही मालिका चालवली होती आणि त्यात म्हटलं होतं की, "जगात हे जे चांगलं चाललेलं आहे, ते केवळ अशा लाखमोलातील एकेका माणसामुळे चाललेलं आहे." आणि म्हणून मला असं वाटतं की, अशा लाख मोलाच्या माणसांना सलाम करायचा आणि उगीच वेळ खर्च करण्यापेक्षा काहीतरी चांगलं काम हाती घेऊन त्यांच्या मार्गाने चालत राहायचं.

आयुष्याच्या वळणावर आणि मैत्रीच्या यादीत तुझं नाव तुला नोंदवता आलं नाही. कारण शिकणं आणि ऐकणं, उत्सुकता आणि जिज्ञासा, हे गुण तू वाढविले नव्हते; म्हणून एकदा व्हाट्सअपवर आपण बोलत असतांना मी तुला म्हटलं होतं, 'You are not eligible for friendship. You are only good at gossip and chatter. त्यावेळी तुला राग आला होता; पण त्यामुळे

तू गैरसमज करून घेऊ नकोस. त्यातून काही तरी शिकता आलं तर बघ. कारण तुला सोबत चालता आलं नाही. ते तुझे टाकाऊ समज व दृष्टिकोन तुला आड आले होते. स्वतःच्या अस्तित्त्वाचा अर्थ शोधत तुला मार्ग निवडता आले नाही, तुला तरी कसा दोष देऊ?

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

५ –

प्रिय फ्रेशर

तुला आठवतं का?, आपली एक प्रोजेक्ट मिटिंग होती. मी तुला म्हटलं 'चल, उशीर होतोय. 'सीईओ'चा फोन आला. तेव्हा तू म्हणाली, 'तुम्ही जा. मी आलीच.' मला तर आश्चर्य वाटलं होतं. एका महत्त्वाच्या मिटिंगला उशीर करून तू एका फ्रेशरच्या इंट्रोडक्शनमध्ये अडकली होती. त्यासाठी तुला तुझे स्वातंत्र्य होतेच; पण वेळ-काळ ती नव्हती. तुला म्हटलं, "ये, मी जातो बॉसकडे. मला जाऊन बराच वेळ झाला होता, तरी तू आली नव्हती. तेव्हा तू दुसऱ्या कुणासोबत आहे, याचं दु:ख नव्हतं. एका महत्त्वाच्या मिटींगला सोबत आली नव्हती, तेव्हाच वाटलं होतं की, तू आता नवीन नाही. तुझं प्रमोशन होऊन डेव्हलपर झाली. मला सोडून तुला दुसऱ्यात गोडी वाटू लागली. जेव्हा-जेव्हा तू मला टाळलं नं, तेव्हा-तेव्हा तुझ्या भावना माझ्याबाबत कमी-कमी झाल्याचे जाणवले आणि मला तो धक्काच बसला की, 'ही बाई, आपण सांगूनही टाळते आणि फ्रेशरसोबत गप्पा मारण्यात वेळ घालवते?' म्हणजे हिचे इंटरेस्ट वेगळेच आहे. तुझ्यावरील प्रेमामुळे माझा पझेसिव्हनेस मला अस्वस्थ करीत गेला होता आणि वाटत होतं, 'सर्वांकडे लक्ष देणारी बाई, ती आपली होऊ शकत नाही.'

मी स्वतःसाठी काहीच उरलं नव्हतो, इतकं तुला देऊनही तू दूर झाली. तू माझी किंमत केली नाही. प्रयत्नांचीही कदर केली नाही. याची तेव्हा जाणीव झाली; म्हणून तुझ्यामागे न पळता तुझ्यापासून दूर राहायला शिकलो, हाच माझा नवा जन्म समज. शांत होऊन स्वतःला पुढे नेणं हेच मी ठरवलं. तुला कोणासोबत राहायचं, याचा अधिकार तुला आहे. तू माझ्याच सोबत असावी,

हा माझा आग्रह नव्हता; पण तू कामं सोडून एका प्रोजेक्टने हवेत उडत गेली आणि माझ्यापासून मनाने व भावनेने दूर झाली; म्हणून मी स्वतःहून दूर होत गेलो आणि एक निर्णय घेतला की, कुणाच्या मागे धावायचं नाही. स्वतःसाठी जगयाचं. कारण 'माझी शांतता हेच माझं उत्तर होतं, तुझ्याशी असलेल्या रिलेशनबाबत.' तुला हरवणं हा माझा उद्देश नव्हता, तर स्वतःला जिंकणं आणि आपण आपल्या कामात राहून पुढे चालत राहणं, हेच माझ्या जगण्याचे अंतिम उद्दिष्ट मी ठरवून टाकले होते. लक्षात ठेव, तडजोडीपेक्षा आत्मसन्मान महत्त्वाचा असतो.

माणसाच्या आयुष्यात खूप साऱ्या गोष्टी असतात. फक्त 'बाई' ही एकच गोष्ट नसते. याचा विचार माझ्या मनात आला, तो तुझ्यामुळेच. तू माझी कहाणी बनावी; म्हणून मी तुला जवळ केले होते; पण माझ्यासाठी तुझी गोष्ट कलात्मक होऊ शकली नाही. हे जस-जसे अनुभवाला येत गेले, तसा मी इतर गोष्टींकडे वळत गेलो आणि तुला वाटलं होतं की, ' मी तुझ्यामागे, तुझ्या पुढे-पुढे, आगे-पीछे का नाही होतो?' तुला प्रश्न पडणं स्वाभाविक होतं. बायकांना हेच वाटतं की, 'माणूस लालची असतो. बायांच्या पुढे लाळ गाळतो.'; पण मी शिकत जाणारा आणि नैसर्गिकरितीने वास्तव आयुष्य जगणारा माणूस आहे. माझ्या अस्तित्त्वाला अर्थ देण्यासाठी समाजाच्या भिंती ओलांडून पुढे जाणारा आहे, हे तुला कळलेच नव्हते.

एका गोष्टीसाठी आयुष्याची माती करण्यापेक्षा सोनं करण्यात खरी मजा असते, हे मला समजले होते; म्हणून तुझ्या वागण्याचे दोष तुला सांगत बसण्यापेक्षा मी स्वतःला सावरत गेलो. स्वतःला नुसतं सांभाळलंच नाही, तर

प्रकाशमान करीत गेलो. तुला अंधारात ठेऊन मला स्वतःला काही प्रकाशात मिरवण्याची हौस नव्हती; पण तूच भरकटत गेली आणि माझ्यासारख्या दिव्याला विसरून अंधाराच्या वाटेने पाऊल टाकत गेली. तो तुझा प्रश्न होता. 'शेवटी ज्याचा त्याचा प्रश्न असतो.', असं तू म्हणशील. मी म्हणेल, 'ठीक आहे; पण आपले प्रश्न असे असले पाहिजे की, 'जगण्यात ताण किंवा समस्या दिसू लागल्या की समोर प्रश्नापेक्षा त्याची उत्तरे दिसावीत.'; पण दिसणार तरी कसे?, 'आपण डोळ्यावर नको त्या धारणा किंवा दृष्टीची झापड लावून बसलेलो असतो.' ते काढून फेकल्याशिवाय नवे मार्ग दिसत नसतात.

एक लक्षात ठेव, रोज अनेक प्रश्न सहज निर्माण होतात आणि भुतांसारखे झपाटून टाकतात. तेव्हा आपली अक्कल हेच आपले मांत्रिक वापरून त्या प्रश्नांची भूतबाधा उतरवून टाकायला हवी; पण बायकांची जात प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकून स्वतःला धन्य समजत असते आणि नशिबाला दोष देत-देत शेवटी म्हसणात जाते. याला काय बाईचे जगणे म्हणतात का? संधीचं सोनं करून सक्षमपणे जगण्याची दृष्टी तिने कमावली पाहिजे. तुझ्याकडून हीच अपेक्षा होती; पण तू माझी भाषा समजून घेतली नव्हती.

तुला एवढं सांगण्याचं कारण हेच की, 'तुझा पॅटर्न वेगळाच आहे, हे फार लॉस झाल्यावर, म्हणजे मी शरीर,मन आणि भावना या सर्व परीने थकल्यावर माझ्या लक्षात आलं होतं.असो, प्रत्येक जण एक नमुना असतो. तो काही आपल्यासारखा बनत नसतो. मग तुझ्याकडून तरी काय अपेक्षा करणार -----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

६

प्रिय फ्रेशर

तीन वर्षानंतर तुझी कामगिरी, दृष्टिकोन आणि शिकण्याचा वेग, असं सारं आपल्या बॉसला मी पटवून सांगितलं आणि तुझं सहाय्यक सॉफ्टवेअर अभियंता म्हणून पुन्हा प्रमोशन करून घेतलं. त्यावेळी ते म्हणाले होते, 'अहो मॅनेजर, कशासाठी करता आहे, तुम्ही हे सगळं? मी म्हटलं, 'नाही सर, तसं काही नाही. आपल्याकडून होईल तेवढं करावं; म्हणून करतो आहे.' मनातील सारे काही बाजूला ठेवून समजवलं होतं त्यांना. मग ते राजी झाले. तेव्हा कुठे तुझ्या मनासारखे घडल्याने तू फार खूष झाली. तेव्हा तू पडद्यामागच्या हिरोला सोडून कॅन्टीनला गेली. टीममधील सहकाऱ्यांसोबत मिनी पार्टी केली, तुझ्याच तालात राहिली आणि वादळात झाडाला घट्ट धरून ठेणाऱ्या मुळाला विसरली. त्यावेळी माझ्या डोक्यात प्रकाश पडत राहिला. जिला कामापेक्षा सर्वांशी बोलायला आणि संपर्क साधायला मजा वाटते, ती कोणा एकाची होऊ शकत नाही, असंही वाटायला लागलं होतं. इथे मी काही तुझ्या चुका किंवा दोष सांगत नाही, तर तुझा तो स्वभाव आहे आणि मला असा बेचव स्वभाव नको आहे. अर्थात मी तुला मर्यादा घालत नाही. कसे जगावे आणि कसे राहावे, याचे तुला पूर्ण स्वातंत्र्य आहे; पण कुठे, कोणत्या वेळी व काय करावं? हे तुला कळावे; म्हणून सांगतो आहे. कारण सोबत राहून आपल्याला वेगळे विश्व निर्माण करायचे होते; पण तू समजून घेतलेच नाही; म्हणून तुझ्यामध्ये भावनिक गुंतवणूक करणे मला व्यर्थ वाटू लागलं होतं. तुझ्या भावना स्थिर नसल्याने त्यात अडकणे योग्य वाटत नव्हते. योग्य की अयोग्य हे माणसाला पारखता येत नाही. त्यामुळे त्याची फसगत होत राहते. आपणही त्यातीलच आहोत. फसलेले जिवात्मे ------

व्हाट्सअप किंवा फेसबुकसारखे प्लेटफॉर्म वापरणाऱ्या युजरला केलेली चॅटिंग किंवा आलेल्या पोस्टमधील शब्द, वाक्य आणि मजकूर यात दडलेल्या भावना सहज ओळखता याव्यात, असा एक 'चॅटबीट' म्हणून नवीन ॲप बनविण्याचा प्रोजेक्ट पूर्ण करायचा होता. तेव्हाही तुझ्या कामाचा भार पेलून खूप मेहनत करीत होतो. तुझे प्रमोशन होण्यासाठी झटत होतो. त्या निमित्ताने आपण खूप जवळही आलो. ते सहवासाचे दिवस फार सुखदायक वाटत होते. आपले एक नातेही तयार झाल्यासारखे वाटले होते; पण त्यास काय नाव द्यावे? प्रेम, मैत्री की आणखी काही? काही ठरलेच नव्हते. तो प्रश्न अनुत्तरित राहिला होता. तू मैत्री-मैत्री म्हणायची, तर मी एकमेकावरील प्रेम समजायचो. आपण मात्र प्रेम आणि मैत्री यातील फरक जाणून घेतलाच नव्हता. तू सगळ्याच गोष्टी पॉझिटिव्ह घेत असल्याने मी आपले प्रेम असल्याचे समजून चाललो होतो. नंतर तो भ्रमाचा भोपळा फुटत गेला. तुझ्या रुपातील बिया रस्त्यावर पडल्या.

आपले काम संपले. बॉसने तुझे फार कौतुक केले. तू तुझ्याच तालात आणि हसली गालात. तुला माझा विसर पडला आणि मला साक्षात्कार झाला. तू नाव का दिलं नाही आपल्या रिलेशनला?, याचाही अर्थ कळला. खरं सांगतो, ' तुला खुश करण्यासाठी मी स्वतःला खूप स्वस्त केलं होतं. माझी वेळ आणि उर्जा सहज दिली होती. तू ते हक्कानं लुटली होती, तेव्हा तू माझी वाटत होती; पण तू फार हलका समजत गेली. तुझा अहंकार वाढत गेल्याने माझा आत्मसन्मान राखू शकली नाही. तू मला वस्तू समजून चेतनाहीन बनवून टाकले होते; पण लक्षात ठेव, मी इतरांसारखा लालची नव्हतो; म्हणून तुझ्याच इच्छेप्रमाणे माझी शक्ती खर्च करत होतो. तुझ्या प्रत्येक गोष्टीला होकार देत

होतो. का? तर मी तुला माझे मानले होते म्हणून. तू कायम सोबत राहावे म्हणून. मात्र तू कधीच गंभीरपणे घेतले नव्हते. एक पर्याय समजून माझ्याशी प्रॅक्टिकली वागत होती. हे मला खूप उशिरा कळत गेलं. तुला प्रमोशन मिळाल्यानंतर माझी गरज वाटत नव्हती, तशी 'मलाही तुझी गरज वाटू देत नव्हतो. मी माझा पूर्ण आहे. तुझ्यावाचून काही अडत नाही.' असा स्वतःशीच विचार केल्याने मी बदलत गेलो आणि स्वतः विकास करून मोठ्या पदावर जाण्याच्या दिशेने वाटचाल करीत राहिलो. कारण गरज ही माणसाला लाचार बनवते आणि मला तसे व्हायचे नव्हते.

माझी उर्जा माझी संपत्ती आहे आणि ती कोणाला फुकट वाटणे, हा मूर्खपणा आहे, हे मीच माझ्या मनाला बजावून सांगितले आणि स्वतःची किंमत ठरविली. सहज उपलब्ध होणं आणि स्वतःला सवलतीत विकणं बंद केलं. ज्याला आपली गरज वाटत नाही, त्याला किंमत कळत नाही; म्हणून मी शांत झालो. स्वतःशीच नाते जोडत गेलो. विचार आणि सवयीत बदल करून स्वतःच स्वतःचा आदर करू लागलो. रोज स्वतःला आरशात पाहून खुश राहत गेलो आणि पूर्णपणे बदलण्यासाठी एक रोडमॅप तयार केला आणि स्वतःला अधिकाधिक समृद्ध करीत गेलो, मला वाटतं, त्या मार्गावर तू आता माझ्यासोबत परत येऊ शकणार नाही. कारण तुझे इंटरेस वेगळे आहेत; त्यामुळे आपले मार्ग वेगळे झाले. मी आता स्वतःला निवडल्याने तुझ्या मान्यतेची मला गरज वाटत नाही, तरी असो--- 'तुझं आहे तुजपाशी' जसं आहे तसं.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

७.

प्रिय फ्रेशर

एकदा बॉसने बोलवलं आणि टेबलवर एक फाईल समोर करून सांगितलं की, बघा, 'असं काम करायचं असतं.'' मी पाहिलं तर ते माझं काम होतं आणि तू ते तूझ्या नावावर दाखवलं होतं. तेही मला न सांगता? तेव्हा तुझा सन्मान राखण्यासाठी मी काहीच बोललो नव्हतो. उलट तुझं कौतुकच केलं होतं. खरं बोललो असतो, तर तुझा अपमान झाला असता. तुझ्यावर खरंच प्रेम केल्याने तुझी मान खाली जाऊ द्यायची नव्हती.' कळत-नकळत चुका होतात; म्हणून आपल्या माणसाला सांभाळायचे असते, हेच केले मी.

आता तूच सांग, 'असं का केलं होतं?' माझी कामं बाजूला ठेवून फार कष्टाने तुझे प्रोजेक्ट वर्क पूर्ण केले होते. केवळ साहेबांची वाहवा मिळवण्यासाठी आणि प्रमोशनसाठी तू माझी फाईल चोरली होती; पण मी तुला चोर म्हणणार नाही. कारण माझं खरंच तुझ्यावर नितांत प्रेम आहे. मी साहेबांना माझी सगळी कागदपत्रे दाखवून, स्पष्टीकरण व प्रेझेंटेशन करून तो प्रोजेक्ट माझा आहे, हे सिद्ध करू शकलो असतो; पण मी तसे केले नव्हते. का केले नसेल? याचा विचार तूच करावा. तू अधिकारानं विचारलं असतं, तर ते प्रोजेक्ट फाइलच काय, जीवही देऊन टाकला असता; पण तुझा विश्वास नाही बसणार. कारण विश्वास बसण्यासाठी एकतर्फी प्रेम नको असतं. समोरच्या इतकंच त्याच्यावर प्रेम करावं लागतं. तेव्हा त्याच्या भावना आपल्याला कळू लागतात आणि जेव्हा भावना कळतात ना, तेव्हा चोरी करण्याची गरज नसते. तो अधिकार असतो आणि तू अधिकाराने मागितलं असतं, तर मी हसत-हसत तुला दिलं

असतं आणि माझ्याआधी तुझ्या प्रमोशनसाठी मी धडपडही केली असती. कारण तुला खुश ठेवून कायम माझ्यासोबत ठेवायचे होते.

बाईची जात दुर्बल असते; म्हणून ती धोकेबाज बनते, खेळी करते, असंही वाटायला लागलं होतं. तुझ्या सत्यावर नाही, तर दिसणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवत गेलो. तू अलाउद्दीनचा चिराग म्हणजे एक जादुई दिवा समजून माझा वापर केला आणि तुझ्या इच्छा पूर्ण करून घेतल्या. मी शांत आणि स्थिर राहून आत्मविश्वासाने तुझी सोबत केली आणि तू मात्र भारवाही गधा समजली. मी तुला आवडलो पाहिजे; म्हणून स्वतःचा सेल्फ रिस्पेक्ट सोडून तुझ्याशी खूप सॉप्ट वागलो; पण त्याचे अर्थ किंवा त्यामागच्या भावना तू समजू शकली नाही. तू कदाचित तुझा हेतू साध्य करण्यासाठी नेहमी भीती, असुरक्षितता आणि जुने अनुभव सांगत गेली होती आणि मी तुला सांभाळत गेलो होतो. आता वाटते की, तुझे ते वागणे खरे नव्हते. बऱ्याच लोकांचा तो स्वभाव असतो. मुग गिळून बसतात आणि काम काढून घेईपर्यंत फार जीव लावतात. नंतर विसरून जातात. जसे काही घेणे-देणे नाही, अशा पद्धतीने तोंड फिरवतात.

मी तुझ्या प्रेमात आंधळा झाल्याने तुझी खरी बिलिफ सिस्टीम म्हणजे विचारसरणी मला समजलीच नव्हती. त्यामुळे माझं प्रेम आणि प्रयत्न वाया गेल्यासारखे वाटले; पण लक्षात ठेव, स्वतःला सिद्ध करण्याची गरज सोडून स्वतःच्या मूल्यांवर मी ठाम राहायचे ठरविले आहे. तुला काय वाटेल ते वाटू दे. मी जसा आहे तसा आहे. मी आहे तसाच राहील, जो माझा स्वीकार करेल, तोच माझा असू शकेल. बाकी दुनियेत खूप असतात; कोणी कोणाचं नसतं, हे पाहिलं आहे मी. तेव्हा बाईच्या जातीला समजून घेण्यापेक्षा, स्वतःला मजबूत

आणि स्पष्ट बनवणं जास्त महत्त्वाचं आहे, हे ठरविलं आहे मी. तुझ्यासाठी सगळं सोडून दिलं होतं. तुझे दोष सहन केले होते. तू मात्र गेम खेळत राहिली. मग शेवटी लक्षात आलं की, तुला पकडून ठेवण्यात अर्थ नाही, तर स्वतःला मजबूत बनवणं महत्त्वाचं आहे. मी तेच करायचं ठरविले आहे.

तू काय करावं, हे मी सांगणार नाही. काय करायचे, तो तुझा निर्णय आणि अधिकार आहे. तू कधी खूप जवळ येऊन प्रेमळपणे लक्ष दिले आणि अचानक दूर झाली. कधी काळजी तर कधी पूर्ण थंड राहिली. त्यामुळे तू काय आहे, हे कळलेच नव्हते. तरी मी तुझ्यात इमोशनली अडकून गेलो होतो. तू मात्र कोरडी आणि बधीर राहिली. मी तेही समजून घेतलं. का ? तर केव्हा तरी तू प्रेमाचे आणि खऱ्या जगण्याचे अर्थ समजून घेशील म्हणून; पण तुला माझ्यात काही गोडी वाटत नव्हती, तर माझ्या कामाशी तुला मतलब होता. तू जवळ आली, तेव्हा घाबरली होती. तुला विश्वास वाटू लागला, तेव्हा मोकळी झाली. तुझे प्रेम समजून मी जवळ आलो, तर तुला भीती वाटली आणि दूर गेली. नंतर दोघांत अंतर पडत गेले. दूर जाण्याचा ताण तू घेतला नाही. कारण तुला माहित होतं की, मी नेहमी तुझ्यासाठी उपलब्ध असेल; पण तुला सांगतो, आता मी तुझ्यासारखंच वागायला शिकलो आहे. गैरसमज करून घेऊ नको. हा दुनियेचा रूल आहे.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

८.

प्रिय फ्रेशर

तुझे प्रमोशन झाल्यानंतर तू विचारले होते की, "आपल्या टीममध्ये इतरही तरुण, सुंदर फ्रेशर होत्या. मग मलाच का तुम्ही निवडलं?" तुझ्या या प्रश्नाचं उत्तर नेमकं काय, ते मला सांगता येणार नाही; पण तसे पाहिले तर तुझ्यापेक्षा त्या मुली खरंच सुंदर होत्या. तू साधारण असली तरी, एक मात्र खरे की, तुझ्या नजरेत गंध आणि डोळ्यात मोहकता होती. तुझं लाघवी बोलणं आणि तुझ्या नजरेतील चाहत कोणालाही भुरळ पाडणारी अशीच आहे; म्हणून मलाही तुझ्याविषयी आकर्षण वाटले. त्यामुळे मुलाखतीच्या वेळेलाच मी ठरवलं होतं की, तू माझ्यासोबत प्रोजेक्ट वर्कसाठी फ्रेशर म्हणून पाहिजे; म्हणून मी तुझी निवड केली होती. तू मात्र मला निवडले नव्हते, तर नौकरी स्वीकारली होती. तू माझी निवड केली असती, तर माझ्यावर तुझे प्रेम जडले असते; पण तुझे खेडूत दृष्टिकोन तू दाखविले आणि बाई-माणसाचे जे रिलेशन हवे, ते तुला सांभाळता नाही आले. पाप-पुण्याच्या जुनाट कल्पना घेऊन 'मला ते कधीच जमणार नाही' असे सांगत रोमॅंटिक जीवनाकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले.

तुला सांगतो, तू स्वतःवर शंका घेत, शांतपणे उत्तर देत माझा योग्य तो वापर करून घेतला. त्यावेळी तू मला सोडून जाणार नाही, असा माझ्या मनात भ्रम निर्माण केला होता. तुझे पुन्हा प्रमोशन होण्यासाठी मी फास्ट ट्रॅक निवडला होता. तुझी कामगिरी, कौशल्ये व नेतृत्त्व क्षमता वाढवत गेलो होतो. त्यासाठी विकली अपडेट नोंदविले, अचिव्हमेंट ट्रॅक केले. टीममध्ये व्हिजिबल ठेवले आणि तुझी ग्रोथ फास्ट केली. त्यामुळे तुला लवकरच बढती मिळाली. कारण

तुला माझ्या इतके स्ट्रॉंग बनवून सर्वोच्च पदापर्यंत न्यायचे होते; पण तुला कामाचा माणूस म्हणून मला सांभाळता आले नाही. उलट तुला कशाचीच लालसा आणि गरज असल्याचे तू दाखवत नव्हती, तर तू इगो आणि नखरेच जास्त दाखविले होते.

तुला सांगतो, 'सिग्मंड फ्रॉईडने महिलांच्या इच्छेचं काळं रहस्य शोधलं होतं. ते जगापासून लपवण्यात आलं होतं. स्त्रियांची इच्छा केवळ भावना नसते, तर एक मानसिक कूटनीती असते. हेतू साध्य करण्यासाठी विवेकी योजना त्या वापरतात. भावनेच्या आहारी जात नाहीत. व्यक्ती किंवा परिस्थितीवर नियंत्रण ठेवून विचारपूर्वक यश मिळवतात. पुरुषाने सामर्थ्यवान बनायचं, स्त्रीवर प्रेम करून तिला राणीसारखे ठेवायचे, असे त्याला शिकविले जाते. त्यामुळे तो स्त्रीसाठी कष्ट करतो. तिची इच्छा कधीही सरळ नसल्याने तिच्यासाठी भरकटत जातो. केवळ एका इच्छेसाठी त्याला डोंगर उपसावे लागतात.

बाईच्या ठिकाणी सुरक्षितता आणि धोक्याचे आकर्षण, असा विरोधाभास असतो. ती पुरुषावर भावनात्मक नियंत्रण ठेवते आणि आपल्या फायद्यासाठी, सुरक्षित, आरामदायक, आणि शक्तीदायक परिस्थिती निर्माण करण्यासाठी इमोशनल मॅनिपुलेशनमध्ये निपुण बनते; म्हणून पुरुषाचा बळी जातो. स्त्रिया भावनात्मक आणि मानसिक दृष्टीने पुरुषांच्या तुलनेत खूप कमी असतात. त्यामुळे त्यांच्या इच्छांचे आदान-प्रदान, शारीरिक आणि मानसिक दृष्टीने एक प्रकारचा नकारात्मक अनुभव येतो. माणूस तिच्या नकाराला 'होकार' समजतो आणि फसतो. आयुष्यभर तिच्या इच्छांचा भार वाहतो. एका बाजूने स्त्री आकर्षण आणि प्रेमाच्या मागे असते. तर दुसऱ्या बाजूने गूढ आणि अशांतही

असते. या विरोधाभासामुळे तिचे वर्तन अनिश्चित आणि आश्चर्यकारक वाटते. ती प्रेमाच्या माध्यमातून एक सामर्थ्य आणि अधिकार मिळवण्याचा प्रयत्न करते. प्रेम आणि समर्पण याच्या दरम्यान तिच्या इच्छा प्रबळ असतात; पण पुरुषांना कळू देत नसते. फ्राईडच्या सिद्धांतांमध्ये स्त्रीला पुरुषाच्या तुलनेत 'कमी' किंवा 'विकृत' म्हणून मांडले गेले होते. 'त्याने महिलांची नैतिकता आणि लैंगिकतेबाबत गोंधळलेली, वाईट किंवा 'अपूर्ण' माहिती सांगितली', असे स्त्रीविरोधी सिद्धांतांच्या आधारावर, काही मानसशास्त्रज्ञ आणि स्त्रीवादी विचारवंतांना वाटते; पण तुला सांगतो, समाज इथे नैतिकतेवर भर देतो आणि स्त्रियांवर बंधने लादतो. त्यामुळे त्यांच्या लैंगिकतेशी संबंधित अनेक मानसिक, शारीरिक आणि सामाजिक अडचणी निर्माण होतात. त्यांना भावनात्मक किंवा शारीरिक त्रास सहन करावा लागतो. त्यांच्या मानसिक समस्यामुळे लैंगिक इच्छाशक्तीवर परिणाम होतो. त्याचे परिणाम प्रेमसंबंधावर होतात आणि आमच्यासारखे तरुण मोडून पडतात. याचा विचार समाज करत नाही. मात्र मी असे म्हणत नाही की, समाजाने लैंगिक स्वैराचाराला मान्यता द्यावी. ते तर चुकीचे आहे. फक्त दोघांच्या इच्छेला मान्यता द्यावी. स्त्रीचे दमन करू नये. शेवटी तुला काय करायचे, ते तू ठरवू शकते.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

९.

प्रिय फ्रेशर

तू सोबत राहून करिअरच्या वाटा शोधत असतांना तुझ्यातील युनिकता आणि जिनियसपणा मला फार भावला होता आणि स्त्रीसौंदर्यापेक्षा मला तुझी विशेष अदाकारी फार मोहीत करून गेली होती. नाहीतर तुझ्यापेक्षा अधिक सुंदर तरुणी माझ्या हाताखाली कामं करून गेल्या होत्या; कोणातही मला अकर्षूण घेण्याचे गुण दिसले नव्हते. ते तुझ्यात, विशेषतः तुझ्या डोळ्यात जाणवत होते. तेव्हा मला वाटले होते की, 'माझ्यासाठी तूच योग्य आहे. शेवटपर्यंत सोबत राहायला हरकत नाही, असा विचार करत होतो.'; पण तुला स्वतःचीच किंमत कळली नव्हती; म्हणून तुझ्या डोळ्यांच्या आरशात माझी प्रतिमा मला कधी दिसलीच नव्हती. तुला वाजवीपेक्षा जास्त भाव दिला होता. मात्र तू समजण्याच्या पलीकडे राहू लागली होती. त्यामुळे माझी हालत बिघडत गेली. तू म्हणजे माझ्या हातातील गोष्ट नसल्याने मी सुरुवातीला गडबडून डिस्टर्ब झालो होतो. नंतर आत्मचिंतन करीत असतांना तुझे खरे रूप कळत गेले. तुझे एकेक नाटक पाहून मी स्वतःला सावरले. सुरुवातीची तुझी नजर नंतर परकी वाटायला लागली, तसा मी ठिकाणावर येत गेलो.

तुला सांगतो, आयुष्यात मान-अपमान, निराशा-दुःख, यश-अपयश किंवा नात्यांचेसुद्धा, अशी अनेक वादळे येत असतात. प्रत्येक लढाई जिंकायची असेल, तर आपण कोलमडून न जाता आतून दृढ असलो पाहिजे, म्हणजे मोठी ताकद बाहेरून येत नाही, ती आपल्या आत जन्म घेते. कितीही वादळ आले आणि झाडाच्या मुळा जर मजबूत असतील, तर ते झाड पडू शकत नाही, हे समजून घेतले होते. माझ्या आयुष्यात तू एक वादळासारखी आली होती; पण

माझी जागरूकता, आत्मविश्वास, क्षमता आणि चेतना मी ओळखून होतो. माझे मूळ फार मजबूत होते. त्यामुळे तुझ्या वादळाचा माझ्यावर परिणाम झाला नाही. तू नाकारले खरे; पण मी स्वतःला तुटू दिले नाही. तुला सोडून पुढे-पुढे जाण्याची उर्जा निर्माण करीत गेलो. त्यावरून 'मी दगड किंवा संवेदनशून्य बनलो.', असे समजू नको. तुझ्याकडून आलेल्या निराशादायक अनुभवांनी मी शिकत गेलो आणि तुझ्याकडील अंधाराला पार करत नव्या प्रकाशाच्या वाटेवर धैर्याने एकटा चालत राहिलो.

तू एकदा विचारलं होतं, "माझे दोष सांगा. माझ्यात काय दुर्गुण आहे.?" तेव्हा तुला खूष ठेवण्यासाठी तुझी स्तुतीच केली होती. कारण कोणाचे दोष सांगून उपयोग काय? तर काहीच नाही. 'सुंभ जळला तरी पीळ जात नाही.', असा व्यक्तीचा स्वभाव असतो. त्यामुळे तुझ्या वर्मावर बोट ठेऊन तुला दुखवायचं नव्हतं. तू एक स्त्री म्हणून जसे माझ्यासोबत राहायचे होते, तशी तू राहिली, यात तुझी काही चूक नव्हती; म्हणून मी तुला समजून घेतले होते. तू जुन्या-पुराण्या गोष्टींची नको ती भीती बाळगत राहिली आणि स्वतःहून मर्यादांचे कुंपण घालून घेतले, हा तुझा मोठा दोष वाटत होता मला. अजूनही तू स्वतःला दोषी मानून जगत राहिली तर कधीच मजबूत होऊ शकणार नाही. त्यासाठी स्वतःला दोषी मानणे सोडून दे. तू जिनियस असून तुझा प्रवास वेगळा आहे; म्हणून तुला पुढे जाण्याचा वेग स्वीकारता आला पाहिजे. गतीशिवाय कोणालाही स्थिरता निर्माण होत नाही. ती स्थिरताच प्रत्येक परिस्थितीत माणसाला संतुलित ठेवते. तुझ्या चेतना जिवंत आणि मन जागृत असल्याशिवाय प्रत्येक परिस्थितीतून तुला मार्ग काढता येणार नाही आणि नवे मार्ग काढल्याशिवाय स्थिरता प्राप्त होणार नाही. उलट दोषांचाच विचार

करशील, तर वेगवेगळे भ्रम निर्माण होतील आणि तू कमजोर होत जाशील; म्हणून तुझ्या सक्षमतेसाठी बाह्य नियंत्रण व दडपण फेकून दे.

तुला आणखी एक सांगतो. फुकट सांगायला काही जात नाही. बघ, उत्सुकता, रुची, कल्पना, आकर्षण इच्छा आणि आसक्ती हे नव्या जीवनाचे सूत्र बनव. अवतीभोतीच्या गोष्टी निरखत राहा. स्वतःबद्दल विचार कर. मनात स्वतःचे चित्र रंगव. भावना आणि शरीर दोघांना एकरूप ठेव. जवळीकतेचा अनुभव घेण्याची इच्छा बाळग आणि भावनांना खोलवर रुजू दे. तरच तुला जिवंत असल्याची अनुभूती येईल. नाहीतर सतत उदास आणि भकास राहशील, तसे राहणे, हाही तुझा तुलाच कुरतडणारा गंभीर आजारासारखा दोष आहे.

तुझ्याकडे नियोजन आणि शिस्त नाही, हाही तुझा दोष आहे. आपल्या ध्येयाकडे नियमित पावलं टाकण्यासाठी शिस्त असावी लागते. त्याशिवाय आत्मबळ वाढत नाही आणि मजबूत होता येत नाही. तुझ्या मनाविरुद्ध काही वाट्याला आलं की, 'माझ्याच बाबतीत का असं होतं?' असा विचार करून तू खचून जाते; पण लक्षात ठेव, तसा विचार न करता त्यापासून काय शिकता येईल, ते पाहावं. कारण 'जो परिस्थितीचा बळी बनतो, तो कमकुवत असतो; पण जो त्यातून शिकतो, तोच खरा मजबूत बनतो.' शांत बसून स्वतःसाठी वेळ काढायचा. स्वतःच्या मर्यादांना अंतिम सत्य मानू नको. रोज थोडं-थोडं स्वतःला आव्हान देऊन काहीतरी नवीन शिक, नवीन विचार कर, नवीन अनुभव घे. तू कुठेही राहा, तू विचारले होते; म्हणून आता सांगितले. नाही तरी तो माझा बडबड्या स्वभाव आहे; पण फायद्याचा आहे. हस मग- राग असला तरी हसून घे.-----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

१०.

प्रिय फ्रेशर

तू माझ्यावर प्रेम करावं, असा माझा मुळीच आग्रह नव्हता. कारण प्रेम मागून मिळत नाही, प्रेम करावं लागतं; पण त्या प्रेमाचे अर्थ समजून कोणाकडून रिवॉर्ड मिळत नसेल, तर ते प्रेम एकतर्फी बनतं, तेव्हा त्याला विराम दिलेला अधिक चांगलं असतं. कारण काही पॅटर्न प्रेमाच्या लायकीचे नसतात. सुरुवातीला तू प्रत्येक गोष्ट सांगायची. नंतर शांत का झाली? तुझी गरज संपली की, माझी तुला गरज उरली नव्हती? काही कळत नव्हतं. जेव्हा आपला प्रोजेक्ट सक्सेस व्हायचा आणि बॉस माझं कौतुक करायचा, त्यावेळी तुझ्या चेहऱ्यावर बर्फ ठेवल्यासारखा एक थंडपणा दिसत होता. तुझ्या डोळ्यात माझ्या यशाच्या आनंदाची चमक नव्हती. उलट टीममधून उठून बाजूला जाऊन दुसऱ्या फ्रेशरसोबत बसणे तुला चांगले वाटत होते. माझ्या स्तुतीकडे दुर्लक्ष केलं होतं. तेव्हाही तू भावनेने माझ्याशी जुळलेली मला दिसलीच नव्हती. तुझ्या चेहऱ्यावर एक औपचारिक हसू तेवढं असायचं. तेव्हा तुझं माझ्यावर प्रेम नसल्याची जाणीव मला झाली होती. त्यावेळी मी माझा आत्मसन्मान राखायचं ठरवून, ज्याला माझी कदर असेल, त्याच्यासाठीच उर्जा खर्च करायची, असं ठरविलं होतं आणि तुला वाटलं की, मी तुला दूर सारलं; पण तसं नव्हतं. तू प्रेमाची अनुभूती आणून देण्यात कमी पडली. उलट तुझ्या ठिकाणी माझ्याबाबत राग दिसून येत होता. तुझ्यात झालेला हा बदल मी निरखत होतो आणि आपल्या रिलेशनचे धागे तपासत होतो; परंतु बढती झाल्यापासून तू कच्च्या धाग्यासारखी तुटली.

तुला सांगू, जर मी तुला आवडत असतो, तर पहिल्यासारखं तू सर्व गोष्टी मला शेअर करीत राहिली असती; पण जसा काही माझ्यावर तुझा विश्वास राहिला नव्हता, अशा पद्धतीने तू वागली. सुरुवातीला तुझे काम काढून घेतांना तू मजा-मस्ती, हसणं वगैरे सगळं केलं होतं; पण जेव्हा प्रेमाचं विचारायचो, तेव्हा तू विषय बदलायची. चारचौघात माझाशी बोलायची नाही आणि इतरांशी मात्र मनमोकळेपणाने बोलत असे. म्हणजे तू काम होईपर्यंत मला फक्त टाइमपास समजली होती. तुला मनापासून आवडलो असतो, तर तू माझ्या चॅटिंगकडे लक्ष दिलं असतं. फोनवर असूनही तू त्याकडे दुर्लक्ष केलं, हेही मला जाणवलं होतं. हे माझे तर्क आहेत. यात तुला काय खरं-खोटं समजायचं, ते तू समजू शकते. कारण मी तक्रार करत नाही. तुझ्या लक्षात आणून देतो आहे. 'जिथे आपलेपण असते, तिथे प्रथम आणि सहज लक्ष जाते.'

हे बघ, तुला मी विचारणारही नाही, की तू अशी परक्यासारखी का वागली होती? त्याचे उत्तर मीच दिले तर तुझा इगो हर्ट होईल; पण मला तसं करायचं नाही. मी तुझ्यावर प्रेम केलं होतं. तुला नको ती कारणे सांगितले तर तू दुखावशील. तुला दुःख होणं, हा तुझ्यावरील प्रेमाचा अपमान असेल; म्हणून मी तसे करणार नाही; पण काही गोष्टी तुझ्या लक्षात आणून दिल्या पाहिजे, नाहीतर तू म्हणशील, 'सुंठी वाचून खोकला गेला किंवा मला कसं मूर्ख बनवलं', पण तसा विचार करशील, तर तो तुझा भ्रम ठरेल. कारण मी तुझ्या भावना समजून घेत होतो. त्यामुळेच तर तू निर्भयपणे एकांतातही माझ्यासोबत राहायची. रात्री-बेरात्री किती तरी वेळ आपण माझ्या कॅबीनमध्ये प्रोजेक्टसंबंधी चर्चा करत होतो. दोघेही संयम पाळून होतो. तेव्हा तुला सुरक्षिततेची अनुभूती

यायची. मात्र त्यावेळी तुझे मौन आणि खरे रूप मी समजून घेण्यात कमी पडलो. साधासरळ राहून तुझ्या भरोशावर राहिलो आणि फसलो.

तू म्हणायची, 'परिस्थिती वाईट आहे. मला काही पर्याय नाही.' असा ब्लेम करून तू माझ्याबाबत असलेली तुझी जबाबदारी टाळत गेली होती. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये अर्थ शोधण्यापेक्षा स्वतःच्या जन्माचे दुःखच उगाळत बसली होती. तुला स्वतःचं आयुष्य स्वतः ओळखता आले नव्हते. त्यामुळे तुझ्या प्रेमाची मला अनुभूती आलीच नव्हती. तू कशीही असो, दिसो, माझं तुझावर प्रेम आहे; म्हणून मी तुला बांधून ठेऊ शकत नाही. कोणाला बांधून ठेवणं ही मालकी ठरते आणि इथे कोणीच कोणाचा मालक नसतो. हे जाणून मी तुला कधी बळजबरी केली नव्हती की, आग्रह केला नव्हता. माझ्यावर प्रेम करायचं की नाही, हा तुझा प्रश्न होता; पण तू सोडविलाच नव्हता. तुला भीती वाटू नये; म्हणून 'तू फक्त माझीच आहे, अशीही तुला अट टाकली नव्हती आणि गरज म्हणून मी तिकडे पाहिलेच नव्हते. कारण गरज ही प्रेमाला बाधा आणते.

प्रेम ही जाणीवपूर्वक जगायची गोष्ट असते. त्यात केवळ भावना गुंतवून ठेवल्या की, दुःख वाट्याला येते. हे मी ओशोकडून शिकलो होतो. आता तेच तुला सांगतो आहे. एकमेकांची जाणीव ठेवून आणि प्रेम करून सेक्सकडे जायचं होतं आणि त्याला spiritual बनवायचं होतं. ओशो असेही म्हणतो की, 'sex हा पाप नाही, तो नैसर्गिक ऊर्जा आहे. समाजाने त्यावर चुकीचे guilt आणि repression (दडपण) टाकले आहे. sex दाबून ठेवल्यास तो विकृत रुपात बाहेर येतो. त्यामुळे त्याला समजून घेणे, त्याला स्वीकरणे आणि जागरूकतेने

जगणे म्हणजे खरे प्रेम असते आणि ते अतूट बनते.' हे तुला पटो की ना पटो, असे आहे ते-----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

११-

प्रिय फ्रेशर

पहिल्या प्रोजेक्टसाठी तुला माझ्याकडून फीडबॅक हवे असायचे. त्यावेळी तू स्वतःहून पुढाकार घ्यायची आणि फार जवळ यायची. मीही तुझी धडपड पाहून स्वतःहून तुला मोकळंचोकळं, सगळं भडाभडा सांगून टाकायचो. तीन-चार वर्षे अशीच निघून गेली होती. मस्त मजेत. मला वाटायचं की, आपण असेच शेवटपर्यंत सुखी-समाधानी राहू; पण तुझ्या ॲटीट्युडमुळे माझ्या वाटण्याला ग्रहण लागले होते. तुझे दाखवायचे दात वेगळेच दिसत होते, तरीही सिनियर सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून तुझे प्रमोशन केले. तू कॉम्प्लेक्स फीचर हँडल करू लागली होती. ज्युनियर लोकांना गाईड करत होती. डिझाईनबाबतच्या चर्चेमध्ये भाग घेत होती. त्या चार वर्षात तुझा आत्मविश्वास खूप वाढला होता की भारी भरत होती? काही कळत नव्हतं. कारण तुझे एकामागून एक प्रमोशन होत गेले आणि तू मितभाषी बनली. ज्याचं बोट धरून तू करीयरच्या बाबतीत पाऊल टाकायला शिकली, ते बोट सोडून दूर पळून गेली होती. जसे काही दुसऱ्या स्टेपवरच तुझे सारे स्वप्न साकार झाले होते किंवा तेवढंही तुला पुरेसं वाटत होतं. किंवा मीच नकोसा झालो होतो. नेमकं काय, ते तुझ्या आत्म्याला ठाऊक. मी काही चौकशी करणार नाही आणि तू काही सांगावं, ही आशाही आता तू ठेवलेली नाही.

मी तुला व्हाट्सअपवर मेसेज केला होता की, 'मतलबी दुनियेत चांगल्या माणसाची माती होते. चांगली माणसे दुसऱ्यांसाठी जीवाचे रान करतात. त्यांना दुखवणं वाईट गोष्ट असते. कारण माणसांचा माणुसकीवरील विश्वास उडून जातो.' तेव्हा तू एवढंच विचारले होते की, 'हे नेमके अच्छे लोग कोण आहेत बर?' तुला आश्चर्य वाटलं आणि हसली, असे इमोजीही पाठवले

होते. जसे भावना व्यक्त करायला तुझ्याकडे शब्द नव्हते. चार वर्षात हेतू साध्य करण्यासाठी कामापुरते तू भरपूर शब्द वापरायची. बाकी इमोजीच. बायकांचा हाही एक प्रॉब्लेम असतो. माणसाला आपला म्हणून मानतात; पण मन कधी मोकळं करत नाहीत. त्यांच्या मनात भलत्याच शंका आणि भलतीच भीती असते. ते का? तर नंतर सांगेलच.

खरं तर तू चांगली आहेस; पण स्वतःला वाईट समजण्याची तुझी मानसिकता ठीक नाही. 'खरंच बऱ्याचदा अस वाटत की, आपण स्वतःवर खूप अत्याचार केले आहेत. दुसऱ्यांना काय वाटेल, हा विचार करून स्वतःचे मन मारत आलो आहे का?" असेही प्रश्न तुला पडतात. मग इतरांचा विचार करूच नये. दुनिया आणि दुनियाचे नियम गेले खड्ड्यात, अशी धाडशी वृत्ती बाळग. कारण त्याशिवाय तुला स्वास्थ्यपूर्ण जगण्याचा अनुभव घेता येणार नाही. दुसऱ्याचा विचार केला की स्वतःच्या जगण्याला ग्रहण लागते, हे लक्षात ठेव.

तू मनात भीती बाळगत असल्याने कमजोर व सामान्य वाटते. शिकणं आणि समजून घेणं, याशिवाय मजबूत होता येत नाही. धर्म आणि समाज, नैतिकता आणि आदर्श, यांचा भार घेऊन चाललं की, माणूस कमजोर बनतो; पण ती मूल्ये फेकून दे, असं मी म्हणणार नाही. मला एवढंच सांगायचं आहे की, 'माणसाने नैसर्गिक कसे जगावे. त्यासाठी तुला नित्सेचे काही विचार सांगतो. पटतात का बघ. 'समाजाच्या ठराविक नियमांवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच्या क्षमतांचा पूर्ण विकास करून स्वतःचे मूल्य स्वतः तयार करण्यात आपले हित सामावलेले असते. आधुनिक समाजात धर्माचे महत्त्व कमी झाल्याने लोकांनी स्वतःचे मूल्य आणि नैतिकता निर्माण करायला हवी, असे त्यांनी सांगितले असून 'God is dead' असे म्हटले आहे. मग देव आणि धर्माच्या नावाखाली आपल्याला ज्या मर्यादा घालून दिल्यात, त्या पाळून

आपण का म्हणून स्वतःची घुसमट करून जगायचे? देव जर मेलाच आहे, तर आपण आपल्या सुखासाठी स्वतःच का समर्थपणे पुढे जाऊ नये?

तुला सांगू, नीती-अनिती, चांगलं-वाईट, या गोष्टी नको तितक्या डोक्यात भरून टाकल्या की, बाकी विचार मरून जातात आणि माणूस बधीर होतो. हे तू समजून घेतलंच नव्हतं. उलट तू पहिल्यासारखा मोकळेपणा ठेवला नव्हता. तुझ्या बोलण्यात बऱ्याचदा खोटेपणा जाणवत होता; म्हणून मी मिरर ट्रिक शिकलो. म्हणजे तुझ्यासारखंच राहायचं ठरवलं. त्यामुळे मीही मोजकं ठेवढंच बोलत होतो. अलीकडे तर आपला संपर्क आणि बोलणं फारच कमी झालं. म्हणजे घटस्फोट झाल्यासारखं आपण वागत आहोत.

माणसाने असे जीवन जगावे की, ते पुन्हा जगायला आवडले पाहिजे; म्हणून शून्यतेतून नवीन अर्थ निर्माण करणे, हेच आपण ठरविले होते; पण तू भलत्याच बिनबुडाच्या कल्पनांनी तुझे जगणे नावडीचे बनवून टाकले होते. आता ते खरे की खोटे तुलाच माहित. काही असो, एक लक्षात ठेव, इतरांच्या अपेक्षांपेक्षा स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेव आणि 'लोक काय म्हणतील?' यापेक्षा 'स्वतःला काय हवे आहे?' याचा विचार कर. आरामदायक खोलीमधून बाहेर पड आणि रोज थोडं-थोडं उत्कृष्ट होण्याचा प्रयत्न कर. स्वतःची नैतिकता तयार कर. ज्यांची तुला भीती वाटते, त्या माणसांना, समाजाला आणि ज्यांनी तुला दडपण आणणारे नियम शिकवले व धाकात ठेवले, त्यांनाही प्रश्न विचार की, ते तुला तुझ्या इच्छेप्रमाणे का जगू देत नाहीत? -----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१२ -

प्रिय फ्रेशर

जानू, हो जानूच--- तू सोडून गेली तरी, कधी कधी जानू म्हणूनच तुला माझ्यातील गोडवा अनुभवू द्यावा, असे मला वाटते. कारण आपलं काही भांडण झालेलं नाही. आपण जवळ नसलो तरी संपर्कात आहोतच; म्हणून व्हाट्सअपवर पत्रे पाठवित आहे. अलीकडे पोस्टापेक्षा हीच जलद सेवा बनली आहे. तरी तू तिकडे दुर्लक्ष करते. साधे उत्तरही देत नाही. तरीही बघ, 'कदाचित तुला माझं महत्त्व कळलेलं नसेल किंवा मला तू पागल समजली असेल; म्हणून तू माझ्यापासून दूर होत गेली, तरी जीवनात शक्ती, सर्जनशीलता आणि स्वतंत्र विचार महत्वाचे असतात; म्हणून तू विशेष कोणी तरी आहे आणि सुरक्षित आहे, याचे भान ठेव.' हे तुला सांगायचे होते; म्हणून हा शब्दांचा प्रपंच थाटतो आहे. त्याला तू नाटक समजू नको. नाही तरी उलटं समजण्याची सवय इथल्या लोकांना फार आहे. त्याचा एक भाग होऊन माझ्याकडे पाहू नको.

हे बघ, 'जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीसोबत किंवा एखाद्या ठिकाणी असा वेळ घालवतो की, ज्याचा आपल्याला आनंद होतो. ती केवळ एक घटना नसते, तर आयुष्यभर लक्षात राहतील, असे ते क्षण असतात. त्यात भावनात्मक गुंतवणूक होऊन आनंद, प्रेम किंवा जिव्हाळा असतो. मात्र तुला ते क्षण जपता आले नाहीत. कारण तुझ्या धारणा चुकीच्या होत्या. त्याबाबत तुला काही दोष देत नाही. लहानपणापासूनच तुला तसे शिकवले गेले आहे. ते काही सहज पुसले जाणार नाही आणि पुसले जाऊ नये, असे अपवाद सोडले तर सगळ्यांना वाटते; पण त्याचा स्वतःच्या जीवाला त्रास होतो हे नक्की. असा त्रास तूही करून घेतेस.

तू काही गोष्टी लक्षात असू दे. 'एखादी व्यक्ती आपल्या आयुष्यात आली की, ती कायम राहणार असं वाटणं, हा एक भ्रमच ठरतो. त्याचं जीवन हे प्रवाही असल्याने त्याला पकडणं शक्य होत नाही, ही जाणीव त्रास होण्याआधीच झालेली बरी असते; पण होतं उलटंच. एकटे पडण्याच्या भीतीने आणि खालीपण वाटण्याने सहचरला पकडून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.' मी त्या उलट केलं. तू परत आली काय आणि नाही आली काय, याचा विचार सोडून दिला आणि तुझ्या ब्रेकअपची भीती मनातून काढून टाकली. मात्र तुझ्यावर प्रेम होते, तसेच अजूनही आहे. 'प्रेम माणसाला कधीच पकडत नाही. प्रेम म्हणजे मोकळं आकाश आहे, जिथे पूर्ण स्वातंत्र्य असतं. जिथे पकड असते, तिथे प्रेम नसतं, तर तिथे असुरक्षितता असते.' हे ओशोकडूनच शिकलो; म्हणून मला तुझ्याबाबत काही राग नाही. कारण तू काही वस्तू नाही, तर संपूर्ण चेतना आहे. चेतना स्वतंत्र असल्याने तिला बांधून ठेवता येत नाही. तुझे शरीर वस्तू आणि मन चेतना होते. शरीराला पकडता येते, मनाला पकडता येत नाही. तू शरीराने सोबत होती, मनाने नव्हती, त्यामुळे आपले रिलेशन एक ओझं वाटत होतं. ते मी उतरवून टाकले एवढंच. माझं ओझं नसल्याने आता तुला मोकळा श्वास घेता येत असेल, हो ना?

तू प्रेम म्हणजे कामवासना समजली होती; म्हणून तुझी इच्छा नसतांना तुला थांबवणंही योग्य वाटत नव्हतं. तुझे हेतू साध्य झाल्यानंतर तुला जायचं होतं; पण तू कधी बोलून दाखविलं नव्हतं. 'जी खुशी दुसऱ्यावर अवलंबून असते, ती नेहमी अस्थिर असते.' हे मी समजलो होतो. त्यामुळे तुझ्या जाण्याने पूर्णपणे तुटलो नाही तर अधिक जागरूक झालो. तुझी वाटणारी गरज मनातून

काढून टाकली आणि प्रेमाचा धागा तेवढा पकडून ठेवला. कारण 'गरज म्हणते, 'जाऊ नकोस.' आणि प्रेम म्हणतं, 'तुला जायचं असेल तर जा, तुझं सुख माझ्या पकडीपेक्षा महत्त्वाचं आहे.' ही भावना मी राखली. जेव्हा-जेव्हा तुला माझी गरज वाटली, तेव्हा-तेव्हा तुला प्रतिसादच दिला. नकार दिला असता, तर 'तुझ्याबद्दल माझ्या मनात राग आहे.', असं तुला वाटलं असतं. सुरुवातीला मला वेदना झाल्या, रिकामपण जाणवलं. तरी तुझाबाबत माझ्या मनात तक्रारीची वलये निर्माण होऊ दिली नव्हती. उलट त्या मनाला मजबूत करून जगण्याच्या नव्या दिशा ठरविल्या आहेत.

लक्षात ठेव, जीवनात सगळं तात्पुरतं असतं. लोक, नाती, अनुभव हे कायमचे सोबत असत नाही. हे वास्तव मी स्वीकारलं, त्यावेळी एक वेगळी शांतता जाणवू लागली होती. अशी शांतात माणसाला लाभली की, 'तो कुणाला पकडत नाही, कुणाच्या जाण्याने तुटत नाही. फक्त प्रत्येक क्षण पूर्णपणे जगतो. जे राहील ते स्वतःहून राहील आणि जे जाईल त्याला थांबवणं शक्य नाही. शेवटी प्रेम म्हणजे कुणाला पकडून ठेवणं नाही, तर त्याला पूर्ण स्वातंत्र्य देणं आणि ह्याच स्वातंत्र्यात दोघांचं सुख दडलेलं असतं.' हे मी शिकलो होतो. त्यामुळे 'तू एखाद्या वळणावर थांबावं.', हा आग्रह तुला करू शकलो नाही. तसे केले असते, तर पुन्हा तुझ्या मनात तीच शंका आली असती. 'मला तुझ्यावरील प्रेमापेक्षा तुझ्या सौंदर्याचे आकर्षण आणि शरीराची भूक आहे.' असा समज तू करून घेतला असता; म्हणून तुला थांबवले नाही, तर मुक्त केले. पुन्हा सांगतो, 'तू सुंदर नाही. युनिक आहे. तुझ्या युनिकचे आकर्षण असल्यामुळेच तू हवी-हवीशी वाटत होती आणि मी काळजी घेत होतो. मात्र

बाईचा माणसावर विश्वास नसतो. तूदेखील तेच केले आणि अहंकाराच्या वावटळीत पाचोळ्यासारखी उडून गेली. आता कुठे जाऊन पडशील, ती दिशाही तुला ठाऊक नसेल. पाला-पाचोळा हा हवेसोबत भरकटत फिरत असतो, तसेच तुझेही होऊ नये, हीच अपेक्षा करतो. -----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१३ -

प्रिय फ्रेशर

मी ऐकलं आहे की, 'स्त्रीच्या भावना बदलत असतात. त्यांची तशी मानसिक घडण झालेली असते; म्हणून त्या त्यांची गरज दाखवत नाहीत. स्तिर व शांत राहून माणसाच्या वागण्याचे अंदाज घेऊन त्याचे निरीक्षण करतात आणि त्याच्याशी कसे वागावे, बोलावे आणि व्यवहार करावे, हे त्या ठरवतात. माणसाशी खेळण्यात फार चतुर व धूर्त असतात. चिखलातून चालतांनाही कधी तो अंगाला लागू देत नाही. तिचे विचार, मन आणि भावना ती पाऱ्यासारखे चंचल ठेवते; म्हणून तिचे माणसाशी असलेले रिलेशन नेमके कोणते? हेच त्याला कळत नसते. ती कधी पॉझिटिव्ह, तर कधी निगेटिव्ह राहून लपाछपीचा खेळ खेळत असते.

तू सांगितले होते की, 'फिजिकल रिलेशनसाठी तयार होणार नाही. लागल्यास प्रोजेक्ट आणि कंपनी सोडून जाते.' त्यावेळी मीच माघार घेतली होती. कोणाची इच्छा नसतांना काही अपेक्षा करणं, हे भीक मागण्यासारखे असते आणि ते माझ्या स्वभावात नव्हते. 'ठीक आहे' म्हणून तुझ्या हिताचा विचार करून तुला चांगला प्रतिसाद दिला होता. कारण तसे केले नसते, तर मी 'गिव्ह अँड टेक'चा विचार करतो, असे समजली असती. माणसाच्या भोवती असे समज-गैरसमज फार असतात. कारण ते डोळसपणे जगत नसतात. त्यांना सत्याला सामोरे जाणे, कोणी शिकवलेलेच नसते. त्यामुळे नको त्या कल्पना आणि अंदाज करून जगण्याच्या सवयी त्यांना जडलेल्या असतात. अशा समूहाचा तुही एक भाग असल्याने तुला हे सांगितले आहे.

ऋतू बदलतात. उन्हाळा जाऊन पावसाळा येतो. गारवा देऊन जातो. पानगळती होते. नवी पालवी येते. आनंद देते. असा काही तुझ्यातही बदल होईल आणि आपण कायम सोबत राहून सुखाचे क्षण वेचत जाऊ, अशी अपेक्षा बाळगून होतो. कारण बऱ्याचदा तू पॉझिटिव्ह पोज घेत होती; पण हळूहळू लक्षात येत गेलं की, माझ्याकडून कामं करून घेण्यासाठी तू सकारात्मकतेचा रंग उधळायची. मी खूष व्हायचो. तुझ्या मुखवट्याच्या आतील लपलेल्या खऱ्या-खोट्या भावना मला ओळखता यायच्या नाहीत. त्यामुळे तुझ्या बाह्य हालचाली गमतीशीर वाटत गेल्याने कामाचा वेग वाढावायचो; पण तुझं काम झालं की, पुन्हा तू थंड आणि निगेटिव्ह बनायची. इथे खरं तर बाई शहाणी आणि माणूस मूर्ख म्हणावं लागेल; पण समाजाने त्या उलट केलं. बाईला मूर्ख ठरवलं आणि माणसाला शहाणपणाचे डोज देऊन त्याला तिचा बैल करून टाकलं. त्याच्या पुरुषार्थाला आव्हान पेलण्यासाठी उकसवलं. त्यात मीही सापडलो होतो.

तुझा नकार एक वेदना देणारी ठोकर वाटत होती. वाट पाहून मन निराश व्हायचं; पण त्या नकाराला समजून घेतांना त्याचं ओझं होऊ दिलं नव्हतं. आतून तुटलो असतांनाही धैर्य राखले होते. त्यावेळी तू सहज समर्पण केलं असतं, तर मी कमजोर बनलो असतो. सारी उर्जा वाया गेली असती आणि मला पुढे जाता आले नसते; म्हणून तू मला नाकारले ते चांगलेच झाले. कारण मला कंपनीच्या सर्वोच्च पदावर जाऊन पोहचायचे होते. तुझ्या मागे लागून भिकारी व्हायचे नव्हते.

तू तुझ्या निर्णयावर ठाम राहिली होती, तेव्हा मी माझ्या विचार आणि भावनांची खोली स्वतःच मापत होतो. तुझ्याबाबतची अधीरता सोडून तुझी वाट पाहणाऱ्या डोळ्यांना बंद केले होते. कारण तू माझ्यासाठी नाही, हे तुझ्या बोलण्यातून जाणवलं होतं. तेव्हा तुला मिळवण्यासाठी शक्ती खर्च करणे आणि थकून जाणे नको, असे ठरविले होते. डोळ्यातील मोतीबिंदू काढल्यानंतर स्पष्ट दिसू लागते, तसे डोक्यातील वासनेचे बिंदू काढले आणि नशिबाला दोष न देता नवी दृष्टी निर्माण केली. तसे माझे समृद्ध जगणे मला स्पष्ट दिसू लागले होते. यासाठी तुझ्या नकाराचे आभार मानायला हवे.

आयुष्यात ताण येतातच; म्हणून काय त्याच्या भोवऱ्यात गटांगळ्या खायच्या नसतात, हे मी शिकून घेतलं आणि तुज्या भोवऱ्यातून बाहेर पडत गेलो. तुझा नकारात्मक असलेला प्रत्येक अनुभव माझी ऊर्जा वाढवत होता. माणसाला सुख देणं, हा आयुष्याचा हेतू नसतो, तर त्याला सुखासाठी मजबूत बनवणं, हा उद्देश असतो, हे मी शिकलो आणि जीवनात जे मिळायचं ते मिळणारच. जे मिळणार नसेल त्याच्यामागे धावू नये, हे ठरवून टाकलं होतं. बेचैन न होता स्वतःच्या मनाला चांगलं ट्रेनिंग देत गेलो. त्यामुळे मी पुढे झेप घेतली आणि तू मागे पडली. आता कधी तरी तुला माझ्यासोबत यावंसं वाटलं आणि आलीच तरी पहिल्यासारखी तू असणार नाही; हेही तेवढंच खरं. मात्र कशी असणार, हे मलाही सांगता येणार नाही. ते तूच सांगू शकशील; पण मी वाट पाहणार नाही. कारण तुला एक सांगतो, जे मी ऐकलं, वाचलं आणि पाहिलं, तसं समजूनही घेतलं आहे. त्याचं काय की, 'प्रेमाशिवाय स्त्री-पुरुष रिलेशन अतूट व मजबूत होत नाही. त्याच्यासाठी शरीर, मन आणि आत्मा यांनी

एकरूप व्हावे लागते. त्यातील एकही वीट खचली तर रिलेशनचे छत कोसळते आणि तू नेमकी महत्वाची विट टाकून दिली; म्हणून हा घोटाळा झाला. त्यात कोणाचा काही दोष आहे, याचा विचारही आपण करू नये. विचारांपेक्षा चिंतन केलेले बरे.....

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१४-

प्रिय प्रेशर

खरं तर तुझे आभार मानायला हवेत. तू म्हणशील का बरं ? कारण तुझ्या एका नकाराने मी कमजोर न बनता पावरफूल बनलो. तुला खुश करून अधिक जवळ आणण्यासाठी पहिल्या प्रोजेक्टनंतर तुझे प्रमोशन करून घेतले होते; पण तू उलट वागली. माझ्यापासून दूर आणि आपल्या फ्रेशरच्या जवळ जात राहिली. नंतर कामापुरती जवळ आली. तेव्हा तू 'प्लेगर्ल'सारखी वाटत गेली होती. त्यामुळे तुझ्यापेक्षा स्वतःच्या कामावर फोकस करून मजबूत बनण्यासाठी माझा माईंड सेट करीत गेलो होतो. त्यावेळी तुझे स्वप्न पाहण्यापेक्षा सिईओ होण्याचे स्वप्न पाहिले आणि स्वतःच्या कामात गुंतवून घेतले. माझ्यातील हा बदल तुला जाणवला होता, तरी तुझ्यात काही फरक पडत नाही, असे दाखवत होती. म्हणजे मी तुला नकोच होतो. जी व्यक्ती एकासोबत स्थिर राहत नाही, ती कोणाचीच मित्र-मैत्रीण होऊ शकत नाही, हे मला माहित होतं.

तुझे तुटक वागणे मी समजून घेतले आणि स्वतःसाठी नेतृत्त्व गुण विकसित करीत गेलो. एखाद्या परिस्थितीत काय करायचं, हे ठरवण्याची विचारपूर्वक पद्धत शिकत होतो. कोणता विषय घ्यायचा, कुठे गुंतवणूक करायची, कोणता मार्ग निवडायचा हे ठरवीत होतो. समस्या ओळखून पर्याय शोधत होतो. त्याचे फायदे-तोटे पाहत होतो. सर्वोत्तम पर्याय निवडून निर्णयाची अंमलबजावणी करत होतो. सहकाऱ्यांना योग्यप्रकारे मार्गदर्शन व प्रेरित करून त्यांच्या कामातून सर्वोत्तम परिणाम मिळवत गेलो. त्यातून भविष्यातील उद्दिष्ट, दिशा आणि स्वप्न स्पष्टपणे ठरविली. मोठ्या टीम्स आणि प्रोजेक्ट्स हाताळले.

प्रमोशन होण्यासाठी लागणारे निकष पूर्ण केले. तेच एक माझ्या हातात होते. दुसऱ्याच्या हाताकडे पाहून उपयोग नसतो, ती त्याची मर्जी असते. देईल तर देईल, नाही तर, नाही देणार. मग वाटच पाहू नये. असे वाटत होते आणि तुझ्याकडून काही अपेक्षा करण्यापेक्षा आपल्या वेगळ्या वाटा निर्माण करीत गेलो.

तुला समजून घेण्यात काही अर्थ वाटत नव्हता. कारण 'सुंभ जळला तरी पीळ जात नाही', हे मला माहित होतं; म्हणून आपला व्यवसाय कसा चालतो, त्यातील प्रक्रिया, बाजारपेठ, ग्राहक आणि आर्थिक घटक यांचा सखोल अभ्यास करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करून बिझिनेस अंडरस्टँडिंग वाढविली. त्यामुळे मी सिनियर मॅनेजर बनलो. तेव्हा तू आणखी मिळालेल्या प्रमोशनच्या खुशीत मग्न होती. त्यावेळी माझी तुला गरज वाटत नसल्याने अल्पसंतुष्ट दिसत होती. मोठे करीयर करण्याचे तुझे स्वप्न तू विसरून गेलेली वाटायची. मी फक्त तुझ्या बारीकसारीक हालचाली पाहायचो आणि शांतपणे माझ्या कामात असायचो. तू चोरट्या नजरेने पहायची; पण स्वतःहून बोलायची नाही. तुझा इगो तुला तसे करू द्यायचा नाही. तुझा जीव नैसर्गिकपणे कोंडला जायचा, तेव्हा तू उसासे टाकायची. तू म्हणशील, 'मला कसं कळलं? कारण मी बोलत नव्हतो, तरी तुझ्यावरील प्रेम राखून ठेवत होतो. त्यामुळे तुझी अनुभूती मला यायची. मी बोललो असतो, तर तू आणखी भारी भरली असती की नाही? -----

एक लक्षात ठेव, प्रत्येक गोष्टीला प्रतिक्रिया देणं गरजेचं नसतं. शांत राहणं हीच खरी ताकद असते. हे समजून स्वतःला कंट्रोल करीत गेलो.

भावनिकता कमी करून स्वतःच्या चुका शोधून पुढे जात राहिलो. 'Control your mind, Control your life' हे तत्त्व पाळत गेलो. कारण खरी शक्ती स्वनियंत्रण आणि शांततेतून येते, याचा मला साक्षात्कार झाला होता, तो तुझ्यामुळेच. मग मी बदलत होतो, तेव्हा लोकांनी चिडवले, नावं ठेवले आणि निंदाही केली; पण तोपर्यंत मी मनाने कणखर बनलो होतो. कोणाच्या बोलण्याचा माझ्यावर काही परिणाम होऊ देत नव्हतो.

एक लक्षात ठेव, 'प्रत्येक लढाई लढायची नसते. काही लढाया टाळण्यासाठीच असतात.' हे मी ऐकलं होतं. आणि 'जीवन एक खेळ असून तो सोपा नाही. या गेममध्ये एक तर आपण जिंकतो किंवा काही तरी शिकतो. बरेच लोकं हार स्वीकारत नाहीत. बहाणे खूप करतात आणि तिथेच थांबतात. तुही अनेक बहाणे करीत गेल्याचे मी ओळखले होते; पण तू मान्य केलेच नव्हते. त्यामुळेही तुझ्यातील आपुलकी कमी होत गेल्याची जाणीव झाली होती. त्यातून मी शांतात हा पर्याय निवडला होता. ती काही माझी हार नव्हती. त्यावेळी तुझा राग न धरता मी उर्जवान व्हायचे ठरवले होते. कारण शक्तिशाली लोकं हारल्यानंतर इमोशनल होत नाहीत. एखादी गोष्ट खोलात जाऊन समजून घेतात. हारणं समस्या नसते, हार मानणं समस्या असते. या साऱ्या गोष्टी समजून घेतल्या आणि मोटिव्हेशनचे शिस्तीत रुपांतर केले. सामान्य लोकं मूड असेल तर काम करतात, पण असामान्य लोकं मूड नसला, तरी काम करतात. मी असामान्य माणसासारखे माझे काम करीत राहिलो. तसे केले नसते, तर तू माझ्याबाबत नको ते विचार केले असते, 'प्रेमदिवाना' म्हणून हिणवले असते; पण मी तसे होऊ दिले नाही. आपले यश रोजच्या छोट्या-छोट्या शिस्तप्रिय

कृतीती लपलेले असते, हे सत्य जाणवल्याने मी रोजचे शेड्युल तयार करून त्या दिशेने दिवस घालवत राहिलो आणि तुला मागे टाकून पुढे निघून गेलो. त्याबद्दल मनात शंका-कुशंका नको ठेवू. खरं तेच सांगितलं.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१५ -

प्रिय फेलो

तू एकदा म्हटलं होतं, 'तुम्ही डिस्टरब झाले असाल', म्हणजे तुला कळत होतं की, मी तुझ्यात गुंतल्याने माझे स्वास्थ्य बिघडत गेले आहे. तुझं म्हणणं खरही होतं. मात्र त्याचा विपरीत परिणाम माझ्यावर होऊ दिला नव्हता. एकदा डॉक्टर मला म्हणाले होते की, "कौन्सलिंग करून घ्या" तेव्हा मला वाटलं की, 'मी पागल थोडी आहे. उच्च शिक्षित समजदार माणूस आहे.' मग मीच माझा समुपदेशक बनलो; म्हणून मी स्वतः ब्रेकअप केला; पण अजूनही तसं वाटत नाही. का कुणास ठाऊक. एकाच कंपनीत काम करतांना तू सोबत असल्याची जाणीव होत राहते. तू अबोल आणि मीही अबोल, तरीही आपण मनाने एकमेकांशी बोलत आहोत, असे वाटत राहते. हेच तर खरं प्रेम आहे ना? तुला काय वाटतं, मला माहित नाही. मला तरी तसंच वाटतं; वाटणं आणि असणं, यात फरक असतो, तो सांगितल्याशिवाय कळत नसतो.

तुला सांगतो, आपल्या भेटीआधीच मला मार्कस ऑरेलिअन्स माहिती असता, तर आपल्याला दुराव्याची वेळ आली नसती. त्याच्या मते, 'तू दुसऱ्याला बदलू शकत नाहीस, फक्त स्वतःला कंट्रोल करू शकतोस.', हे मला माहीत नव्हतं. तुझ्या मोहाच्या डोहात बुडून गेल्यानंतर ते कळलं, तोपर्यंत बरीच घुसमट झालेली होती. ते तुला कळतही होतं; पण तू जसे नियंत्रणाच्या परीक्षेत गोल्ड मेडल मिळविले होते. असो-

प्रत्येक व्यक्तीचे विचार, भावना, निर्णय वेगळे असतात. आपण कितीही प्रयत्न केला, तरी दुसऱ्याचा स्वभाव बदलू शकत नाही. समोरच्याला कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला, तर नातं जहरी होतं. याची तेव्हा मला जाणीव नव्हती. तुझ्याबाबत भावना निर्माण होणं काही चुकीचं नव्हतं; पण त्यावर नियंत्रण नसणं, हा माझा प्रॉब्लेम होता. तो तू समजून घेतला, हेही खूप झालं, असं आता वाटायला लागलं आणि जे आपल्या हातात नाही, त्याचा स्वीकार केला. दुसऱ्याच्या भावना, नातेसंबंध टिकेल का नाही आणि ब्रेकअप होईल का नाही? या गोष्टी आपल्या हातात नसतात. तुझ्याबाबत जे वास्तव होतं, ते मला मनाने मानता आले नव्हते. त्यामुळे तुझ्यात गुरफटत होतो. याची जाणीव तुलाही झालेली होती, तरी तू फार थंड व्यवहार करायची.

'प्रत्येक स्त्री किंवा पुरुष हा निसर्गाचा भाग असला तरी परस्परांशी आदराने, समजुतीने आणि सहकार्याने वागणे आवश्यक असतं. अति आकर्षण, वासना किंवा राग यामुळे नातेसंबंध बिघडतात. तेव्हा स्वतःच्या भावना आणि इच्छांवर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे', हे मला आधीच कळले असते, तर आपले नाते फार सुंदर बनले असते; पण आधीच्या सवयी जात नाही ना, हाच मोठा प्रॉब्लेम असतो. माझे चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि सद्गुण विसरून तुझ्या बाह्य रुपावर मी जास्त भर दिला होता.

'स्त्री-पुरुष संबंध फक्त आनंदासाठी नसून एकमेकांना चांगले, सद्गुणी आणि जबाबदार बनवण्यासाठी असावेत, याचा विसर पडल्यामुळे तुझी देहासक्ती वाढत गेली होती. नंतर सारं शिकत गेलो, तेव्हा ते कळलं. तोपर्यंत पुलावरून पाणी वाहून गेलं आणि त्यात आपली चांगली चाललेली गाडी

घसरली. नको त्या पुराच्या लोंढ्यात ताटातूट झाली. त्याला नशीब न मानता, आपले अज्ञान म्हणता येईल. एवढं शिकून काही फायदा नाही. कारण तसं जगणं कोणी कोणत्या शाळेतून शिकवत नाही; म्हणूनही त्या चुका होतात.

ऑरेलियंस सांगतो की, 'आपण ज्या व्यक्तीकडे आकर्षित होतो, त्या आकर्षणामागे फक्त शरीर किंवा बाह्य गोष्टी असतात. नात्यात फक्त दिसण्यावर किंवा वासनावर भर देऊ नकोस.' हे सुरुवातीला समजले असते, तर आपल्या नात्याला तडा गेला नसता. आपले नको ते गैरसमज झालेत. आपण एकमेकांना समजून घेण्यात कमी पडलो. प्रेमसंबंध फक्त सुखासाठी नसून चांगला माणूस बनण्यासाठी असावे आणि एकमेकांना इम्प्रू करावं, हेच खरं नातं असतं', हे तेव्हा कळलंच नाही. एकमेकांना मदत करणं, साथ देणं ही नैसर्गिक गोष्ट आहे. हेही लक्षात आलं नव्हतं. कारण तुझे प्रमोशन होईपर्यंत ते तू कळूही दिलं नव्हतं. त्यामुळे मी अंधारात राहिलो होतो. मात्र तुझा स्वभाव आणि हेतू भिन्न होते. त्यामुळे घोटाळा झाला.

ऑरेलियंसने असेही सांगितले की, 'स्त्री-पुरुष संबंध हे वासनेपेक्षा समजुतीवर, रागाऐवजी संयमावर, बाह्य सौंदर्यापेक्षा चारित्र्यावर आणि इगोऐवजी सहकार्यावर असावे', हे आधी कोणी शिकवलंच नव्हतं. ते उशिरा शिकलो. त्यामुळे सारं बिघडून फाटत गेलं. त्याला शिवण्याचा तू प्रयत्न केला नव्हता. त्यावेळी 'तू दुसऱ्याला बदलू शकत नाहीस, फक्त स्वतःला कंट्रोल करू शकतोस.' हे समजलं. तेव्हापासून मी तेच करीत आलो आहे. माझं मन शांत करून आपले नातेही शांत ठेवले. त्यात संघर्ष निर्माण होऊ दिला नाही. शेवटी तुझ्या विचारात न राहणे योग्य वाटत होते. त्याचा अर्थ तू कसा घेतला, हे मला

माहित नाही; पण एवढे खरे की, तुला बदलवण्याचा प्रयत्न थांबवला, तेव्हा कुठे माझे आयुष्य बदलत गेले.

शेवटी एक सांगतो, भावनांवर नियंत्रण नसल्याने आपले रिलेशन विषारी बनू पाहात होते. तू स्वतःला सांभाळून होती. माझाच पाय घसरत होता आणि तोल जात होता. नंतर मी याचे भान राखले आणि 'मन शांत असेल तर नातंही शांत राहील.' हा विचार घेऊन तुझ्याकडे पाहू लागलो. आता तुला ते खरं वाटो की खोटं. जे आहे, ते असं आहे. कसं होतं, कसं असावं? याचा विचार तू कर.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१६-

प्रिय फ्रेशर

तुला सांगू, पुरुष कष्ट करतात, पैसा कमावतात आणि त्याच्या सोबतच्या स्त्रिया आयतं आणि फुकट खातात, अशा स्त्रियांना पुरुषांनी का म्हणून त्यांच्यासोबत ठेवायचं? म्हणजे कष्ट त्याने करायचे आणि तिने आराम करायचा. घाम त्याने गाळायचा आणि तिने एन्जॉय करायचा आणि वरतून त्याला गुलामासारखे राबवून घ्यायचे, असं का होतं? कशासाठी तो तिला इतकं आरामशीर ठेवतो? समाजाने स्त्रीला सर्व परीने सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली आणि दुसरं म्हणजे निसर्गाने त्याला कामुकतेबाबत अधीर बनविले. त्याला समाजाने त्याबाबत मोकळीक दिली. म्हणजे जसे काही त्याच्या आगीत तेल ओतले. त्यालाही स्वतःला सांभाळून राहता नाही आले, हा त्याचा दोष आहे; म्हणून त्याचे आयुष्य ताणतणावाचे बनले. त्याच्या ज्या शारीरिक सुखाच्या गरजा असतात, त्या फक्त स्त्री पूर्ण करू शकते, त्यासाठी लग्नाची बायको म्हणून त्याला एक स्त्री निवडावी लागते. मात्र त्याचे मन फार विचित्र असते. परस्त्रीची भोगासक्ती त्याच्या ठिकाणी असते. इथेही तो चुकतोच; तसे त्याला कोणी बोलत नसते. त्याच्या त्या वृत्तीचा विनाकारण तो ताण सहन करत जगत असतो; पण त्याच्याशी जुळलेली बाई त्याला समजून घेत नाही की, आपण ज्याच्याकडून काही घेतो किंवा ज्याच्या सावलीत आहे, त्यालाही आपण हवं ते दिलं पाहिजे? असं का व्हावं?

तुला ते कळत होतं; पण तू फार मर्यादा पाळत होती. तेव्हा मीदेखील मर्यादा राखून तुझ्यापासून दूर होत गेलो. त्याचा ताण तुझ्या चेहऱ्यावर दिसत

होता; पण तुझा नाईलाज, तसा माझाही होता. मला पुन्हा तुझा 'एआय' व्हायचं नव्हतं. वेगळं झाल्याशिवाय मला स्वास्थ्य मिळणार नव्हतं. तुला माझं महत्त्व कळलं असतं, तर तू माझी काळजी घेतली असती. माझ्याकडे लक्ष दिलं असतं. उलट तू बेफिकीर वाटली. माझ्यापासून दूर जाण्याचे कारण तुला मिळाले. तुझ्याशी असलेले इमोशनल कनेक्शन तूच तोडत गेली, त्याच वेळी मी तुला टाकून देण्याची आज्ञा माझ्या अबोध मनाला दिली होती. कारण तुझी हरप्रकारे काळजी करूनही तू मला एक ऑप्शन समजली होती. 'मी तुला सोडून कुठेही जाणार नाही, असे तुला वाटत होते; पण तूच मला दूर होण्यास कारण ठरली, याचा अपराधभावही तुझ्या चेहऱ्यावर उमटत होता.

तुला सांगतो, कार्ल जंगच्या मते, 'स्त्री-पुरुष दोघांमध्येही एकमेकांचे गुण मानसिक पातळीवर असतात. तुझ्यातील गुण मी घेतले आणि तुझ्यासारखंच वागत गेलो. जंग असेही म्हणतो की, 'आपण जेव्हा कोणावर प्रेम करतो, तेव्हा आपण त्या व्यक्तीवर आपले अंतर्गत स्वप्न, अपेक्षा आणि आदर्श, एक कल्पक प्रतिमा टाकतो.' हे आपण समजून घेतलेच नव्हते. आपल्या मनातील भावना, इच्छा, भीती किंवा गुण एकमेकांवर टाकत गेलो. तुझ्या इच्छा आणि भीती अशा परस्पर गोष्टी तू निसंकोचपणे सांगितल्या. मी तुझा डॉक्टर असल्यासाखे इलाज केले. 'तू खूपच खास आहे.', 'माझ्यासाठीच बनली आहे', असे समजून प्रत्यक्षात माझे आयडियल गुण तुझ्यात पाहत होतो. मात्र तू समजून घेतले नव्हते. हे वास्तव, तुझे प्रमोशन झाल्यानंतर दिसू लागते होते. तेव्हा नात्यात संघर्ष होऊ न देता माघार घेणं मी पसंत केलं. तुझ्या निवडीबाबत चुकीचे निर्णय ठरले, असे वाटत गेले आणि तू नकोशी झाली. कारण निरुपयोगी आणि

निराशादायक लोकांना या जगात काही महत्त्व नसते. लोकं त्यांपासून दूर जातात. तसा मीही गेलो होतो.

मी अवास्तव अपेक्षा केल्यामुळे तुलाही तसेच वाटले. मग मी तुझ्याशिवाय राहू शकतो, हे माझ्या अवचेतन मनाला बजावून सांगितले. तू स्वतंत्र व्यक्तिमत्व असले, तरी व्यक्ती म्हणून परफेक्ट नाही. हे स्वीकारले आणि स्वतःकडे पहायला लागलो. त्यावेळी 'मी आधीसारखा राहिलो नाही.', असे तुला वाटले होते. सुरुवातीला मी तुझ्यासाठी तुला परफेक्ट वाटलो होतो. काही दिवसांनी 'मी बदलला', 'मला तुझी काळजी नाही' असे तुला वाटू लागले होते. मी बदललो, हे खरे होते; पण तुझी काळजी कायम करीत होतो. ते तुला दिसत नव्हते. कारण तू तुझ्या भ्रमाच्या भोपळ्यात अडकली होती. तोच एक घोटाळा केला तू. कारण भ्रमातून बाहेर पडल्याशिवाय माणसाला वास्तव दिसत नाही. तू स्वतःच्या भावना, विचार किंवा कमतरता न स्वीकारता माझ्यावर सोपविल्या. मी त्या समजून घेऊन वैद्यासारखा इलाज करत गेलो. सोबतच माझ्या अपेक्षाबाबत तू स्वतःच संशयी बनली आणि मी 'तूला फसवेल', अशी भावना तुझ्या मनात निर्माण झाली. हे मी जाणले होते. तेव्हाच तू मला युजलेस वाटली होती; पण अर्ध्यातून डाव मोडणे, हा माझा स्वभाव नव्हता.

मी तुला समजून घ्यायला हवं आणि तुझ्यासाठी उपलब्ध असावं, असे तुला वाटत राहिले होते; पण ते कसे शक्य होते. माझी ती गरज तुझ्याकडून पूर्ण करून घ्यायचा प्रयत्न करत होतो; पण तू नुसता खेळ खेळत होती. त्यामुळे उदासीनता यायची. तुला मी अहंकारी वाटत होतो आणि तू मला स्वतःवर खूप नियंत्रण ठेवणारी वाटली होती. या वाटण्यानेच सारे खेळ बिघडत गेलेले

दिसतात. असो. जे होतं ते आपल्या भल्यासाठी होतं, असं म्हणतात. ते खरंही असू शकते.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१७ -

प्रिय फ्रेशर

बऱ्याचदा असं वाटतं की, वासनेच्या डोहात बुडण्याची वेळ येण्याआधीच माणसाला पोहणं शिकता आलं असतं, तर किती छान झालं असतं. परस्परांशी आदराने व समजुतीने आपण वागलो असतो. मात्र अति आकर्षण आणि वासना यामुळे आपल्या संबंधाच्या काचेला तडे पडत गेले. तेव्हा मी स्वतःच्या भावना आणि इच्छांवर नियंत्रण ठेवत असतांना मनातून तुझ्या प्रतिमा पुसल्या जात होत्या. आधी तुझ्या बाह्य सौंदर्याचा विचार करत होतो, नंतर तो विचार पुसून टाकत होतो. 'स्त्री-पुरुष संबंध हे फक्त आनंदासाठी असल्याच्या भ्रमात मी होतो, जेव्हा नातेसंबंधाबाबत असलेला तुझा नैतिक उद्देश कळला, तेव्हा मी मागे हटलो; पण मी अनैतिकतेचे समर्थन करतो, असे समजू नको. आपण स्त्री-पुरुष भेद केला, हेच आपले चुकले होते.

स्त्री आणि पुरुष दोघांनाही नैतिक मूल्यांच्या दृष्टीने समान स्थान मानायला हवे, हे मलाही पटते; पण नैसर्गिक आकर्षण आणि भावना दडपल्या जातात. म्हणजे नैतिकतेच्या नावाखाली दमन होऊन मानसिक स्वास्थ्य बिघडत असेल, तर तूच सांग, 'ती नैतिकता काय कामाची आहे?' ऑरेलियंस सांगतो की, 'आपण ज्या व्यक्तीकडे आकर्षित होतो, त्या आकर्षणामागे फक्त शरीर किंवा बाह्य गोष्टी असतात. नात्यात फक्त दिसण्यावर किंवा वासनावर आधार ठेवू नकोस.' हा एक आदर्श मूल्यविचार झाला. जगातील स्त्री-पुरुष मानसशास्त्र पाहिलं, तर देहासक्तीच्या आकर्षणावर अधिक भर दिलेला दिसतो; म्हणूनच नात्यांमध्ये भानगडी व गैरसमज होतात. तसे काही आपल्याबाबतीत घडले

नाही. न रागवता चुका समजून घेतल्या, इतकी समजदारी आपण बाळगली. एकमेकांबाबत मनात मत्सर व राग असेलही; पण त्याचा आपण स्फोट होऊ दिला नाही, हे विशेष. तेव्हा आपणच आपले कौतुक करायला काही हरकत नाही.

तुझ्याबाबतच्या प्रेमभावना नियंत्रणाबाहेर गेल्याने नातं बिघडू नये; म्हणून मी भावनिक समतोल राखत गेलो; पण तुझा गैरसमज झालेला वाटला. तुला त्यातून बाहेर पडता आले नाही. एकमेकांना साथ देऊन विकास करत जावं, अशा विचारात मी होतो. 'प्रेमसंबंध फक्त सुखासाठी नसून चांगला माणूस बनण्यासाठी असावे. आपण सर्वजण एकमेकांसाठी निर्माण झालो आहोत. स्त्री-पुरुषसंबंधात समजुतदारपणा, संयम, चारित्र्य आणि सहकार्य,' याची जाणीव आपण दोघांनी ठेवली होती. त्यामुळे तुला सहकार्यच करीत गेलो. तरी तू गरज नसल्यासारखी राहून उगीच तुझा इगो जपत गेली. मात्र कोणाचं कोणावाचून अडत नाही. हेही तू लक्षात घेतलं नाही. भारीच भारत गेली. अगं बाई, सौंदर्य हे वयानुसार संपत जातं. संपत नाही, ती सर्जनशीलता आणि कार्य. त्यासाठी असावी लागते एकमेकांची साथ, हेही ध्यानात ठेव.

आजच्या काळात अनेक पर्याय असल्याने स्त्री-पुरुष संबंधांचे फंडे बदलले आहे. डेटिंग, ब्रेकअप आणि लिव्ह इन रिलेशन, या गोष्टी सर्रास घडत आहेत आणि तू बाबा आदमच्या जमान्यात वावरत आहे; पण मी असं म्हणत नाही की, तू नव्या प्रवाहात वाहत जा. काय स्वीकारायचं, तो तुझा निर्णय व अधिकार आहे. कोणत्याही संबंधामध्ये व्यक्तीचा स्वभाव, त्याचे महत्त्व आणि दृष्टिकोन महत्त्वाचे मानले जातात. त्यावरून 'व्यक्ती दीर्घकाळ चांगला सहचर

ठरेल का?' हा विचार केला जातो. तुझा काय विचार आहे, ते तू ठरव. मी मात्र नातं टिकवण्यासाठी ओव्हरथिंकिंग आणि स्वामित्त्वभाव सोडून दिला आहे. त्यामुळे आता तुझा जास्त विचार माझ्या मनात येत नाही आणि स्वप्नही पडत नाहीत; पण तू मनातून गेली, असे काही झाले नाही.

तू जशी आहे, तसा मी तुझा स्वीकार केलेला आहे. तू बदलावं आणि माझ्या मनासारखं वागावं, असा फोर्स कधी केला नव्हता आणि करणारही नाही. स्वतः बदलणे माझ्या हातात आहे आणि मी बदलत जाणार आहे. नदीच्या प्रवाहासारखा खळखळ वाहणार आहे. आयुष्याचं डबकं बनवून जगणं मला तरी शक्य होणार नाही. मात्र तुला कंट्रोल करण्याऐवजी सपोर्ट करणार आहे. इगो बाजूला ठेऊन टीम वर्क सुरूच ठेवणार आहे. तेही बाह्य गोष्टींनी डिस्टर्ब न होता. 'मी विरुद्ध तू' असं न करता 'आपण दोघं विरीद्ध प्रॉब्लेम' असा विचार करून स्वतःकडे लक्ष देणार आहे; पण याचा अर्थ असा नाही की, तुझ्याकडे दुर्लक्ष करेल. कारण प्रेम म्हणजे दुसऱ्यावर नियंत्रण नाही, हे उशिरा का होईना, पण शिकलो आहे मी. आकर्षण येत-जात राहतं; व्यक्तित्त्व मात्र कायम राहतं. तसे आपण कायम आहोत, तेच मी लक्षात घेतलं आणि तुझ्याबाबतचे आकर्षण कमी केले. कारण तुझं मन स्थिर नसायचं; म्हणून आपले नाते अस्थिर झाले. तुला प्रश्न पडेल. का? काय झालं? याचे उत्तरं पुढच्या पत्रांमध्ये मिळतीलच. प्रतिक्रिया आणि प्रतिसाद यातील फरक मात्र समजून घेशील.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१८-

प्रिय प्रेशर

आपल्याला अपेक्षित असलेली नोकरी मिळाली की, आनंद होतो आणि पेढे वाटून तो आनंद शेअर करतो. नंतर आपण आपल्या जबाबदारी आणि कामात गुंतून जात असतांना जीवन कंटाळवाने वाटू लागते आणि पुन्हा काहीतरी आपल्या अपेक्षा व गरजा पूर्ण होण्याच्या आशा आपण बाळगून राहतो. त्यासाठी संघर्षही करत जातो. एक यश मिळाले की, दुसऱ्या यशाच्या मागे धावतो आणि आनंद मिळवतो. अर्थात आनंद स्थायी स्वरुपाचा नसतो. तो येतो आणि पाण्याच्या बुडबुड्यासारखा लगेच संपून जातो आणि शिल्लक राहते फक्त गाळ साचलेल्या जीवनाचे डबके. त्याला प्रवाही बनवायचे असते. त्या प्रवाहाच्या दिशेने जाऊन आपल्याला पुन्हा काहीतरी मिळवण्याच्या लालसा निर्माण होतात. तेव्हा पुन्हा जीवन बोअरिंग वाटते, असे का होते? याबाबत तुला अल्बर्ट कामू यांचे काही विचार सांगतो. त्यांनी 'गरिबीला दु:ख म्हणून नव्हे, तर जीवनाची एक नैसर्गिक वस्तुस्थिती म्हणून स्वीकारलं होतं.' आपण उलटं करतो. परिस्थितीला किंवा व्यक्तीला दोष देतो आणि निसर्गाच्या लांब पळतो. त्यामुळे टेन्शनमध्ये राहतो. क्षय रोग झाला असतांना अल्बर्टला जाणलं होतं की, 'जीवन खूप छोटं आहे आणि मृत्यू कधीही येऊ शकतो.' या विचाराने त्यांचे आयुष्य बदलले. सामान्य माणसं मृत्यूची जाणीव ठेवत नाही; म्हणून ते नैसर्गिक जगण्याला विसरतात आणि दु:खभोग सहन करीत जगत असतात. त्यावेळी त्यांना जीवन अर्थहीन वाटत असते.

अल्बर्टने अर्थहीनता स्पष्ट करतांना 'माणूस जीवनाचा अर्थ शोधतो, पण विश्व काहीच उत्तर देत नाही' असे सांगितले आहे. मग लक्षात घे, आपणही वेगवेगळ्या अपेक्षित उत्तराच्या शोधात आला दिवस घालवत असतो, हाती काय लागतं? पुन्हा तोच प्रश्न समोर येतो. प्रत्येक माणूस रोज उठतो, कामाला जातो, खातो, झोपतो आणि अचानक एक दिवस तो स्वतःला विचारतो, 'हे सगळं का?' याचं काही उत्तर नाही; म्हणून अल्बर्ट त्यास 'अर्थहीनता' असे म्हणतो आणि 'आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवून जगायला सांगतो.' सोबतच जीवनाचे तीन मार्गही सांगतो की, धर्म, कल्पना हा आंधळा विश्वास चुकीचा आहे, आत्महत्या चुकीची आहे आणि सत्य स्वीकारून जगणं योग्य आहे. मी आधीपासून याच दिशेने वाहत राहिलो आहे.

समाजाला सत्यापेक्षा दिखावा जास्त मान्य असतो. मला तेच जमले नाही. त्यामुळे अनेकांकडून माझी फसवणूक झाली. माणसाच्या जीवापेक्षा कोणतीही गोष्ट मोठी नसते; म्हणून मी समाजाचे आंधळे नियम मोडून स्वतःच्या मनासारखे करत गेलो. ज्याला पटलं तो सोबत, नाही पटलं तो दूर गेला. शेवटी ज्याची त्याची मर्जी. सार्थक व निरर्थक यातील भेदच कोणी समजू शकले नाही. 'कोणतीही विचारधारा एका निरपराध व्यक्तीच्या जीवापेक्षा मोठी नाही.' हे मान्य केले तर इथे समाजाला किंवा लोकांना काय वाटते, हे महत्त्वाचे नाही. तुझा जीव महान आहे. तो स्वतंत्र आहे; म्हणून लोकांचा विचार सोडून स्वतःसाठी जग. कारण 'जीवन अर्थहीन असलं, तरी त्याला अर्थपूर्ण बनवणं आपल्याच हातात आहे.' हेही त्याचं मत महत्त्वाचं आहे. तुला तेच सांगत होतो की, अर्थपूर्ण जगून घे; पण भलत्याच खुळचट कल्पनांचे किडे तुझ्या डोक्यात साठले होते. मी मात्र एकच करीत गेलो, जीवनाला कोणताही ठरलेला अर्थ

नाही; म्हणून मी काही निराश न होता प्रामाणिकपणे जगायचे ठरवले होते, ते अनेकांनी समजून घेतलेच नाही. तेव्हा समाजाला नेमकं काय हवं असतं, तर त्याच्या सोयीने आपण चाललं पाहिजे आणि मला ते अजिबात शक्य झालेले नाही. त्यामुळे मी सगळ्यांना उलटप्रवाही वाटलो. त्यांनी माझी निंदा केली; त्याच्याशी मी काही घेणे-देणे ठेवले नव्हते.

परिस्थिती कशीही असली, तरी आहे ते जीवन स्वीकारून पुढे चालत राहायचं. जगणं थांबवायचं नसतं. हे तर मी मनानेच फार आधीपासून ठरवत आलो होतो; म्हणून तुझ्या प्रेमभंगाचा माझ्यावर काही परिणाम झाला नसावा. तुला जे निरर्थक वाटत होतं, त्याविरुद्ध लढणं हेच खऱ्या अर्थाने जगणं आहे, असं समजून स्वतःची ग्रोथ करणं, हे त्यावर उत्तर शोधलं होतं. हार न मानता तुझ्याबद्दलच्या आकर्षणाविरुद्ध संघर्ष करत राहणं, हेच खरे यश होते आणि मी ते मिळविले. आपण आपल्या स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीही स्वीकारली, तर संघर्ष निर्माण होणार का? सांग.' माणसं स्वतःचा विचार करतात आणि जबाबदारी विसरतात. मी मात्र जबाबदारी जास्त स्वीकारत गेलो होतो; म्हणून थकलो होतो. आता आला दिवस महत्त्वाचा मानून भविष्य किंवा भूतकाळ, यावर जास्त विचार न करता, वर्तमान क्षणाचा आनंद घेत राहिलो. आणि तू परंपरेचा विचार करून भूतकाळाला बळी पडत तुझ्या वाट्याचे वर्तमान क्षण गमावत राहिली. शेवटी 'जीवनात आनंद शोधणं, हेच खऱ्या अर्थाने जगणं आहे.' असेही अल्बर्टने सांगितले. प्रत्येकाच्या आनंदाचे केंद्र वेगवेगळे असतात. तुझे कोणते? ते तू ठरव. मी कोण तुला सांगणारा? -----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

१९ -

प्रिय फ्रेशर

तू सुरुवातीला माझ्याशिवाय राहत नव्हती. नंतर तुला नवे सर्कल मिळाले आणि मला सोडून सुसाट पळाली. शेवटी तुझी इच्छा असल्याने माझं काही दुमत नव्हतं. फक्त एवढंच की, करियर ग्रोथ करण्यासाठी सोबत हवी होती. तुझी बढती झाल्याने तू फुग्यासारखी फुगली आणि हवेत तरंगत राहिली. मी तुझ्यात इतका अडकलो होतो की, नातेवाईक, मित्रमंडळी आणि स्वतःची कामे सोडून तुला फार आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो. तो माझा स्वार्थही होता. त्याला तू वासनांधता म्हणशील; पण तसे नव्हते. शेवटपर्यंत दोघांनी समर्पित आयुष्य जगावे, हा त्यामागे मूळ हेतू होता; पण तो तुला कळलेला नव्हता.

हे बघ, समर्पण म्हणजे केवळ कमजोरी किंवा दुसऱ्यासाठी स्वतः हार मानणे नव्हे. प्रेम हे जबाबदारी, समानता आणि स्वातंत्र्य यांचा संतुलित संगम आहे, असे अनेक तज्ञांनी सांगितले आहे. मी तर तेच करीत आलो होतो; पण तू त्याचे अर्थ वासनांचे चुकलेले पेज म्हणून डिलीट करीत होती. विषय बदलून पुढे नेत होती. म्हणजे तुला कायमचे रिलेशन नको होते. नाही तरी बाईने कोणासोबतही राहणे, ही काही जगाची रीत नाही, हे मलाही माहिती होतं. तू परंपरा-प्रिय आणि मी परंपरा-भंजन, असा परस्पर विरोधी सूर आपल्यात असल्याने तुझ्यामध्ये समर्पणाची भावना नव्हती. 'स्त्री-पुरुष संबंधात समर्पण म्हणजे शारीरिक आकर्षणापेक्षा आत्मिक सौंदर्याकडे जाणे.' असे प्लेटोचे मत आहे.

'उत्तम स्त्री-पुरुष संबंध हे मैत्रीवर आधारित असतात. समर्पण म्हणजे एकमेकांच्या कल्याणासाठी काम करणे, पण स्वतःची ओळख न गमावता.', असे ॲरिस्टॉटलनेही म्हटले आहे. 'स्त्री-पुरुष संबंधात समर्पण म्हणजे अंधपणे स्वतःला देणे नाही.' असे कांट म्हणतो. तसेच 'भारतीय तत्त्वज्ञानात समर्पणाला त्याग, सेवा आणि प्रेम यांच्याशी जोडले जाते.' इथे नैतिकदृष्टया समर्पण ही संकल्पना स्पष्ट दिसते. त्यात प्रेम व हितसंबंध हे समान दुवे आहेत. मात्र जिथे स्त्री-पुरुष प्रेमसंबंध असतात, तिथे स्त्रीसाठी समर्पण हे एक दडपण बनते. तुलाही ते दडपण आलेच होते; म्हणून तू प्रेमाची कबुली कधी दिलीच नव्हती. त्यामुळे समर्पणाची भावना तुझ्यात कोणत्याही अंगाने जाणवली नव्हती. आता प्रेम, समर्पण आणि सेक्स या अंगाने मी विचार करतो, तेव्हा नैसर्गिकरितीने मला ओशोचे विचारही आठवतात. त्यांच्या मते, ''समर्पण प्रेमातून यायला हवे, बळजबरीतून नव्हे. जेव्हा दोन व्यक्तींमध्ये खरे प्रेम असते, तेव्हा समर्पण आपोआप घडते, त्यासाठी प्रयत्न करावे लागत नाही. समर्पण ही प्रेमाची नैसर्गिक अभिव्यक्ती आहे.' तू कधी स्पष्टपणे ते प्रकट केले नव्हते. तोही तुझा दोष नव्हता. प्रेम आणि समर्पण म्हणजे सेक्स हेच परंपरेने तुझ्या मनावर बिंबवले होते; म्हणून सोबत असली की, तुला भीती वाटायची. मग मी सहज दूर जायचो, ते तुझ्यासाठीच. ओशोच्या विचारात त्याचे कारण दडलेले आहे. 'खरे नाते म्हणजे दोघांचाही समर्पित सहभाग. अहंकाराचा त्याग, नात्यात समर्पण करतांना व्यक्ती जाणीवपूर्वक आणि सजग असावी.' मी तर सजगतेचे तत्त्व पाळले होते. त्यामुळे ओरबडण्याचा विचारही कधी मनात आला नव्हता, याची खात्रीही तुला पटलेली होती. 'तसे असते, तर तू कधीचीच कंपनी सोडली

असती', असे तूच सांगायची. मग मी तुझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवायचो आणि तुला सांभाळायचो.

ओशोने 'समर्पण आणि सेक्स यांचा संबंध अत्यंत खोल आणि अध्यात्मिक असल्याचे सांगितले आहे. त्यांनी सेक्सला केवळ शारीरिक क्रिया न मानता प्रेम, समर्पण आणि ध्यान (meditation) याकडे नेणारा एक मार्ग मानला होता. त्याच मार्गाने आपल्याला शुद्धपणे जायचे होते; पण ते तू समजून घेतलेच नव्हते. तुझ्या अटीट्युडशी तू फेविकॉलसारखी चिकटून होती. त्यांच्या मते, 'सेक्स ही एक ऊर्जा आहे, जी योग्यप्रकारे अनुभवली तर ती उच्च स्तरावर जाऊ शकते. जेव्हा दोन व्यक्ती पूर्णपणे एकमेकांमध्ये विलीन होतात, तेव्हा समर्पण घडते. जर मनात भीती, नियंत्रण किंवा वर्चस्व असेल, तर तो फक्त शारीरिक संबंध घडतो. जर पूर्ण समर्पण असेल तर तो गहन प्रेमाचा अनुभव असतो.' हाच अनुभव तुला द्यायचा होता; पण तुझा स्वतःवरच विश्वास नव्हता. 'मी आणि तू' यात एक भिंत तू निर्माण केली होती. त्यामुळे समर्पण घडलेच नाही. समर्पण म्हणजे सेक्सला अध्यात्मिकतेकडे नेणारा पूल असतो, तो पूल बांधण्याची तुझी तयारी नव्हती. त्यामुळे आपले अध्यात्मिक जीवन विस्कटून गेले. आता इथे कोणा एकाला दोष देण्यापेक्षा तू जुनी व मी नवा, असे मानून जो तो ज्याच्या-त्याच्या ठिकाणी योग्य आहे. असे मला वाटते. तुला काय वाटते, ते तू ठरव.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२०-

प्रिय फ्रेशर

एकदा असंच आपण लंच टाइममध्ये बाई-माणसाविषयी बोलत होतो. तेव्हा तू म्हणाली होती, " बाई कळतच नाही माणसाला. तिला समजून घेता येत नाही. 'खरं होतं तुझं म्हणणं; पण बाई का कळत नाही?' ते सांगतो. तुझे मन, तुझ्या भावना, विचार आणि तुझी सहनशक्ती अनेकदा सहजपणे समजत नव्हती. तू समजू देत नव्हती. डोळ्यासमोर अंधाऱ्या आल्यासारखी राहायची. 'स्त्री ही सहनशील, प्रेमळ आणि त्यागी असते. तिच्या मनातील भावनांची खोली समजणे कठीण असते. स्त्री ही शक्ती आणि करुणेचे प्रतीक मानले असून तिच्यात नैतिक ताकद असते. ती निसर्गासारखीच गूढ आणि सुंदर आहे. तिच्या भावनांमध्ये एक अनाकलनीय आकर्षण असते. तिचे मन आणि भावना खोल असतात. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू लगेच समजत नाहीत', असे अनेक जाणकारांनी सांगितले आहे. मात्र मी एक सामान्य माणूस म्हणून तुला समजून घेतांना चुकीचे अर्थ लावत होतो आणि तू मनावर नियंत्रण ठेवून संपत्ती व सौंदर्यावर भारी भरत होती. चारित्र्य म्हणजे दागिना समजत होती आणि मी त्याला शून्य किंमत देऊन तुझे सौंदर्य पारखत होतो. तू स्वतःच्या विचारांचे आणि कृतींचे परीक्षण करीत नव्हती. तू नैतिक आणि सद्गुणी जीवन जगणं, अशी एक चौकट तयार करून त्यात स्वतःला कोंडून घेतले होते. त्यातून तुला मुक्त करायचे होते; पण तू ऐकले नव्हते.

'स्त्री कमी किंवा दुर्बल नाही; तीही विचार करू शकते, योग्य-अयोग्य ओळखू शकते आणि निर्णय घेऊ शकते.', हे मान्य करून तुही एक स्त्री म्हणून

तशीच घडलेली दिसली होती. राग, भीती, लोभ यांवर नियंत्रण ठेवून संयम आणि धैर्य जोपासत होती; म्हणून युनिक वाटत होती. मी मात्र निसर्गाच्या नादी लागून सामाजिक नीतीमूल्यांची चौकट मोडू पाहत होतो. कदाचित पहिल्यापासून जीवनाची निरर्थकता वाटत गेल्याने त्याचा अर्थ तुझ्यात सापडला असावा. इथे तुला शोपेनहावरचे काही मतं शेअर करतो. 'माणसाचे जीवन काही आनंदाचा उत्सव नाही, तर इच्छा आणि दुःखाचे एक चक्र आहे.'; म्हणून प्रेम, यश, आनंद हे आपण मानून चालतो. एक मिळालं की पुन्हा दुसरी इच्छा तयारच असते. ते सगळे भ्रम ओळखून इच्छांवर मात केली की, दुःखातून मुक्ती मिळते. बुद्धानेही तेच सांगितले आहे. 'जोपर्यंत इच्छा आहेत, तोपर्यंत दुःख आहे. इच्छा संपल्या की शांतता मिळते.' हे कधी तरी कळलं होतं. मग तुला समजून घेऊनच इच्छा मारून शांततेसाठी स्वतःवर नियंत्रण ठेवत होतो; पण तुला वाटत होतं की, 'बाईला समजून घेणं सोपं नाही.'

मी तुला समजू लागलो तेव्हा इच्छा, वासना आणि प्रेम यात फार अंतर असल्याचे लक्षात आले. आपण ज्याला 'खरं प्रेम' समजतो, ते प्रत्यक्षात निसर्गाची एक युक्ती आहे. आपल्याला वाटतं आपण स्वतः निर्णय घेतो; पण ते जैविक कार्य आहे. प्रेमात पडल्यावर तीव्र आकर्षण असतं. नंतर ते कमी होतं. कारण निसर्गाचं काम पूर्ण झालेलं असतं.' त्याला टिकवून ठेवणं व्यक्तीच्या हाती असतं; पण तुझे हातच बांधलेले दिसले. त्यामुळे तू निसर्गाच्या विरोधात जाऊन सामाजिक धारणा बाळगत गेली होती.

इच्छा म्हणजे कमतरता आणि कमतरता म्हणजे दुःख. जीवन हे दुःख आणि कंटाळा यांच्यामध्ये झुलत राहतं. कायमस्वरूपी आनंद मिळणं अशक्य

आहे. कारण माणूस सतत इच्छांच्या मागे धावत असतो. मीही एक माणूस. मी तरी अपवाद कसा असेल. तुझ्या इच्छा वेगळ्या आणि माझ्या वेगळ्या होत्या. जसे समांतर असलेले दोन रेल्वे रूळ होतो आपण. कधीच एकमेकांना न भेटणारे. मेंदूत फक्त कल्पनाचित्रे तयार होतात. त्यामुळे खरी वास्तवता कळतच नाही; म्हणून आपण इच्छा बाळगून चालत असतो. नको त्या इच्छांचा गुलाम बनून जगतो. त्यामुळेच तुला समजून घेता-घेता मी खूप छोटा होत गेलो होतो. इतका की माझं अस्तित्वच पुसलं जाणार की काय, असं वाटायला लागलं होतं; पण मीच मला नवा जन्म दिला. त्याविषयीच मी तुला हे सारं सांगत आहे. तुला काय समजून घ्यायचं, ते समज.

तुझ्या प्रमोशनसाठी खूप धावपळ आणि कष्ट करता-करता फार थकलो होतो. तूच माझे लाइफ म्हणून सतत तुझाच विचार करायचो. मात्र उलटंच झालं. तुझे तिसरे प्रमोशन झाल्यानंतर यश आणि पैसा तुझाकडे आला आणि माझा विसर तुला पडला, तेव्हा 'हेच का असतं प्रेम', असा प्रश्न मला पडला. तुझ्यासाठी जे काही केलं होतं, ते स्वतःहून काहीच करत नव्हतो. माझ्या इच्छाच मला श्रम करायला भाग पाडत होत्या; पण त्याकडे तू लक्षच दिले नव्हते. एवढं सगळं करूनही ख़ुशी मिळालीच नव्हती. शेवटी 'जाऊ दे, काहीच नको', असं माझ्या अबोध मनाला बजावलं, तेव्हा कुठे जरासा शांत झालो आणि तू म्हणते, 'बाई कळत नाही.' मला कळली होती, तुझ्यातील बाई; म्हणून तर मी संपण्याआधीच माझा नवा जन्म झाला. तोही अपेक्षाभंगातून आलेल्या दुःखाचे ऊर्जेत रूपांतर केले तेव्हा.....

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२१

प्रिय फ्रेशर

तुला एक आठवण करून देतो, तुझे पहिले प्रमोशन झाल्यानंतर तुला ऐंशी-नव्वद हजार रुपये पगार मिळणार होता. त्याआधीच तुझं कौतुक केलं होतं, तर तू म्हणाली होती, 'पहिला पगार हातात पडला की, संन्यास घेण्याची इच्छा आहे आता...' टाळू नका प्लीज(बोलणे)' तुझे परस्पर विरोधी भाव माझ्या लक्षातच आले नव्हते. म्हणजे विरक्ती आणि आसक्ती असा संगम कसा शक्य होणार होता बरं? कारण इच्छांचा त्याग करून मध्यम मार्गाने जीवन जगायचं असतं. तुला तर पगार आणि माझं असणं, तेही बोलण्यापुरतेच. दोन्ही हवे होते. इथे एक लक्षात घे, 'संन्यास म्हणजे भौतिक जगातील आसक्ती, अहंकार आणि इच्छांचा त्याग करून आत्मिक उन्नतीकडे वाटचाल करणे.', असे अनेक तज्ञ, संत आणि तत्त्वज्ञांनी सांगितले आहे.

दुःखातून मुक्ती मिळवण्यासाठी संसाराचा त्याग करणे. संयम, ध्यान आणि शील हे त्याचे आधार आहे, असे बुद्धाने सांगितले. 'संन्यास म्हणजे पलायन नव्हे, तर निस्वार्थ सेवा आणि आत्मनियंत्रण.' असे विवेकानंद यांचे मत आहे. 'साधेपणा, सत्य आणि अहिंसा यांचा स्वीकार म्हणजे सन्यास.', हे म. गांधी यांनी सांगितेल आहे. याचा अर्थ असा की, 'संन्यास म्हणजे केवळ बाह्य स्वरूप बदलणे नव्हे, तर मनातील वासनांचा त्याग करून नि:स्वार्थ आणि शांत जीवन जगणे होय.' हा सर्व विचार करता तू संयम, शील, आत्मनियंत्रण आणि शांत यातच पास झाली होती. बाकी सर्व मोहमयी जीवनाची आसक्ती तुझ्या ठिकाणी मुरलेली होती. तुझे बाह्य रूप सर्वसामान्यच होते. मला किंवा

अन्य कोणाला टाळण्याचा तो बहाणा असावा, असे आता कुठे वाटायला लागले होते; म्हणून तुला ती आठवण करून दिली आहे.

तुला पुरुषांविषयी राग असल्याने लग्न नको, नवरा नको की कोणीच नको होतं. मात्र वैयक्तिक सुखवाद हवा होता. स्वच्छंदीपणा, मौजमस्ती तुला आवडायची; म्हणून तुला एकदा 'प्लेगर्ल'ची उपमा दिली होती. त्याचा अर्थ समजून न घेतल्याने तुला रागही आला होता. मग या गोष्टींना संन्यास तरी कसं म्हणणार?

खरं तर 'आपण सगळे आपल्या आयुष्यात काही ना काही करत असतो. आपल्याला चांगलं वाटावं, हीच सुखदायक इच्छा त्यामागे असते. कोणाला अपेक्षित यश, कोणाला पैसा, कोणाला प्रतिष्ठा तर कोणाला प्रेम हवे असते. प्रत्येकाची भावना वेगवेगळी असते. म्हणजे आपण जे काही करतो, त्यामागचा अंतिम उद्देश सुख मिळवणं असतो. तुझा उद्देश पैसा आणि करीयर करून सुख मिळवणं आणि माझ्याकडे त्या दोन्ही गोष्टी भरपूर असल्याने तुला मिळवून सुखी होणं, असे भिन्न हेतू होते आपले. त्यामुळे आपण एकरूप होऊ शकलो नाही. आपापले हेतू साध्य करण्यासाठी धडपडत होतो; पण त्या त्या कृतीच्या वेळी 'खरंच यामुळे आपल्याला सुख मिळेल का ?' हा प्रश्न मनात येत नव्हता; म्हणून आपण तडजोड करीत चालतच होतो.

आता हे बघ, अरिस्टिपस या ग्रीक तत्त्वज्ञाने, 'जीवनाचा उद्देश म्हणजे वर्तमान क्षणातील आनंद. भविष्य अनिश्चित आहे आणि भूतकाळ संपला आहे. म्हणून वर्तमान पूर्णपणे जगा.' असे सांगितले आहे. मी तर वर्तमानाचा चाहता होतो. तू मात्र भूतकाळाचे ओझे वाहत भविष्याच्या स्वप्नात रंगली होती आणि

वर्तमानाला दोष देत होती. अनेक विचारवंत आणि तत्त्वज्ञ यांनी सुखाच्या संकल्पना सांगितल्या आहेत. त्याकडे तू पाहत नव्हती. तसे कोणी त्या फार पाहत नाहीत. फक्त सुख आणि सुखच म्हणत, जो तो विचार करतो आणि बोलत असतो. नेमकं काय काही कळत नाही. मला जे कळलं ते असं आहे. तुलाही सांगून टाकलं. आता कसा विचार करायचा ते तू ठरव.

आपल्या ठिकाणी भीती, चिंता, अनावश्यक इच्छा नको, सुख महत्त्वाचं आहे; पण प्रत्येक सुख सारखं नसतं. त्याबाबत तुझी कल्पना वेगळी आणि माझी वेगळी आहे. क्षणिक आनंद पुरेसा नसतो. संतुलन आणि जागरूकता गरजेची असते. हे समजूनच मी माझ्यात बदल करून घेतला आहे. कोणी बदलायचं की नाही, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. प्रत्येकाने आपल्यासारखं व्हावं, असा विचार करणं बावळटपणाचं लक्षण आहे. 'वर्तमानातील जगण्याचं खरं उद्दिष्ट म्हणजे सुख समजून निवडणं', हा विचार मला महत्त्वाचा वाटतो. कारण समस्या सुखात नाही, तर अज्ञानात असते; म्हणून आपण जागृक असले पाहिजे. आपल्याला कशाची ना कशाची सतत उत्तेजना हवी असते. ते काही सुख मानले जात नाही, तर ती एक सवय तयार करून घेतो आपण. त्याबाबतची सवय तुला सांगितली होतीच; पण आता त्यात बदल केला आहे. कारण सवयी बदलल्याशिवाय माणसाला सुखाची अनुभूती येत नाही. 'आपण जे निवडतो, ते आपल्याला कुठे नेतंय? आपण खरंच फक्त सुखासाठी जगतो का? तुम्ही कोणतं सुख निवडता?' असे काही प्रश्न समोर आले, तेव्हा 'सुखाच्या मागे धावलात तर स्थैर्य मिळणार नाही.' हे समजून घेतले आणि बाईला समजून घेण्यापेक्षा तेच महत्त्वाचे वाटले. तेव्हा माझ्या अबोध मनात एक बीज पेरले. मी पूर्वी जसा जिनियस होतो, तसाच

आता जन्माला घालायचा आणि अलौकिक जीवनाचे सुख अनुभवायचे. तेच चिरंतर वाटले आणि मी स्वतःला माझ्या कामात गुंतवून घेतले. हा माझा स्वार्थ नाही. तूदेखील तसे करायला काही प्रॉब्लेम आहे का तुला ?

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२२ –

प्रिय फ्रेशर

तू एकदा मस्त मूडमध्ये होती. माझ्या केबिनमध्ये आल्यानंतर म्हणाली होती, 'खूप स्मार्ट दिसत आहात आता. तुझे ते एक वाक्य माझ्या मनात कोरले गेले होते. 'शेवटपर्यंत असाच राहील. तू असणार न् सोबत.' मी म्हटलं होतं, तेव्हा 'अजून बराच काळ आहोत सोबत' हे तुझं उत्तर जरा शंका निर्माण करणारं वाटलं होतं. म्हणजे काही काळानंतर सोबत असणार नाही, असा त्याचा अर्थ होता. आता तो खरा ठरलेला आहे. तू धूर्तपणे फटाफट प्रमोशन करून घेतले. मी कंपनीचा डायरेक्टर झाल्यानंतर तुला मॅनेजर व्हायचे होते. त्यासाठी तू सर्व काही गोष्टीला 'हो' म्हणत होती आणि भविष्याची स्वप्ने दाखवत होती. मात्र जवळ आलो की, दूर जात होती. हा तुझा खेळ माझ्या लक्षात आल्यानंतर तुझ्यामध्ये ब्रोकन मिररिंग दिसत होते.

तुला माझ्या भावना कळत होत्या. हावभाव समजत होते; पण तुला जुळवून घेता आले नव्हते. तू योग्य प्रतिसाद देत नव्हती. त्यामुळे आपल्या नात्यात दुरावा निर्माण झाला. तुझ्यासाठी ते योग्यही झालं. माझं प्रतिबिंब तुझ्यात नको होतं; म्हणून ते काचेसारखं तोडलं तू. याबाबत माझी काही एक तक्रार नव्हती. कारण पहिल्यापासून तुझ्या वाट्याला तुटलेल्या भावनांचा आरसा, म्हणजे ब्रोकन मिररिंग आलेला होता. तुझ्या लहानपणापासूनच्या भावनिक असुरक्षितचे अनुभव तू सांगितले होते; म्हणून तुही माझ्याशी तशीच वागत होती. तुला स्वतःबद्दल संभ्रम असल्याने माझ्या भावना आणि विचार समजून घेत नव्हती. तुझा भूतकाळ सांगून, बहाणे करून, तर कधी लॉलीपॉप

दाखवून नकारात्मक प्रतिसाद देत वेळ निभावून नेत होती. मीच मूर्ख की, तुझ्यात बदल होण्याची वाट पाहत तुला समजून घेत होतो. त्यात काही वर्षे निघून गेलीत. त्यात माझा बराच काही लॉस होत गेला होता.

कधी-कधी मी रोमॅंटिक मूडमध्ये तुला हिरोईन समजून जसे काही तुझ्यासोबत सिनेमाचे शूटिंग करायचो, तर तू संकोच करायची. खुलायची नाही. तुझ्या चेहऱ्यावर स्पष्ट नाराजी दिसायची. मग मी मागे सरून नाराज व्हायचो, तेही तुला कळायचं आणि मी खूष राहावं; म्हणून तुला केलेल्या स्पर्शाकडे दुर्लक्ष करायची. जसं 'वाईट गोष्ट आपण स्वीकारलीच नाही, तर ती परत समोरच्या व्यक्तीकडे जाते' असं काहीसं तत्त्व तू शिकलेली होती; म्हणून ती गोष्ट तू न स्वीकारल्याने मलाच घेरून राहिली होती. त्यातून होणारी घुसमट आणि तगमग समजून न घेता 'मी जास्त विचार करतो.' असं म्हणून तू मलाच दोषी ठरवायची. मात्र रोमॅंटिक प्रतिसाद देत नव्हती. तुला भीती वाटायची ते मला कळत होतं. तुझ्यासाठी रोमान्स कठीण असल्याचेही समजत होतं. त्यामुळे मी स्वतःवर कंट्रोल ठेवून तुला सुरक्षिततेची जाणीव करून देत होतो. कारण तू माझ्यावर विश्वास टाकलेला होता. त्यामुळे त्याला तडे जाऊ द्यायचे नव्हते मला. कारण तो अमानुषतेचा कळस ठरला असता. सगळेच पुरुष तसे नसतात, हेही प्रू करून द्यायचं होतं.

तुला सांगू, माझ्याबाबत तुझ्यात आत्मविश्वास आणि भावनिक समज नसल्याने तू परकी वाटायला लागली होती. तुझ्यात आत्मविश्वास कमी असल्यामुळे रोमॅंटिक भावना व्यक्त करण्यात तुला अडचण यायची आणि तू मौन धारण करून आपल्या कामात लक्ष घालायची. मलाही विषय बदलून

कामाकडे पाहायला सांगायची. तेव्हा आपण सोबत असूनही एकटेपण जाणवायचं. 'तुझा सहवास, वाटे उदास भकास' हे मी गमतीने म्हणायचो. त्यावरही तू काहीच प्रतिक्रिया द्यायची नाही. त्यामुळे तुझा ब्रोकन मिररिंगच आपल्यात दुरावा निर्माण करून गेला आहे; पण एक चांगली गोष्ट आहे की, त्याचा आपापल्या जगण्यावर आपण विपरीत परिणाम होऊ दिला नव्हता. मग याला काय म्हणावं? प्रेम की मैत्री? मला वाटतं, तू मैत्री राखली होती आणि मी प्रेम केलं होतं. आता तुला काय वाटेल, हा तुझ्या मनाचा प्रश्न आहे.

सुरुवातीला माझ्या ठिकाणी एक वेड, हट्ट, ध्यास आणि मनोग्रस्तता होती. तुझा फारच विचार करत होतो. तसे तू बोलूनही दाखविले होते. म्हणजे जखम दिसत होती, पण तुझ्याजवळचा मलम वापरण्याची तुझी इच्छा नव्हती, तर तू ब्रोकन मिररिंगचं तंत्र वापरत होती. तो दोष तुझा नव्हता. बाईच्या जातीला ते टेक्निक उपजत असते. बऱ्याच माणसांना ते कळतं, तरीही ते बाईला भावनिक सुरक्षितता देतात आणि तिच्यावर विश्वास ठेवतात. मात्र जेव्हा विश्वासघात झाल्याची खात्री त्यांना पटते, तेव्हा ते दुःखात बुडतात. नाहीतर अनेक जण तिच्यात गुरफटून स्वतःचा सत्यानाश करून घेतात. ते फार कमजोर असतात; म्हणून तसे घडते. समजदार माणसं स्वतःहून दूर होतात. त्यांची ती समजदारी म्हणजे एक नवा जन्मच असतो.

शेवटी एक लक्षात घेशील, नातेसंबंध किंवा स्त्रीबद्दल एकतर्फी आणि दिशाभूल करणाऱ्या गोष्टी सांगतो, असे समजू नको. प्रत्येक स्त्री काही तशी नसते. कोणतेही स्त्री-पुरुष एक सारखे नसतात. ते नातेसंबंध, व्यक्तीचा स्वभाव आणि कनेक्शनवर अवलंबून असते. आपण तर परस्पर आदर राखून समतोलच

राखलेला होता. मर्यादा राखून चांगुलपणा ठेवलेला होता. त्यामुळे आपल्यात कधी वाद-विवाद झालेच नव्हते. मी प्रयत्न करीत होतो, तू प्रतिसाद देत नव्हती. तुला माझ्याकडून फक्त 'तू बरोबर आहेस', 'तू चांगलं केलंस', 'तुझी एक किंमत आहे', अशी दाद हवी होती. मी तेही केले होते. शेवटी थकलो आणि शांत झालो.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२३-

प्रिय फ्रेशर

तुला आठवतं की नाही, मला माहित नाही. आपण एकमेकांपासून दूर असल्याने तुला विचारताही येणार नाही, तरी तो प्रसंग सांगतो. एकदा आपण दोघेच माझ्या केबिनमध्ये नव्या प्रोजेक्टवर चर्चा करीत होतो. कागद आणि फाईली चाळतांना आपला स्पर्श व्हायचा. तुला सहज अलगद स्पर्श करून गंमत म्हणून विचारले होतं की, 'काही सेन्सशन वाढलं का? गुदगुल्या होतात का?' तेव्हा तू म्हणाली होती, 'नाही, नकोसं वाटतं अजून.... हे कामं पूर्ण करायचे म्हणजे आपले मार्ग मोकळे होतील. तुमच्याइतके पॅकेज मिळाले की, मग सुरू' मला वाटलं, तुझी तयारी आहे; म्हणून तुला 'फिजिकल रिलेशन...?' असं विचारलं तर तू म्हणाली, 'सध्या नाही सांगू शकत.', असं होतं तुझं मन. ना संवेदना, ना भावना. मला तर कोरड्या विहिरीत उडी मारल्यासारखं झालं होतं. तू मात्र कधी तळ्यात तर कधी मळ्यात. असा खेळ खेळून दोन्हीकडून मजेत असायची. मी आपला गाळात रुतून बसायचो आणि तू जिंकून माझी गंमत पहायची.

असेच एकदा तू छान आकर्षक गुलाबी साडी घालून आली होती आणि मी मनोमन विचार करत होतो की, 'हीच लाईफ पार्टनर बनली तर?'; पण मानला पडलेले प्रश्न अपुरेच राहून जातात, अशी आपल्या जगण्याची रीत बनलेली आहे. ते तोडून पुढे जाण्याचे फारसे धाडस कोणी करत नाही. खाजगीत मात्र काहीही चालतं. मग आपण कॅन्टीनला चहा घेतांना तुला हळूच म्हटलं, 'आज फार सेक्सी दिसते आहे. काय इरादा आहे?' तेव्हा इतकी सुंदर दिसूनही चेहरा

उतरवून म्हणाली होती, 'कसला इरादा आणि कसली सेक्सी सर. सेक्सी दिसलं की बाईच्या जातीची माती होते.' तू असं म्हणल्यावर गोड चहाही कडू लागत होता आणि मी एकेक घोट घेत तुझ्या चेहऱ्यावरच्या भावना वाचत होतो, शून्य होऊन. तेव्हा तू विचारलं, 'काय विचार करता आहे?' मी मात्र निरुत्तर. ----- उगीच भिकाऱ्यासारखं तुला भीक मागत असल्याची मला लाज वाटत होती आणि तुझ्याबाबतची करुणा माझी कमजोरी ठरत होती.

एकदा निकोलो मॅक्यावेलीसारखा गुरु भेटला आणि मी हळूहळू बदलत गेलो. 'जग आणि नातेसंबंध आपण समजतो तितके साधे, प्रामाणिक आणि खरे नसतात. लोक अनेकदा जे बोलतात ते आणि जे प्रत्यक्षात करतात ते वेगळं असतं; म्हणून त्यांच्याविषयी आकर्षण नको. कारण आकर्षण हे लॉजिक किंवा नैतिकतेवर चालत नाही. ते इंटरेस्ट, अनिश्चितता आणि महत्त्व यावर चालतं. ते कमी करण्यासाठी मी रोज काही विचार शिकत होतो. त्यातून एक गोष्ट लक्षात आली होती की, 'खूप उपलब्ध असलं तर माणसाची किंमत कमी होते.' जसे, पाणी सहज व भरपूर मिळते; म्हणून माणसाला त्याची किंमत कळत नाही. दुष्काळात मात्र लोकं पाण्यासाठी मरमर करतात. अशावेळी आपणच आपली किंमत ओळखायची. भावनांवर नियंत्रण ठेवून आपल्या मार्गाने सरळ चालत राहायचं. कोणाच्या मागे धावलं, त्याच्यासाठी खूप प्रयत्न केले, तर तो दूर पाळतो. हाती लागत नाही; म्हणून जाणाऱ्याला जाऊ द्यावं. तो त्याचा प्रश्न असतो; म्हणून मला एकतर्फी प्रेम झूठ वाटत गेलं होत. कारण तू असून अडचण, नसून खोळंबा बनलेली होती.

तुला सांगतो, मी कसा विचार करत गेलो ते. प्रेमापेक्षा आधी सेल्फ रिसपेक्ट महत्त्वाचा वाटला होता. लोकांच्या शब्दांपेक्षा त्यांच्या वागण्याचे निरीक्षण करीत होतो. जिथे आपली कोणी कदर करत नसेल तिथे न थांबलेलं बरं. स्वतःची किंमत कमी करून कोणालाही इम्प्रेस करायची गरज नाही. आपणच आपल्याला प्रभावी बनवत जायचं आणि ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या ठिकाणी ठेवायचं, असेच ठरवत गेल्याने माझ्या हृदयातील तुझी जागा कमी कमी होत गेली; पण प्रेम आटले, असे समजू नको. आता मी खूप मोठ्या कामात असतो. तुला परत फिरून यायचे असले, तरी तुझे नक्कीच स्वागत असणार आहे.

शेवटी तुला जॉर्ज गुर्जिएफ या अध्यात्मिक गुरुचे म्हणणे सांगतो. 'आपण विचार न करता तीच-तीच दिनचर्या करत राहतो. आपण एक यांत्रिक जीवन जगत असतो, त्यावर बाहेरची दुनिया नियंत्रण ठेवते. त्यामुळे आपली स्वओळख पुसली जाते. जोपर्यंत आपण स्वतःला ओळखत नाही, तोपर्यंत आपण एक मशीन असतो.'; त्यामुळे आपण आपल्या सवयी आणि प्रतिक्रिया यांच्यात अडकून, आपोआप जगत असतो. चाकोरीबाहेर जात नाही; म्हणून त्या मशीनचा भाग बनतो. नेहमीच्या दिनक्रमात अडकून आपण समाजाच्या अपेक्षा, इतरांचे विचार आणि बाह्य दबाव यामध्ये इतके अडकतो की, आपली खरी ओळख हरवतो, हे काही खरे आयुष्य नसते. खऱ्या आयुष्यासाठी 'जीवन जगत असतांनाच जागृत राहण्याचा मार्ग' गुर्जिएफ यांनी सांगितला आहे. शारीरिक आणि मानसिक सराव, आत्मनिरीक्षण म्हणजे प्रत्येक कृतीची जाणीव ठेवणे, कठीण आणि अनपेक्षित चाचण्या म्हणजे विचित्र परिस्थितींना सामोरे

जाणे, स्वतःला ओळखणे हेच खरे स्वातंत्र्य आहे. आपले निर्णय खरंच आपले नसतात. ते बाह्य परिस्थितीने लादलेले असतात.' असे काही त्यांच्याकडून शिकायला मिळाले. आता तूच ठरव की, तू स्वतःला ओळखायला कधी शिकणार? की, 'ऑटो-पायलट' म्हणूनच जगत राहणार?

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२४-

प्रिय फ्रेशर

मला वाटत होतं की, आपण लग्न नाही केलं, तरी कुठल्या ना कुठल्या कारणाने आपण एकत्र राहणार. त्यासाठी स्त्री-पुरुषाच्या जैवक नियमानुसार तुला फिजिकल रिलेशनबाबत विचरले होते. तेव्हा तू गोंधळात पडली होती. 'होकार' किंवा 'नकार' काहीच न देता मौन पाळले होते. एकदा तू व्हाट्सअपवर चॅटिंग करून तुझ्या भावना व्यक्त केल्या होत्या की, 'कळतच नाही, का असे होते. ती एक गोष्ट सोडली तर बाकी सगळ्या गोष्टीत माझ्या एवढी पॉझिटिव्हिटी कोणात नसेल बहुतेक? बऱ्याचदा वाटते बोलावे; पण माहित नाही ना समोरचा कसे घेईल ते?' ही तुझ्या मनाची अवस्था पाहून तुला सांगितले होते की, 'कोणतीही एकच भूमिका घेतली पाहिजे. एक तर ठाम नकार, नाहीतर होकार. कारण त्यामुळे व्यक्तीची विचार करण्याची पद्धत बदलत जाते. कुठल्या एका गोष्टीत अडकून पडता येत नाही. त्रास करून घेण्यापेक्षा त्यातून बाहेर पडता येते.' हे तुला बरे वाटले होते. 'Hmm.... I wish' असे सांगून 'बघू या काय होतं ते...' अशी तू पुष्टी केली होती. त्यावेळी तुझा होकार गृहीत धरला होता. आता वाटते, तो माझा एक वेडेपणा होता.

तुला माझ्या मनाची अधीर अवस्था जाणवत होती. मी नाराज होऊ नये; म्हणून माझे मन सांभाळत होती आणि म्हणतही होती की, 'पण प्लीज असे कधीही विचार करू नका सर. की, मी तुम्हाला कामापुरते वापरते वैगरे. माझे प्रमोशन होवो अथवा न होवो, तुमच्याशी माझे संबंध असेच शेवटपर्यंत स्वच्छ आणि निर्मळ राहतील. माझ्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टीत तुम्ही सहभागी

असाल...' असा नकारही दिला होता. तुला म्हटलं होतं, 'बदलण्यातही हित असते. बदल हा मानवी जीवनाचा एक चांगला गुण आहे.' तर तू तेही सकारात्मक घेतले होते आणि 'आयुष्यात विचारही बदलत जातात... काळानुसार.... हेच बरोबर.' असे म्हटले. म्हणजे नेमकं काय तेच मला कळत नव्हतं. मीच 'सॉरी...सकाळी-सकाळी तुला न आवडणारा विषय छेडला' तुला बरे वाटले आणि 'मला खूप टेन्शन आलं होतं. का माहित नाही पण...' हे तू सांगितले. मी 'पुन्हा सॉरी...' म्हणून 'तुला टेन्शन येईल असं कधीही करणार नाही', म्हणून प्रॉमिस केलं होतं. तेव्हा तू एक मोकळा श्वास घेऊन 'It's ok sir' म्हणत 'तूम्ही समजून घेतात, हीच खूप मोठी गोष्ट आहे सध्या माझ्यासाठी', असे कौतुकही केले होते. 'त्यातच खरे प्रेम व जिव्हाळा असतो...नाही तर माणूस व राक्षस यात फरक नसतो...' याला तू 'हो नक्कीच...' असा दुजोरा दिला आणि 'काही गोष्टींना वेळ लागतो, पण जेव्हा जे होतं ते बऱ्यासाठीच होतं...' असंही सांगितलं होतं. त्यावेळी म्हणजे नेमकं काय, तेच कळलं नव्हतं, अशी तुझ्या मनाची दोलायमान स्थिती असल्याने तुला लवकर समजून घेताच आले नव्हते.

मी स्वतःची जाणीव ठेवून स्वतःकडेच लक्ष देऊ लागलो होतो. त्यासाठी 'जो जाणतो त्याच्याकडून शिकले पाहिजे.', असे मी ऐकले आणि विचारवंत लोकांचे धडे गिरविले. 'मनुष्याकडे जे आहे त्याचा उपयोग करावा, जे नाही त्याची आशा करू नये.' हे तत्त्व मी आत्मसात केले. माझ्या कार्यपद्धती आणि कृती समजून घेऊन स्वतंत्र जगण्याचा विचार केला. आपण कोणावर राज्य करू शकत नाही, तेव्हा स्वतःवरच राज्य करायचे ठरविले. आपल्याकडे

जे आहे त्याचा उपयोग करावा, जे नाही त्याची आशा करू नये, असे ठरवून स्वतःचे स्किल वाढवत गेलो. भ्रम आणि मायेतून बाहेर पडून वास्तव समजून घेतले.

प्रत्येक सवय तुटल्यावर माणसात बदल घडतो. हा विचार करीत मी तुझ्याविषयीच्या विचारांची सवय तोडून टाकली आणि स्वतःशी संघर्ष करीत प्रगतीचे परिणाम साधत गेलो. 'तुम्ही तुरुंगात आहात. जर बाहेर पडायचे असेल, तर आधी हे मान्य करा की, तुम्ही तुरुंगात आहात. जर तुम्हाला वाटत असेल की, तुम्ही मोकळे आहात, तर तुम्ही कधीच सुटू शकणार नाही.' हे ऐकल्यानंतर वासनांच्या तुरुंगातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक गोष्टीसाठी एक ठराविक वेळ आणि कालावधी जावा लागतो. तसा मी हळूहळू त्यातून बाहेर पडत गेलो. कोणत्याही क्षणी मृत्यू येऊ शकतो, याची जाणीव झाल्याशिवाय आपल्याला स्वतःवर काम करण्याची मोठी प्रेरणा मिळू शकत नाही. हेही समजून घेतले होते.

मृत्यू निश्चित आहे. मृत्यूची भीती बाळगण्यात काही अर्थ नाही. त्या भीतीमुळे आपण जगू शकत नाही. मग जगायचं तर जे समोर येईल त्याकडे तटस्थपणे पाहून जगायचं, त्यास बळी पडायचं नाही, या विचाराने थंड होऊन तुझ्याकडे पाहत होतो. 'प्रत्येक स्त्रीला वाटतं की, कोणी तिच्या भावनांना नाकारू नये, त्यांना कमी लेखू नये, त्यावर हसू नये.' तुलाही तसेच वाटत होते. तू जे जे सांगितले, ते ते सर्व समजून घेतलं होतं. त्यामुळे तू माझ्यावर खूप विश्वास ठेवला होता. ज्या गोष्टी कुणाला सांगू शकत नव्हती, त्या हळूहळू सांगत गेली आणि मी खरंच तुला समजून घेण्यासाठी ऐकलं होतं. तुला एक सुरक्षित भावना

निर्माण होण्यासाठी प्रत्यक्ष कामंही केली होती. त्यावेळी 'कोणी तरी माझा त्रास, माझा संघर्ष, माझ्या भावना खरंच समजून घेतल्या.', असे तुला वाटले होते. त्यामुळे आपले एक गहिरं नातं तयार होऊ लागलं होतं. कोणत्याही शारीरिक स्पर्शापेक्षा तुला ते नातं खोल वाटलं होतं. तुला प्रश्न न विचारता तुझ्या डोळ्यांत पाहून सगळं समजू शकत होतो. मी तुला जाणून घेतलं, हे तुलाही कळत होतं. 'जेव्हा एखाद्या पुरुषाचं वागणं स्त्रीच्या भावनांशी जोडतं, तेव्हा ती त्याच्यासमोर स्वतःला लपवू शकत नाही. कारण स्त्रीचं मन स्वभावतः भावनिक नात्याच्या शोधात असतं.' असेही ओशोने सांगितले आहे. मी तर तेच केले होते; म्हणून आपले नाते जुळले होते; परंतु मी शेवटी पुरुष आहे ना? म्हणून निसर्गाने बदमाशी केली आणि माझ्यातील जैविक प्रवृत्तीमुळे आपल्या नात्याला वेगळे वळण मिळाले, ते तुला नको होते; म्हणून मी स्वतःच तुझ्यापासून दूर होणे पसंत केले.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२५-

प्रिय फ्रेशर

आपण एकदा व्हाट्सअपवर बोलत असतांना त्याबाबत तुझं मत जाणून घेतलं होतं. शेवटपर्यंत डेटिंग करायचं, हा त्यामागील हेतू होता. तर तू मोकळेपणे सांगून टाकले होते की, 'मला नाही आवडत ते. सॉरी वाईट वाटून घेऊ नका; पण मला खरचं नाही आवडत तो नाश्ता.' तेव्हा मी म्हटलं होतं, 'खूप खूप आभार तुझे.', तर म्हणे, 'का? तूम्ही का? मीच मानते तुमचे आभार, समजून घेतल्याबद्दल. त्याबाबतीत कठीणच आहे असे वाटते. बाकी सगळे अगदी छान आहे. फक्त त्यामुळे राग करू नका प्लीज. ती मुद्दाम नाही करत. राग आला? एक गोष्ट सोडली तर बाकी सर्व गोष्टी मान्य असतात. मग तीही गोष्ट समोरच्याने मान्य करायला हवी, हेही भावना सांभाळायची पद्धत असते.', असे तू सांगून टाकले होते.

आपण गप्पा मारत असतांना मी तो विषय छेडला होता, अधून मधून मला जसे त्याचे फिटच यायचे. मीच काय जगातील सगळ्या पुरुषांना त्या गोष्टीचे फिट आल्याशिवाय राहत नाही. फरक एकच आहे, कोणाला अधून-मधून येते, तर कोणाला उघड, तर कोणाला गुपचूप येते; पण ते येतेच. तेव्हा तू म्हणाली होती, 'ती गोष्ट मुळीच आवडत नाही म्हणून...' मला वाटलं, 'तुझा नकार म्हणजे होकार आहे.' कारण स्त्रीच्या नकारात होकार असतो. हा समाजात पसरलेला गैरसमज माझ्याही ठिकाणी रुजलेला होता. नंतर तुझ्या ठाम निर्णयाने तो दूर झाला आणि मी डोळसपणे विचार करत गेलो होतो की, 'विवाहबाह्य संबंधांविषयी स्त्रियांची अनिच्छा हा एकसारखा किंवा सर्वांवर लागू होणारा

नियम नाही'. याबाबत अनेक समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि विचारवंतांनी काही सामान्य कारणे मांडलेली आहेत. ते मी समजून घेतलीत आणि तुला मोकळे केले. केवळ तुला माझा त्रास होऊ नये म्हणून. त्यामुळे तुझ्या लग्नाचा प्रश्नच उरला नव्हता.

'स्त्रियांना सुरक्षित आधार हवा असतो. विवाह हे नाते बहुतेक वेळा हा सुरक्षित आधार देत असते. विवाहबाह्य संबंधामुळे हा आधार तुटू शकतो. त्यामुळे स्त्रिया अशा संबंधांपासून दूर राहतात.' असे जॉन बोल्बी यांनी सांगितले आणि तुझे मानसशास्त्र मी समजून घेतले. तुझा माझ्यावर विश्वास नसेल म्हणून 'नकार' तर कधी 'होकार' यांच्या लाटांवर तुझे मन झुलत होते. 'भारतीय समाजात स्त्रियांसाठी नैतिकतेचे निकष कठोर असल्यामुळे त्या अशा संबंधांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. भारतीय समाजात स्त्रियांसाठी 'निष्ठा' आणि 'पावित्र' या मूल्यांना जास्त महत्त्व दिले जाते. त्यामुळे स्त्रिया स्वतःहूनही हे नियम पाळतात.', असे एमिल दुर्खीम यांनी सांगितले आहे. त्यात तुही काही अपवाद ठरली नव्हती. तू तर त्या गोष्टी पाप समजत होती. पतीनिष्ठा मानून त्यांना धोका देऊ नये, असे सांगत होती. ते तुझे आंतरिक बोल नव्हते. तर तुझ्यावरील समाजाच्या धारणांचे आणि संस्काराचे ओझे होते. त्या सवयीने तू बोलत होती. मग मी तुला विचारलं होतं, 'पुरुष जेव्हा परस्त्रीकडे जातो तेव्हा ते पाप नसते का? तो पत्नीला धोका देत नाही का?' यावर तू सांगितले होते की 'माणसाला कोणी बोलत नाही. त्याला सगळं माफ असतं. आम्ही काही केलं की शिक्षा मिळते.'

याच अर्थ असा की, स्त्रियांचे वर्तन हे केवळ वैयक्तिक नसून समाजाच्या नियमांवर, नैतिक मूल्यांवर आणि सामाजिक नियंत्रणावर अवलंबून असते. त्यामुळे तुला वेगळे पाऊल उचलता आले नव्हते. फ्रॉईड यांच्या मते, 'स्त्रियांमध्येही या इच्छा असतात; पण त्या समाजामुळे दडपल्या जातात. त्यांच्यावर सामाजिक आणि नैतिक नियंत्रण अधिक प्रभावी असते.' एस्थर पेरेल यांनी सांगितले आहे की, 'विवाहबाह्य संबंधांमुळे नात्यात विश्वासघात, अपराधीपणा आणि तणाव निर्माण होतो. या भावनिक गुंतागुंतीपासून वाचण्यासाठी स्त्रिया अशा संबंधांपासून दूर राहतात.' अशाप्रकारचे अनेकांचे मतं मी जाणून घेतले, तेव्हा तुझ्या नकारात्मक भूमिकेला, बदलत्या मन, भावना आणि विचारांना समजून घेता आले. त्यामुळे त्याबाबत तुला कधी आग्रह, विनंती किंवा बळजबरी, असं काहीच केलं नव्हतं. सगळं तुझ्यावर सोपवलं होतं; पण तू म्हणत होती, 'आता माझे लग्न झाले. मी कंपनी सोडणार आहे. तेव्हा आपण केवळ जास्त जवळ न आलेले बरे.' तेव्हा मी मुकाट्याने तुला तुझे पूर्ण स्वातंत्र्य बहाल केले. आता तुला काय वाटेल, ते तुझं तुला माहित.....

विवाहबाह्य संबंध न आवडण्यामागे स्त्रियांच्या भावनिक गरजा, सामाजिक बंधने, नैतिक मूल्ये आणि कुटुंबाची जबाबदारी ही प्रमुख कारणे असतात. त्या चौकटबाहेर सहसा कोणी जाण्याचे धाडस करत नाही, हे माहित असूनही तुझे आकर्षण कायम असणे, हा माझा वेडेपणा होता. मात्र 'प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. त्यामुळे सर्व स्त्रियांबद्दल एकच निष्कर्ष काढणे योग्य नाही. कारण 'आपण समजतो तसं कधीच नसतं. आपण विचार करतो एक आणि समोर येतं दुसरंच; म्हणून आपल्या विचारांपेक्षा समोरच्या परिस्थितीला समजून

घेणं, हे खूप महत्त्वाचं असतं. आपल्या जीवनात खूप लोकं येतात आणि जातात. कोणी जवळचे असतात, कोणी दूरचे असतात, कोणी मार्गदर्शक, कोणी आप्तेष्ट, तर कोणी मित्र असतात; पण जो तो आपापल्या ठिकाणी मग्न असतो. आपल्यासाठी तो नसतोच. जो आपल्यासाठी असतो त्याला त्या गर्दीत ओळखता आले पाहिजे.' हे समजले तेव्हा तुला ओळखू लागलो होतो आणि तुला मनोमन सुखी संसाराचे आशीर्वाद देऊन मी दोन पावले मागे सरकलो होतो.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२६-

प्रिय फ्रेशर

एकदा आपण सकाळी व्हाट्सअपवर बोलतांना मला पुन्हा ते फिट आले होते. दोघांच्या बोलण्यात विरोधाभास होता. तू स्पष्टपणे सांगितले होते की, 'कमतरता माझ्यातच आहे सर. तुमचा काही दोष नाही. तुम्हाला फिजिकलशिवाय कुठलेही संबंध मान्य नाहीत का? म्हणजे स्वच्छ, निर्मळ मैत्री मान्य नाही का? असे विचारत आहे. चुकीचे समजू नका. माझी पूर्ण इच्छा मरून गेलेली आहे त्या बाबतीत....' यासोबत स्माईलचा इमोजीही दिला होता. तू सिरीयसली सांगते की, गंमत करते आहे, नेमकं काय तेच कळत नव्हतं. बाईच्या जातीचं असंच अधांतरी असतं. स्पष्ट काही नसतं. त्यामुळे ती समजायला कठीण असते.

तुला सांगतो, स्त्रीच्या कामेच्छाबाबत मी ऐकले, वाचले होते की, 'ती एकसारखी, सरळ किंवा फक्त शारीरिक गोष्ट नाही. ती स्त्रीच्या मानसिक, भावनिक, जैविक आणि सामाजिक घटकांचा मिश्र परिणाम आहे.' यात तू स्वतःला विसरून सामाजिक घटकच पूजत गेली होती; म्हणून तुला ते पाप वाटायचे. त्यामुळे भावनिक जवळीकता, विश्वास आणि सुरक्षितता, याची प्रचिती माझ्याकडून आली असतांनाही तुझी इच्छा निर्माण व्हायची नाही. त्याचे कारण तुझ्या खाजगी जीवनात लपलेले होते. सतत ताण, चिंता आणि दुखावलेपण तुझ्या चेहऱ्यावर दिसायचे. तुला विचारले, तर 'जाऊ द्या सर. नेहमीचंच आहे ते.', असं म्हणून काही बोलायची नाही. तुला जास्त पॅकेजसाठी प्रमोशन करून घेणं आणि आई-वडिलांची जबाबदारी, भावाचे शिक्षण आणि

बहिणीचे लग्न, हे सगळं ओझं उतरावयाचं होतं. त्यात तुझ्या कामेच्छा मरून गेल्या होत्या, असे तू सांगायची. ते खरं की खोटं? फक्त तुलाच माहीत होतं. आतमध्ये थोडी डोकावून पाहता येत होतं; म्हणून तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेऊन चालत होतो.

तू आत्मसन्मान बाजूला ठेऊन तुझ्या मनात भीती व अपराधबोध ठेवायची. तुझी तब्बेत ठीक नसायची, तुला झोप नसल्याने थकवा जाणवायचा. तुझा हार्मोन्सचा प्रॉब्लेमही होताच. त्यामुळेही तुझ्या कामवासना दडपल्या जायच्या. आपल्या संस्कृतीमध्ये स्त्रियांच्या इच्छेला दाबलं जात असल्याने तू व्यक्तही व्हायची नाही. लाज-शरम राखायची. काय योग्य, काय अयोग्य, याच्या कल्पना करायची आणि 'चांगली गोष्ट नाही सर ती', असं म्हणून तो विषय टाळायची. मी म्हणायचो, 'निसर्गाविरोधी राहते; म्हणून तुझी तब्बेत चांगली नसते.' तर 'मी ठीक आहे.' म्हणून समर्थन करायची आणि कामाला लागायची.

फ्राइडने कामऊर्जा ही माणसाच्या वर्तनाची मुख्य शक्ती मानली होती. कार्ल जंगच्या मते, 'स्त्रीची कामवासना ही केवळ शारीरिक नसून आत्म्याशी आणि भावनिक जगाशी जोडलेली असते.' तसेच 'फक्त शारीरिक उत्तेजन पुरेसं नसतं. मन आणि भावना यांचाही मोठा वाटा असतो. स्त्रियांची इच्छा आणि प्रतिक्रिया वेळेनुसार बदलू शकते. पुरुषांची प्रतिक्रिया अनेकदा-उत्तेजना, इच्छा, मग प्रतिसाद, अशा सरळ रेषेसारखी असते; पण स्त्रियांची प्रतिक्रिया वर्तुळासारखी असू शकते. आधी भावनिक संबंध, मग आराम आणि सुरक्षितता, मग हळूहळू इच्छा निर्माण होते आणि ती प्रतिसाद देते, असेही संशोधन झालेले आहे. तू मात्र चेतनाहीन राहायची. त्यामुळे अगदी दगड

ठरलेली वाटत होती. अचेतन, निर्जीव अशी. ती ऊर्जा तू दाबून ठेवल्याने तुला शारीरिक प्रॉब्लेमही निर्माण झाले होते. इलाज करायचा तर त्याकडे नकारात्मक पाहायची.

आता बाई आणि माणूस यांच्या इच्छातील फरक सांगतो. समजा एक जोडपं आहे. पुरुष कामावरून घरी येतो, त्याचा मूड ठीक असतो. त्याला लगेच शारीरिक जवळीकतेची इच्छा होऊ शकते. याउलट स्त्रीचं असते. दिवसभर थकलेली आहे, तिच्या मनात काहीतरी ताण आहे किंवा कदाचित दोघांमध्ये आधी थोडा वाद झाला आहे . अशा वेळी पुरुष तयार असू शकतो; पण स्त्रीला इच्छा वाटत नाही. का? तर तिचं मन अजून रिलॅक्स आणि सेफ झालेलं नाही,' असे बहाणे ती करत असावी. त्यामुळे पुरुषाची घुसमट होते. त्याचे परिणाम त्या दोघांच्या चांगल्या रिलेशनवर होतात; म्हणून तर घटस्फोटाचे आणि ब्रेकअपचे प्रमाण वाढलेले आहेत. यात पुरुषाच्याही काही चुका होतात. जसे, घाई करणे, फक्त शरीरावर लक्ष देणे, संवादाचा अभाव असणे, स्त्रीने 'नाही' म्हटलं तर काही पुरुषांचा इगो वाढतो. ते रागावतात किंवा दूर होतात. त्यांनीही तिचं ऐकावं, तिच्या छोट्या छोट्या गोष्टी समजून घ्याव्या, तिच्यात विश्वास निर्माण करावा. तिला शांत वेळ द्यावा. तिच्या मर्यादा व भावना समजून घ्याव्यात. काय आवडतं, काय नाही आवडत. ते विचारून गैरसमज दूर करायला हवे. मात्र एवढं शिक्षण दोघांनाही मिळालेलं नसतं. त्यामुळे त्यांच्यात मतभेद होतात; परंतु आपलं एक चांगलं झालं. आपण एकमेकांना समजून घेतलं. त्या गोष्टीपेक्षा आपण कामाला महत्त्व दिले.

‘कामवासना ही कळ किंवा ट्रिगर दाबून मिळवायची गोष्ट नाही, ती निर्माण होण्यासाठी योग्य वातावरण म्हणजे मानसिक,भावनिक व शारीरिक याची तयारी आवश्यक असते; पण बऱ्याचदा त्याचा विचार न केल्याने स्त्री-पुरुष यांच्यात वाद होतात. तेथे सामंजस्य महत्त्वाचे असते. यात स्त्री समजून घेण्यात कमी पडते. ते त्या एकाच गोष्टीबाबत. त्यामुळे तिच्या आयुष्यात अनेक प्रश्न निर्माण होतात. ते होऊ नये; म्हणून असंही म्हटलं जातं, ‘स्त्रीला जिंकायचं नसतं, तिला समजून घ्यायचं असतं आणि जेव्हा ती समजली गेली असं वाटतं, तेव्हा ती नैसर्गिकरितीने खुलते’; पण घडतं उलटंच. तिला समजून घेतलं, तरी ती प्रतिसाद देईलच याची खात्री नसते. कारण ती फार थंडपणे पुरुषाकडे पाहते. आता तुला काय वाटते, ते तू ठरव.-----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२७-

प्रिय फ्रेशर

बऱ्याचदा असे व्हायचे की, तुझ्या बोलण्यात जेव्हा जगण्यातील ताणतणाव, भविष्यातील चिंता जाणवायची, तेव्हा त्या रात्री मला झोप लागायची नाही. तुला रिलॅक्समध्ये कसे ठेवता येईल, हा विचार करायचो. एक दिवस तसेच झाले. तुझा भाऊ बारावी पास झाल्यानंतर त्याला मेडिकलला जायचे होते. त्याच्या खर्चाच्या चिंतेत तू होती. फ्रेशर इंजिनिअर म्हणून तू नुकतीच कंपनी जॉईन केली होती. शिकत-शिकत काम करत होती. आपल्या टीममध्ये बॉस म्हणून तू माझ्याकडे आदराने पाहायची. टीमचे नेतृत्त्व आणि टॅलेंट पाहून तू प्रभावित झाली होती. मी तुला सांभाळून मदत करू शकतो, असा विश्वास तुला वाटत होता. त्यामुळे तू फार जवळ आली होती. जसे आपले सात जन्माचे नाते असल्यासारखे मोकळेपणे तू सोबत असायची. त्यामुळे तुझे मला आकर्षण वाटत गेले होते. तुला लाईफ पार्टनर म्हणून शेवटपर्यंत सोबत ठेवण्यासाठी तुझ्या साऱ्या चिंता दूर करण्याचे मी ठरविले होते. तुझ्या वाट्याला आलेले कामं पूर्ण करण्यासाठी केवळ मार्गदर्शनच नव्हे, तर तुझे कामं स्वतःही करत होतो. कारण इथे घेणे-देणे हीच रीत बणल्याने त्याशिवाय कोणी जवळ येत नाही, हे मला अनुभवाने माहिती होते; म्हणून तुला जे जे हवे ते ते देण्याचा प्रयत्न करीत होतो. तुझ्यासाठी रात्र जागून काढत होतो.

तुला कामं नेमून देणं आणि दिलेली कामं वेळेत पूर्ण झाली की नाही, हे पाहणं, ॲप बनविण्यासाठी कोडची गुणवत्ता कशी आहे, समस्या सोडविण्याचे कौशल्य तुझ्यात आहे की नाही. टीमसोबत कसं काम करते, नवीन गोष्टी

शिकण्याची तयारी आहे की नाही, जबाबदारी घेते की नाही? तुझ्या या सर्व गोष्टींचा मॅनेजर म्हणून आढावा घेत होतो. तुझ्या चुका होऊ नयेत आणि काम नीट शिकता यावं, यासाठी मदत करून तुला पगारवाढीसाठी अर्थात प्रमोशनसाठी संरक्षण देत होतो. त्यामुळे एक-दीड वर्षातच तुझे प्रमोशन होऊ शकले होते. तुला बारा लाखाचे पॅकेज मिळवून देण्यात मी यशस्वी झालो होतो, त्याची जाणीवही तुला होती. त्यामुळे तू खुश होऊन माझ्यात जीव गुंतल्याची प्रचिती आणून देत होती. त्यावेळी तू माझ्यावर प्रेम करीत असल्याचे मला जाणवत होते आणि सुखी जीवनाचे स्वप्नही पडत होते.

तू सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून सोबत काम करतांना तुला वाटून दिलेली होती. ती जबाबदारी पूर्ण करण्यासाठी तू खूप मेहनत घेत होती. त्यावेळी तुझे काही कामं मी स्वतःकडे घेऊन तुझा भार हलका करीत होतो. असं छान चालल्याने तुझा बराच ताण कमी झालेला दिसत होता. एकदा तुला खात्रीने सांगितले होते की, 'आता टेन्शन घ्यायचं नाही. तुझा भाऊ डॉक्टर झाला म्हणून समज. राउंडमध्ये नंबर नाही लागला, तरी खाजगी कॉलेजला ॲडमिशन घेऊ. त्यासाठी आणखी प्रमोशनची तयारी करू.' तेव्हा तू फार उत्साहात म्हणाली होती की, 'तसे झाले न सर, तर तुम्ही म्हणाल ते देईन मी.' मी म्हटलं, 'पण...मला जे आवडते ते तुला आवडत नाही.' तेव्हा तू 'मित्राने घेतलेल्या सर्व निर्णयांचे ती आनंदानेच स्वागत करेल.....त्याला झुरवत त्रास देणे मला कधीही आवडणार नाही.' असे सकारात्मक उत्तर दिले होते. ते स्वार्थापोटी होते की, खरंच मित्राच्या प्रेमापोटी होते, हे कळले नव्हते. मात्र तुझ्या या बोलण्याने मी तुझ्यासाठी आणखी रात्रीचा दिवस करीत गेलो होतो. दिवस येत होते, जात

होते. तुझे स्वप्न साकार झाले होते. नंतर तुझ्या भावना बदलून गेल्याने माझा अपेक्षाभंग झाला होता. तू ट्रॅडिशनल व मर्यादाशील असल्याने दोघात अंतर पडेल, हे कळत असूनही माझे मन तुझ्यात गुंतले होते. तुला इच्छा मारून जगण्याची सवय झाली होती. त्यामुळे आकर्षण नियम काही उपयोगाचा ठरणार नाही, हेही मला समजत होतं. तरीही चार्जेबल लॉकरसारखी मनाची गुंतवणूक व्हायची. फायदा तर काही नाही, उलट तोटाच झाला होता. तरी त्यात एक समाधान होते. आपल्याजवळ सोनं आहे, ही भावना आणि आभूषण म्हणून वापरता नाही आले, मिरवता नाही आले, तरी तो एक आनंदही होता. तुझ्या पद्धतीने तुला जे करायचं होतं. करून घ्यायचं होतं, ते तू केलं. नंतर मी मुरमाड जमीन कसण्यात काही अर्थ नाही; म्हणून तुझा नाद सोडून स्वतःच्याच नादी लागलो होतो.

तुला हवे ते मिळाल्याने नंतर माझी गरज वाटत नव्हती. कुटुंबात भाऊ डॉक्टर आणि तू इंजिनियर म्हणून चार चौघात स्वतःला अभिमानाने मिरवत होती. तेव्हा तुझ्या आतल्या मनाला कुठे तरी माझे काळजाचे तोडलेले तुकडे तुला टोचत असतील की नाही, माहित नाही; पण प्रेमळ माणसाला दुखावल्याची जाणीव जरी झाली तरी तुझा आत्मा तुला दोषी मानत असेल, हे नक्की. इथे गुण की दोष हे महत्त्वाचे नाही. ज्याचा त्याचा तो स्वभाव असतो. पारंपरिक स्त्री म्हणून तुझे तारुण्य तू जाळत गेली होती. त्या आगेत मीही भाजून गेलो होतो; पण मला माझी राख होऊ द्यायची नव्हती. तुला आणखी पुढचे प्रमोशन हवे होते, त्या वेळी मीच माघार घेतली होती आणि तुला मदतीचा हात दिला होता.

तुझे आणि माझे अंतर पडले नव्हते. मीच तुझ्या आगेपासून स्वतःहून दूर झालो होतो. ज्या आगेवर भाकर भाजली जात नाही. ती फक्त भडकते आणि माणसाला जाळते, तसली आग नकोच असते. ती इंधनासारखी हवी; पण तुला माझी उर्जा होता आले नाही. जे पाहिजे होतं, ते नाही दिलं आणि नको असलेलं दुःख न मागता देऊन गेली. तरीही तुला माफ करून मी पुढे जायचे ठरविले होते. कारण ज्याच्याकडून नुकसान झाली, त्याच्याविषयी कसा विचार करायचा, हे ओशोकडून शिकायला मिळालं होतं, ते तुला सांगतो. 'राग आणि सूडभावना यामुळे आणखी समस्या निर्माण होते.' मला तसं करायचं नव्हतं, एक समजदारी बाळगली होती. कारण 'खरंच, बदला घेतल्याने आपलं दुख कमी होतं का?' या प्रश्नाचे विश्लेषण ओशोने केले आहे.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२८ -

प्रिय फ्रेशर

मागील पत्रातील अपूर्ण गोष्ट सांगतो तुला. 'लोक दुसऱ्यांना इतकं दुखावूनही शांतपणे कसे जगतात? त्यांना अपराधीपणा का वाटत नाही?' जेव्हा आपला विश्वास तुटतो, तेव्हा आधी अविश्वास वाटतो, मग खोल दुख होतं आणि शेवटी बदला घेण्याची भावना निर्माण होते. ही भावना नैसर्गिक आहे. कारण आपण माणूस आहोत.' यावर ओशोने छान भाष्य केलेले आहे. त्याप्रमाणे माझ्यात बदल झाला की नाही, हे तुझ्याशिवाय कोणीच सांगू शकणार नाही. कारण तुझ्या इतकं मला कोणी जवळून पाहिलं नव्हतं.

सूड उगवल्याने आपलं दुख कमी होत नाही, उलट अपराधीपणा वाढतो. सूड म्हणजे दुसऱ्याला जाळण्यासाठी स्वतःच्या हातात आग धरणं, दुसऱ्यासाठी विष बनवून स्वतःच पिणं, हे मी समजून घेतलं होतं. राग किंवा सूड यामुळे दोघांचंही नुकसान होऊन वाट्याला दुप्पट दुःख येतं. माणसाच्या प्रत्येक कृतीचा परिणाम होत असतो. मग ती चांगली असेल, तर चांगले आणि वाईट असेल तर वाईट. ते परिणाम लगेच दिसत नाही; पण वेळेनुसार ते जाणवू लागतात; म्हणून मी चांगलेच करायचे ठरविले होते. तुझ्या मतलबी वागण्याचे अनिष्ट परिणाम माझ्यावर झाले होते. मी बाहेरून आनंदी आणि आतून तुटलेला होतो, हे तुझ्याही लक्षात आले होते. मी तुला कधी दोष दिला नव्हता. तुझा तो स्वभाव म्हणून सोडून दिले होते. कारण सूडभावना ठेवली असती, तर तुझी प्रतिमा कायम माझ्या मनात जिवंत राहिली असती आणि तुझ्या विचाराने

मलाच त्रास सहन करावा लागला असता. त्यापेक्षा शांतीचा मार्ग मी निवडला होता.

'माणसानं नदीसारखं पुढे वाहत राहावं, भूतकाळात अडकून पडायचं नसतं. आपली ऊर्जा स्वतःला घडवण्यात वापरायची. असा विचार करून वेदनेचा स्वीकार केला; पण त्यात अडकलो नाही. दुःख उगाळून रडत बसलो नाही. तर चांगल्या कर्मांचं फळही मिळतं, यावर विश्वास ठेऊन आंतरिक शांती महत्त्वाचे मानली. 'मनात राग, द्वेष भरला, तर मन घाण होतं. चांगले विचार ठेवल्यास शांत राहतं', हा विचारही महत्त्वाचा वाटला. तो दोघांसाठी फायद्याचा ठरला. 'जो दुख देतो: तो स्वतःही दुखी असतो', हे समजल्यानंतर राग कमी केला होता; म्हणून तुला आतापर्यंत कोणत्याही गोष्टीला नकार दिलेला नव्हता आणि पुढेही देणार नाही. जो खरंच प्रेम करतो, त्याच्या डिक्शनरीत 'नकार' नावाची संकल्पना नसतेच. स्वतःला सकारात्मक मानणं आणि कळत नकळत दुसऱ्याला दुखावणं, यासाठी काही संकल्पना असेल तर सांगशील. कारण सगळं माझंच खरं असतं, असं मी काही दावा करणार नाही. फक्त जे शिकलो त्यालाच अनुभवाच्या शब्दांमध्ये गुंफतो आहे. ती माला तू जपावी, असा माझा आग्रहदेखील असणार नाही. तुला पटेल ते कर. माझं काही दुमत नाही.

तू माझ्यासाठी काही वाईट नव्हती. तू काही वाईटही केलं नव्हतं. 'फक्त ज्यापासून दुःख येतं, त्यापासून दूर राहणं शहाणपण असतं.' हे लक्षात ठेवलं होतं. त्याऐवजी सूडभावना ठेवली तर जीवनाचा खरा अर्थ कळणार नाही. त्यात सारे आयुष्य जळत राहील. हे खरं होतं. आपण तसे करायचे नाही, हे ठरवून टाकले होते. बाकी स्वतः जळण्यासाठी कोण पुढे येतं? येतात ते केवळ

जाळण्यासाठी, हाच अनुभव घेत, इथपर्यंत आलो आहे मी. आयुष्य खूप छोटं आहे. मरण अटळ आहे, या जाणिवेने माणसांचा लोभ वाटून त्यांच्यावर प्रेम केले. त्यांच्या चुकांना माफ केलं. मात्र पुन्हा त्यांच्या वाट्याला जाण्याचे धाडस झाले नव्हते. कारण फसवणुकीतून येणाऱ्या वेदनेची पुनरावृत्ती मला होऊ द्यायची नव्हती. कारण आपण अंधार, दुःख आणि नुकसान याचाच विचार करत बसलो, तर चांगले जगण्याला वेळच कुठे मिळणार सांग ?

आपली प्रगती, शांतता, आनंद यासाठी ओशोने कमळाचं उदाहरण दिलं आहे. चिखलात राहूनही स्वच्छ आणि सुंदर राहणं, हा त्याचा स्वभाव-गुणधर्म आहे. काही माणसेही तसेच असतात. सगळेच काही बरबटलेले नसतात. परिस्थिती कशीही असली, तरी आपला चांगुलपणा टिकवून ठेवणारेही खूप आहेत. त्यांच्याकडे पाहून आपण आपल्या वेदनांनी कमजोर न होता, त्या वेदना उर्जा आणि प्रेरणेत रुपांतरित करण्याची अक्कल मला आली होती. त्यामुळे मी काही माझे आयुष्य डिस्टर्ब होऊ दिले नव्हते. ऐन वेळेला ओशोसारखे अनेक भेटले म्हणून ठीक झाले; म्हणून शेवटी सांगतो, सूड न उगवता स्वतःला सुधारण्यात ऊर्जा खर्च करायची. कारण आनंदी राहण्यासाठी हेच सर्वात मोठं उत्तर आहे. कर्म आणि वेळ आपलं काम करतात. आपण आपले कामं करीत राहिल्याने त्याचे फळ वेळेवर मिळतेच, फक्त त्या वेळेची वाट पहावी लागते.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

२९ –

प्रिय फ्रेशर

तुला एकदा 'लिव्ह आणि रिलेशन'मध्ये राहण्याबाबत विचारले होते. तेव्हा 'निःशब्द.....पण सोबत नेहमीची असेल हे नक्की....कारण तुम्ही माझ्या जीवनाला खरा आकार दिला आहे. मला स्वतःच्या पायावर उभे राहायचे बळ दिले आहे. सध्या तरी एवढेच बोलू शकते मी' असे तू उत्तर दिले होते. स्वतःच्या पायावर उभी राहिल्याने मी माझे निर्णय घेण्यास खंबीर असणार आहे', अशी ग्वाहीदेखील दिली होती आणि 'माझ्या अवकाशात स्वतःचा वेगळा निसर्ग निर्माण करण्याची माझी इच्छा असणार आहे', असेही पटवून सांगितले होते. त्यावेळी आपण व्हॉट्सअपवर असण्यापेक्षा समोरासमोर बोलत असतो, तर तुझ्या चेहऱ्यावरचे खरे-खोटे भाव मला समजून घेता आले असते.

'तुला माणूस म्हणून जगण्यासाठी सक्षम बनविणे हे महत्वाचे... बाकी सारे नशीबाचे. स्वतःचा निसर्ग ज्याला निर्माण करता येतो, तोच खऱ्या अर्थाने यशस्वी जीवन जगतो. त्यासाठी आपण निसर्गाला जाऊन भिडलो पाहिजे. नाही तर संस्कृतीच्या नावाखाली दमन होते आणि स्वास्थ्य बिघडते.' असे मी म्हटले होते. त्यावर तू उत्तर दिले दिले होते की, 'तुम्ही म्हणाल तर मग चॅटिंग नको करू का ? तुम्हाला त्रास होतो का माझ्या बोलण्याने? तुम्ही काहीही सांगितले, तरी तुमच्या मानसिक स्वास्थ्यसाठी ते मान्य असेल मला. काही चुकीचं बोलत किंवा वागत असेल तर तेही सांगा. मी सुधारणा करेल त्यात नक्की.' तुझं असं लाडिक बोलणं माझ्या मनात आशा निर्माण करून गेलं होतं. त्या आशेने मी तुला फार जपत होतो. आपल्याला आनंद आणि सुख देणाऱ्या वस्तू असो की

माणसं, यांना जिवापाड जपल्याशिवाय जगणे सुंदर बनत नाही, हे तुला सांगितले होते; पण तू सारेच विसरून गेली होती. तुझ्या बोलण्यात जे होते, ते नंतर तुझ्या मनाच्या आरशात दिसत नव्हते. त्याच्या उलट प्रतिमा तयार झालेल्या होत्या, आभासी आणि फसव्या.

तू स्वतःलाच पूर्णपणे ओळखू शकली नव्हती; म्हणून स्वतःला फसवत होती. मात्र स्वतःच्या भावनांची मालकीण होती. शांत, स्थिर राहून आणि स्वतःवर नियंत्रण ठेऊन असल्याने अधिक आकर्षक वाटायची. आपण सोबत काम करीत असतांना शांत राहत असल्याने रहस्यमय वाटायची. तुझ्या मनात काय चालत होतं, काही कळत नव्हतं. तुला समजून घेणारा माणूस हवा होता, या उलट मी तुला प्रभावित करण्याच्या प्रयत्नात बैलासारखा राबत होतो. तुझा हंगाम पिकत होता आणि मी उपेक्षित राहत होतो. कारण मी भावनिकदृष्ट्या कमजोर असल्याने तू मला ट्रॅप केले होते. तुझ्यासारखेच मला शांत आणि स्थिर राहता आले असते, तर कदाचित आपले नाते बनलेच नसते. किंवा त्याला चांगले रंगरूप लाभले असते. मात्र इथे दगडं मारणाऱ्या समाजामूळे स्त्री-पुरुष यांचे नशीब फारच फुटके-तुटके असते.

तुझी विचार करण्याची पद्धत खूप वेगळी होती. तुझ्यात एक वेगळी डेप्थ होती; म्हणून तुला समजून घेत होतो. मात्र सतत कोणाच्या मागे लागल्याने आपली किंमत कमी होते, हे मला तेव्हा माहिती असते, तर तुला वाजवीपेक्षा जास्त भाव दिला नसता. तुला खूप मेसेज केले. कॉल केले आणि खूप उपलब्ध राहिलो. त्यामुळे तू मला गृहीत धरून चालायची, मी कुठे काही जाणार नाही, असे तुला वाटायचे. आता दूर गेल्यावर तू नक्कीच विचार करायला लागली

असेल. तुझी काळजी कमी करून स्वतःवर लक्ष द्यायला लागलो तेव्हापासून तू इगोमुळे गोंधळून गेली आणि संपर्क तोडून टाकला. ना मेसेज ना कॉल केला. मीच नेहमीप्रमाणे सुरुवात करावी, असे तुला वाटत होते; पण त्यात मला काही फायदा वाटत नव्हता. तुझे प्रमोशन होईपर्यंत दोन-तीन दिवस बोलणे नाही झाले, तर तू स्वतःहून मेसेज करायची. सकाळी गुडमॉर्निंग म्हणायची. नंतर तेही तू बंद केले होते. म्हणजे तुला माझी आठवण येत नव्हती, तर तुझ्या कामाची आठवण असायची ती. हे हळूहळू मला कळत होते. तुझ्या मेसेजचे अर्थ लावत होतो. प्रेम की मतलब? उत्तर शोधत होतो.

आता मी माझे उद्देश मजबूत बनविले आहे. करियर, स्किल, पैसा आणि आरोग्य हे माझ्या आयुष्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. त्यासाठी येणारा दिवस, वेळ व निर्णय हे माझ्या जीवनाच्या दिशेने असणार आहे; म्हणून तू मला स्वार्थी समजू नको. हे जगच तसे आहे. त्यांच्यासारखे झाल्याशिवाय चांगल्या माणसाला काही महत्त्व राहत नाही. त्यासाठी 'प्रेम करा, पण स्वतःला हरवू नका, काळजी करा; पण आत्मसन्मान सोडू नका' हे हळूहळू शिकत पुढे-पुढे जातो आहे आणि तू मागे पडत आहे, हे दिसूनही त्याची पर्वा तुला नव्हती. कारण तुझ्या ठिकाणी समर्पणाची भावना नव्हती, ती असती तर तू मला पकडून ठेऊ शकली असती.

तुला सांगू, तुझ्या विशिष्ट पॅटर्नमुळे मी ठरवून टाकलं होतं की, 'मी माझ्या आयुष्याचं मुख्य कॅरेक्टर आहे. कोणी येईल-जाईल; पण माझी दिशा बदलणार नाही.' हे तुलाही जाणवले होते; म्हणून तू पहिल्यासारखी सोबत राहून काम करत नव्हती. दुसरे कारण असेही असेल की, 'मीच तुला स्वतःहून काय

करायचं? स्वतःची ग्रोथ कशी करायची ?' ते सांगणे बंद केले आणि मला तुझा राग आला, असे तुला वाटले; पण तसे काही नव्हते. तू भीक मागावं, विनंती करावी, हा माझा हेतूही नव्हता. प्रेमाने जवळ येऊन सोबत असावी, असेच वाटत होते; पण तू माझ्या भावना समजली नव्हती. ------

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३० -

प्रिय फ्रेशर

तुला एक आठवण करून देतो. आपण एका खाजगी मेडिकल कॉलेजला तुझ्या भावाचे ॲडमिशन करायला गेलो होतो. त्यावेळी तू फार आनंदी होती; पण त्याला डिग्री मिळेपर्यंतच्या खर्चाबाबत तू चिंताही व्यक्त केली होती. तेव्हाही तुला सांगितले होते, 'त्याला सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर बनविणे, हे आपले ध्येय ठेवूया' त्यावेळी तुला केवळ धीरच वाटला नव्हता, तर तू पूर्ण समर्पणाची भावना व्यक्त करून म्हटले होते, 'मला माहित आहे. झुरवण्याने तुम्हाला खूप त्रास होईल आणि मला हे मान्य नाही की, आपल्यामुळे आपल्या जवळच्या माणसाला त्रास व्हावा.' तुला मध्येच थांबवत बोललो होतो की, 'तुझ्या मनाविरुद्ध मला नाही चालत कोणत्याही गोष्टी.' माझे म्हणणे तुला पटले आणि दोघांच्या फिलिंग सारख्याच आहेत' असे म्हणत तू जरा स्माइल केले. कारण तुझ्या मनातले बोललो होतो. खरंच तू काही देणार नव्हती आणि तुझ्या इच्छेविरुद्ध मलाही काही नकोच होते. कारण 'एकमेकांमुळे एकमेकांना त्रास नको.' या तुझ्या बोलण्यात सगळंच येऊन गेलं होतं. कारण 'म्हणून मैत्री गोड वाटते. त्यागी...' असा दुजोरा दिल्यानंतर तू बारीक हसून धन्यवाद म्हटले होते; पण त्याग एकानेच करायचा नसतो. त्यात दोघांचा सहभाग असावा लागतो. हे तू विसरली होती.

आपल्या नात्याकडे पाहण्याचे आपले दृष्टिकोन भिन्न होते. तुझ्या प्रत्येक शब्दामागचा हेतू ओळखायला मी शिकलो होतो. मी डोळे बंद करून तुझ्या त्या बोलण्यावर विश्वास ठेवला होता. माझ्यातील स्वप्न आणि

महत्त्वाकांक्षा कमी करून तुझ्याकडे लक्ष दिले होते. तू कधी खूप प्रेम दाखवायची, तर कधी पूर्ण दुर्लक्ष करायची. त्यामुळे मी सतत तुझा विचार करायचो आणि बेचैन व्हायचो. तरीही 'तू तुझे काम करत राहा, मी आहे तुझ्यासोबत. तुझे स्वप्न साकार होणं महत्त्वाचं आहे' असे प्रोत्साहन देत होतो. तू घाबरत काम करत असायची. तुझी प्रगती पाहून मी खुश व्हायचो. तुझ्या वागण्याचा तू अंदाज लागू देत नव्हती की, उत्साह दाखवून भावनेच्या भरात वाहून जात नव्हती. मी मात्र तुझ्यासोबत अभिमान फील करत होतो. हेच शेवटपर्यंत टिकवता आले असते तर?; पण तू स्त्रीस्वभाव म्हणून गोल्ड मेडलिस्ट ठरली.

मॅक्यावेली म्हणतो, 'माणूस दोन गोष्टींनी चालतो. प्रेम किंवा भीती आणि प्रत्येक नात्यात शक्तीचा खेळ असतो. जो समजतो तो वाचतो. जो नाही समजत, तो तुटतो.' तू एक बाईची जात म्हणून दोन्ही गोष्टी तुझ्यात होत्या. तू कधी प्रेम तर बऱ्याचदा भीतीच दाखवायची आणि मला कंट्रोल करायची. कधी स्पेस मागायची तर कधी सर्वस्व मानायची. तुझ्या अशा प्रतिसादामुळे कधी रिवॉर्ड, तर कधी पनिशमेंट वाटायची. तुझ्या वागण्यात एकसारखेपणा तू ठेवला नव्हता. तुझी परिस्थिती बदलली होती; पण तू बदलत नव्हती. उलट 'तुझे ॲटीट्यूट बदलू शकत नाही', हे खात्रीने सांगायची. तुझे मूल्यं स्थिर ठेऊन आदर कायम राखायची. तुझ्या या परस्पर विरोधी वागण्याने मी फार वैतागून गेलो होतो.

माझंच चुकलं होतं. तुझ्या प्रत्येक गोष्टीला प्रतिसाद देत गेलो होतो. मी शिस्त आणि सीमा राखली नव्हती. माझ्या उद्देशापासून भरकटलो होतो.

त्यावेळी स्त्रीचं मानसशास्त्र मला माहीत नव्हतं. जेव्हा मी काही गोष्टी शिकू लागलो, तेव्हा कळलं होतं की, 'जेव्हा एखादी स्त्री तुमच्याशी तिच्या अडचणींबद्दल बोलायला सुरुवात करते, तेव्हा बहुतेक पुरुषांना वाटतं की, ती फक्त गप्पा मारतेय; पण खरं म्हणजे, ती कधीही 'फक्त गप्पा' मारत नसते. प्रत्येक स्त्री प्रत्येक पुरुषासमोर मन मोकळं करत नाही. जर ती तिचा ताण, टेन्शन, संघर्ष तुमच्यासमोर मांडत असेल, तर त्यामागे काहीतरी खोल कारण असतं आणि ते नेहमी तुम्ही समजता तसं नसतं. जर तुम्हाला खरोखर स्त्रियांना समजून घ्यायचं असेल, तर फक्त त्यांच्या शब्दांकडे लक्ष देऊ नका. त्या तुम्हालाच का सांगत आहेत, हे समजून घ्या. इथेच बहुतेक पुरुष चूक करतात.' असे हे स्त्रीचं मन असतं. तिच्या बोलण्यात भावना नसतात. आता एक स्त्री म्हणून तू त्यातील खरं-खोटं काय ते ओळखशील.

तुझ्याबाबतीत सांगायचं, तर तुझ्या समस्या सांगून तू माझ्यावर विश्वास ठेवत होती की, तुझं ओझं माझ्यावर टाकत होती, हे कळलं नव्हतं; पण एक खरे की तुझा माझ्यावर विश्वास होता. नंतर मात्र तू काहीच बोलत नव्हती. तुझा उद्देश सफल झाला आणि माझ्यावरील विश्वास उडाला, असे वाटायला लागले होते. मी स्थिर राहिलो की, तू माझी परीक्षा घेऊन माझ्या प्रतिक्रियेची वाट पाहायची. मी भावनांमध्ये वाहून जातांना सगळं ठीक करेल की, ताण देईल, हेही अजमावून पाहायची. मात्र एक खरं की माझ्यासोबत तुला सुरक्षित वाटत होतं; म्हणून तू मला वेगळं मानायची आणि तुझे दुबळेपण सांगून मोकळी व्हायची. मग मी तुला अधिक मजबूत बनविण्याचे आटोकाट प्रयत्न करायचो. यश तुला मिळत गेले. त्याचा वृक्षही बहरला. मात्र त्याची फळे तू कधी मला दिली नव्हती. वाट

पाहून थकलो आणि एक दिवस माघारी वळलो. शेवटी तुला आणखी एक सांगतो, 'कमजोर पुरुष घाबरतात,जास्त रिऍक्ट करतात किंवा स्वतःच बुडतात.' या उलट मजबूत पुरुष शांत राहतात, मर्यादा ठेवतात आणि परिस्थितीला योग्य दिशा देतात. मग तूच ठरव. मी कसा पुरुष होतो?

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३१-

प्रिय फ्रेशर

तुला आठवत असेलच, बोलता-बोलता पाच वर्षे निघून गेली होती. आपण तुझ्या तिसऱ्या प्रमोशनच्या तयारीला लागलो होतो. तुझा विकास झपाट्याने होत होता आणि आपल्या टीमला त्याचं आश्चर्य वाटत होतं. माझ्यामुळे सारं शक्य होत असल्याची ती मंडळी चर्चा करायची. तुझी धडपड आणि कष्ट मात्र त्यांना दिसत नव्हते. मीच त्यांना ते समजून सांगायचो. तुझी महत्त्वाकांक्षा गगनाला गवसणी घालायची. ब्रह्मांड तुझ्यासाठी सज्ज झालं होतं. तू जे ठरवलं, ते तुला प्राप्त होत होतं. माझ्याच बाबतीत मात्र 'मागणी तसा पुरवठा होत नव्हता.' मग शेवटी तुला सांगितलं, 'तुला त्रास नको, म्हणून ब्रेकअप... पण केव्हा? तर तुझे स्वप्न साकार झाल्यानंतर. का? तर तुझ्या दृष्टीने मी खलनायक ठरेल. मला ती प्रतिमा नको होती. तुझ्या मनातून उतरायचे नव्हते. त्यावेळी तू रडायला लागली होती. तुला सोडणार नाही; म्हणून शपथ घेऊन सांगितले होते, तर 'आता काय बोलू मी.' असं सांगून शांत बसली होती. तुझं ते नेहमीचं असायचं. मी समजून घ्यायचो. 'मैत्रीणकडून अपेक्षा पूर्ण झाल्या की, आनंदी आनंद आहे मग.' मी बोललो आणि तू 'हो' एवढंच उत्तर दिलं होतं. पुन्हा 'झोपा सर, गुड नाईट' असं म्हणून विषय कट केला होता. रात्रीची वेळ आणि कॉलवर बोलणं. कोणाचेच एक्सप्रेशन कोणाला दिसत नव्हते. मग मी एक ऑडिओ बुक समरी ऐकत राहिलो होतो.

प्राचीन रोमन सम्राट आणि तत्त्वज्ञ मार्कस ऑरेलियंस याची 'मेडिटेशन' ही डायरी आहे. त्यात त्यांनी 'आपल्या कंट्रोलमध्ये फक्त आपले विचार आणि

कृती आहेत. बाकी सगळं लोक, परिस्थिती, आणि भविष्य आपल्या कंट्रोलमध्ये नाही. त्यामुळे शांत राहा आणि योग्य कृती करा', असे सांगितले आहे. सगळं त्याच्या नियंत्रणात असतांनाही तो स्वतःशी, त्याच्या मनाशी आणि भावनांशी लढत होता. तरी तो प्रत्येक परिस्थितीत शांत, लक्षकेंद्रीत करून अटळ राहिला होता. त्याच्यापेक्षा माझी परिस्थिती तितकी कठीण नव्हती. तरी त्याच्याकडून मी शिकलो आणि एक वेगळे मार्ग निवडत गेलो.

आजच्या काळात लोकं ताण, ओव्हरथिंकिंग आणि विचलनात अडकलेले आहेत; अशा लोकांना मजबूत होण्यासाठी हे पुस्तक दिशा देणारं आहे. त्यामुळे कोणतीही समस्या माणसाला हलवू शकणार नाही, त्याची विचारसरणी बदलेल. त्यासाठी काही गोष्टी लक्षात घ्यावा लागतात, असे त्यात सांगितले आहे. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात एक वेळ अशी येते की, सगळं काही ठीक असतांना आतून रिकामेपणा जाणवतो. आज त्याच्याकडे इंटरनेट आहे, मोबाईल आहे. तसेच मनोरंजनाची विविध साधने आणि समाजमाध्यमं आहेत. तो त्यात अडकून असतो, तरीही एका रिक्त अवस्थेत त्याचे मन स्वतःला कुरतडत राहते. त्याला नेमके काय हवे, त्याचे त्यालाच कळत नाही. कुठून आणि का येते, अशी त्याच्या मनाला अस्वस्थता ?

स्वतःवरील नियंत्रण गमावणं आणि हातात नसलेल्या गोष्टींची हाव असणं, यासाठी त्याच्या मनात सतत काहीतरी चालू असतं. त्यामुळे ओव्हरथिंकिंग होते. ताण येतो आणि भीतीही वाटते. आपल्या आयुष्याची गुणवत्ता आपल्या विचारांवर अवलंबून असते. हे माणसाला काळात नाही. त्याच्या नकारात्मक विचारामुळे त्याला सारं जग नकारात्मक वाटते; पण हेच

विचार त्याने नियंत्रित केले, तर परिस्थिती कितीही कठीण असली, तरी त्याला काही फरक पडणार नाही. मग तू असो की मी. आपण परिस्थितीकडे कसे पाहायचे, हेच तुला या निमित्ताने सांगायचे आहे. कारण 'तुमच्यासोबत काय होतं ते महत्त्वाचं नाही, तुम्ही त्याकडे कसं पाहता ते महत्त्वाचं आहे.' असे मार्कसचे म्हणणे आहे.

आपल्या नियंत्रणात फक्त आपली प्रतिक्रिया आहे. बाकी काहीच नाही; म्हणूनच जे आपल्या नियंत्रणात आहे, त्यावर लक्ष दिले पाहिजे. आपण जे जे आपले मानतो तेसुद्धा आपल्या नियंत्रणात नसते. आपली कृती आपल्या हातात असते; म्हणून त्याकडे लक्ष द्यायला हवे, मी तर तेच करीत आलो. त्यामुळे कशात अडकून पडायला मला वेळच कुठे असतो. त्यासाठी आपल्या विचारांवर लक्ष द्यावे लागते. मात्र त्या विचारांना ओळखून पुढे जाता आले पाहिजे. जे उपयोगाचं नाही. त्रासदायक वाटतं, अशा विचारांचा भार आपल्यावर पडू द्यायचा नसतो. कामाचे तेवढे विचार घ्यायचे, बाकी सगळे सोडून द्यायचे. तू ठरव तुला काय पकडायचं आणि काय सोडायचं? आता पुरे झाले, नंतर सांगेल जे जे बाकी राहिले.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३२

प्रिय फ्रेशर

आधीच्या पत्रात तुला मार्कसची गोष्ट सांगत होतो. ती अपूर्ण राहिली होती. बोर नको वाटू देऊ. ऐकणं आणि शिकणं खूप महत्त्वाचं असतं. 'प्रत्येक सकाळी स्वतःला सांगा. आज मला स्वार्थी, उद्धट आणि अज्ञानी लोक भेटतील. हे नकारात्मक नाही. ती मानसिक तयारी आहे. जेव्हा तुम्ही तयार असता, तेव्हा तुम्ही रिऍक्ट करत नाही, तर शांत राहता.' असेही मार्कस म्हणतो. मग आपण गृहीत धरून चालायचं, लोकं त्यांच्या पद्धतीने चालणार. अशावेळी लोकांचा विचार करण्यापेक्षा आपण आपला विचार आणि आपले कामं याचा विचार करायला हवा. कारण आपले विचार हीच वास्तविकता बनवतात. जास्त अपेक्षा केल्या की, जास्त दुःख वाट्याला येते. कमी अपेक्षा मनाला अधिक शांतता देतात. तुझं एक चांगलं आहे. तू अल्प संतुष्ट असल्याने शांत असते. तुझ्या गरजाही माफक आहेत. तरीही तुला मार्कसची ओळख करून द्यावंसं वाटलं.

आपण कोणाला किंवा परिस्थितीला बदलू शकत नाही. ते आपल्या हातात नसते; म्हणून जे आहे ते स्वीकारावं. विरोध केल्याने आपलाच त्रास वाढतो. त्यापेक्षा आपण रोज काय करतो, हे महत्त्वाचे असते. कारण जे करू तसेच आपण बनू. मग आपलं आयुष्य कसं असावं, हे ठरवून तसे रोज थोडं थोडं करत जावं, मी करतोच आहे की नाही, काही ना काही? वेळ मर्यादित आहे, हे लक्षात ठेवून वेळ वाया घालवणार नाही. असा निर्धार आपण केला पाहिजे. तरच आपल्याला काही तरी करण्याचं सुचेल. नाहीतर 'आता काय

करावं?' हा प्रश्न अनेकांना पडतो. कारण ते हाताशी काम ठेवत नसतात, हेच खरे. तरीही लोकं म्हणतात, 'वेळच नाही' अशांना मी होपलेस आणि युजलेस म्हणतो आणि इतर काय म्हणतात, त्याकडे दुर्लक्ष करतो. स्वतःबद्दल काय विचार करतो, याला महत्त्व देतो. कारण आपण आपल्याबद्दल विचार केल्याशिवाय आपलं जीवन सुखी होऊ शकत नाही. स्वतःबद्दल कोणीच वाईट विचार करत नाही. म्हणजे सारा खेळ विचारांवर आहे. तूदेखील तुझे विचार ओळखायला शिक. म्हणजे तुला भ्रमातून बाहेर पडता येईल. भ्रम हा माणसाला चुकीच्या मार्गाने घेऊन जातो. त्यामुळे त्याला अलौकिक असं काही करण्याचे सुचत नाही. 'आपण जे करतो, तेच बरोबर आहे', असे प्रत्येकाला वाटत राहते आणि वाटण्याला काही किंमत नसते. तो एक हवामानाच्या अंदाजासारखा अंदाज असतो आणि अंदाजे जगणे म्हणजे आपणच आपला सत्यानाश करून घेण्यासारखे असते.

शेवटी तुला सांगतो, काय करायचं ते. दररोज रात्री स्वतःला विचारायचं की, 'आज मी काय बरोबर केलं? आज मी काय चूक केलं? उद्या मी काय सुधारू शकतो?' या प्रश्नांची उत्तरे मिळणं वाटतं तितकं सोपं नाही. माणसं चुकत असूनही स्वतःला बरोबरच समजतात. चूकही मान्य करत नाही आणि सुधरतही नाही; म्हणून जगण्यातील समस्या कमी होत नाही. कारण माणसं त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकत नसल्याने भावनांचे गुलाम बनतात. त्यामुळे नको त्या प्रतिक्रिया देत असतात. तेव्ह 'आपल्या भावना अनुभवून आपण रिऍक्ट होण्यापेक्षा रिस्पॉन्ड करायला हवे.', असे मार्कस म्हणतो. आता तुला मी प्रतिक्रिया देतो की प्रतिसाद देतो, हे तूच ठरव आणि सांग. कारण मला तू

जागवलं नव्हतं. अंधारात ठेवलं होतं. शेवटी स्वप्न पाहून थकलो तेव्हा तुला कोल्हयाची गोष्ट सांगितली होती. कोल्ह्याला द्राक्षे हवे होते; पण त्याच्या हाती लागलेच नव्हते, तेव्हा तो दुःखी न होता, ते द्राक्षे आंबट आहे, असे म्हणून त्यांचा नाद सोडून आपल्या मार्गाला लागतो. हेच शहाणपण मी शिकलो होतो. बाकी काय सांगणार ----?

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३३-

प्रिय फ्रेशर

आपले 'चॅटबीट' हे ॲप यशस्वी झाल्यानंतर माणसाच्या मनातील राग ओळखणारे ॲप तयार करण्याचा आपण आणखी एक प्रोजेक्ट हाती घेतला होता. प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून मला संपूर्ण प्रोजेक्टची योजना तयार करायची होती. वेळ, बजेट आणि टीम मॅनेज करायची होती. काम कसे वेळेत पूर्ण होईल, याची खात्रीही करायची होती. क्लायंट आणि टीममध्ये समन्वय ठेवायचा होता. माझी ही जबाबदारी असली, तरी तुला त्याचा अनुभव असावा; म्हणून आपण सोबत राहून नियोजन करीत होतो. सिनियर इंजिनियर म्हणून तुझे काम यशस्वी झाल्यानंतर मॅनेजर म्हणून तुझे प्रमोशन करायचे होते. त्यासाठी आपण खूप मेहनत घेत होतो. एकदा तू म्हणाली होती, 'आज किती छान पटापट बरीच कामं होऊन गेलेत सर, असंच इतर विषय न काढता स्पीड घेतला न की लवकर होऊन जाईल कदाचित' मी म्हटलं, 'बाई, इतकं सिरीअसली घेशील तर बिपी वाढत जाईल. मस्त मजेत काम करायचं. म्हणजे टेन्शन येत नाही.' तू लगेच मन राखून बोलली की, 'तुम्हाला बोर झालं असेल; पण असेच करावे लागेल. तेव्हा कुठे होतील सर्व कामं.' तुझा भर फक्त कामावर आणि फायदे मिळण्यावरच असायचा. त्यामुळे तू कधी रोमॅंटिक मूडमध्ये नसायचीच.

असेच आपण एकदा चिकाटीने कामाला लागलो असता, तू पुन्हा तेच बोलली होती. मग मी सहज विचारलं होतं, हा प्रोजेक्ट पूर्ण झाला की, विमानाचे तिकीट काढून हनिमूनला जायचं का?' 'तेव्हा नाही. प्रमोशन झाल्यावर जाऊ. तोपर्यंत विषय काढायचा नाही.' असे तू सांगितले होते; पण तू मध्येच तुटक वागायला लागली होती. त्यावेळी माझे श्रम आणि वेळ वाया गेल्यासारखे वाटत होते. मला वाटत होतं की, 'आपण लग्न करून दोघेही सेटल व्हावं. नाहीतर

लीव्ह आणि रिलेशनमध्ये राहावं' पण तू काहीच सांगत नव्हती; म्हणून तुझ्यापासून अलिप्त राहिलेलं बरं, असा विचार करत होतो. मग मी लाओत्सूच्या विचाराने काही गोष्टी करायच्या ठरविल्या होत्या, तेही तुला इथे सांगायचे होते.

लाओत्सू हे प्राचीन चीनमधील तत्त्वज्ञ होते. 'न-प्रयत्नाची कला' म्हणजे काहीही प्रयत्न न करण्याची कला त्यांनी सांगितली आहे. त्यांचे म्हणणे होते की, 'आपण चांगले होण्याची जबरदस्ती करतो, तितकंच आपण थकतो आणि अस्वस्थ होतो. सतत प्रयत्न, स्पर्धा आणि यशाच्या धावपळीत आपलं शरीर, मन आणि आत्मा थकून जातो. कदाचित समस्या आपल्या प्रयत्नांमध्ये नसून, आपण चुकीच्या दिशेने प्रयत्न करतोय.' मी इथेच चुकलेला दिसतो. नको तेवढी धडपड केली, थकलो तरी झोळी रिकामीच राहिली. 'जग एका नैसर्गिक प्रवाहाने चालतं. आळस नाही, तर सहजपणे प्रवाहासोबत काम करणं. जबरदस्ती न करता गोष्टी होऊ देणं.' असे त्यांचे विचारतत्त्व आहे. या उलट मी करीत होतो आणि प्रयत्नांचा विरोधाभासच समोर येत होता.

'जितकं आपण एखादी गोष्ट जोराने मिळवायचा प्रयत्न करतो, ती तितकी दूर जाते.' तुही तशीच दूर होत गेली. मी सहजतेने वागलो होतो, पण नैसर्गिकरित्या काही गोष्टी घडल्या नाही. 'जग बदलण्याची जबरदस्ती आणि इतरांना आपल्या मापात बसवण्याचा प्रयत्न केला की, संघर्ष आणि दुःख.येतं. आनंद हा लक्ष्य नसून उपउत्पादन आहे.' याचं मला भान नव्हतं. हे तेव्हाच कळले असते, तर माझे चरित्र वेगळेच बनले असते. 'आपण जसे आहोत, तसे स्वीकारत नाही; म्हणून आपली खरी ओळख हरवते.' हा विचार तेव्हाच समजला असता तर कदाचित तुझ्या नादाला लागला नसतो. माझी वेगळी

ओळख निर्माण झाली असती; पण तुला सांगतो, वेळ निघून गेल्यानंर जर-तर'ला अर्थ नसतो. इतिहास घडून जातो आणि माणूस त्यातून काहीच शिकत नाही; म्हणून त्याला विचारवंतांच्या तत्त्वांची गरज पडते. मात्र त्याकडे गरज म्हणून पाहिले, तर फायदा होतो. नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे, असे केले की नुकसान होते.

'कमी करा, अनावश्यक गोष्टी सोडा. मध्यम मार्ग ठेवा, अति टाळा. रिकामेपण स्वीकारा, शांत बसायला शिका, विचारांना येऊ-जाऊ द्या.' असंही लाओत्सूचं म्हणणं आहे. आपण मात्र त्या उलट करतो. आहे. आहे त्यात समाधान नाही आणि भरपूर काही मिळविण्याच्या प्रयत्नात असतो. मिळत काही नाही. उलट थकवा आणि ताणच येतो. असेच झाले होते माझ्याबाबतीत.

'कोणतीही गोष्ट जबरदस्तीने करू नका. फक्त निरीक्षक बना आणि गोष्टी कशा नैसर्गिकरित्या घडतात ते पाहा. जीवन जिंकायचं नसतं, त्यासोबत वाहायचं असतं. खरी ताकद झुंजण्यात नाही, तर लवचिकपणात आणि स्वीकारात आहे.' या गोष्टी त्याच्याकडून शिकलो आणि खरंच मी बघ्याची भूमिका घेतली. अनुभवातून आलेलं ते शहाणपणही असेल. एक मात्र खरे की, 'प्रयत्न कमी करा आणि जगणं सुरू करा.' हा संदेश मी पाळणार आहे. तुला कोण्या विचारवंताचे विचार पटत नाही, तरी सांगितले. आता तूच तुझे स्वतःचे विचार तयार कर आणि जीवन सुंदर, आनंददायी कसे बनवायचे ते ठरव. ठरले की कळव. तुझी इच्छा असेल तर ---

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

३४ -

प्रिय फ्रेशर

आपले प्रोजेक्टचे काम फार जोरात चालले होते. तुला प्रमोशनचे डोहाळे लागले होते आणि मला वेगळेच होते. तुला म्हटलं, 'इथे फक्त घेणारे हात असतात, देणारे भेटलेच नाही. एक उम्मीद... आहे तू.' तेव्हा तू सांगितले होते, 'मीही घेणाऱ्याला एक दिवस आपले हात देईलच की-----' हात तर दिले नाही. उलट हात दाखवून गेली. विचारलं, तर म्हणायची, 'तुमच्याबद्दल आदर वाटतो. बाकी काही नाही.' म्हणजे सहचरच्या भावनेतून तुला माझे आकर्षण नव्हते. मात्र सर्वांसोबत आपण चर्चा करतांना माझी गंमत करून इगो दुखवायची. याला का आदर म्हणतात. तेव्हाच लक्षात आले होते की, प्रमोशन झाल्याने तुला माझी कसलीच काळजी वाटत नव्हती. मला कमजोर समजत होती. ती काही तुझी चूक नव्हती. मीच स्वतःला स्वस्त करून घेतलं होतं, हे नंतर लक्षात आलं होतं. तुझ्यात नार्सिसिस्टचे भूतही संचारले होते. सुरुवातीला होती, तशी तू साधी-भोळी राहिली नव्हती. वेगळ्या तालात तुझे वागणे डोलत होते.

सुरुवातीला निर्मळ, निरागसता दाखवून तू मला हळूहळू कंट्रोल केले होते. माझे विचार आणि भावनांवर ताबा मिळविला होता. मी माझी ओळख विसरलो होतो. सुरुवातीला तू प्रेमाचं नाटक केलं आणि फायदा करून घेतला. नंतर मलाच वेड्यात काढून मानसिकदृष्ट्या कमकुवत बनवलं. जस-जसे तुझे प्रमोशन होत गेले, तस-तशी तू कधीच स्वतःची चूक मान्य केली नव्हती. माझे

म्हणणे खोटे ठरवीत होती. तुझ्या यशाने तो नार्सिसिस्टपणा तुझ्यात आला होता की, खरंच तुझा तो स्वभाव होता, हे कळत नव्हतं.

तुला सांगतो, नार्सिसिस्ट म्हणजे? ती एक मानसिकता आहे. एखादी व्यक्ती स्वतःबद्दल खूपच जास्त विचार करते. स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजते आणि सतत इतरांकडून कौतुक, लक्ष आणि मान्यता, याची अपेक्षा करते. माझ्याकडून ते तुला शक्य वाटत नव्हतं. कारण मी खरं ते बोलणारा होतो. नंतर त्याचा तुला तिटकारा आला होता. त्यामुळे तुझे लक्ष आपल्या टीममधील सदस्यांकडे वळले होते. 'नार्सिसिस्ट व्यक्ती स्वतःभोवतीच जग फिरतं असं मानते आणि इतरांचा वापर आपल्या गरजांसाठी करते.' असे काहीसे तुझे झाले होते. तुझा इगो राखत नसल्याने तुला इतर जण जवळचे वाटायचे.

तू स्वतःचं महत्त्व खूप वाढवून दाखवत होती. नेहमी स्वतःचं 'बरोबर' असल्याचं मानायची आणि इतरांच्या भावना समजून घेण्यात कमी पडायची. तुला टीका सहन व्हायची नाही. लगेच डोळे लाल व्हायचे. लोकांना आपल्या फायद्यासाठी योग्य पद्धतीने हाताळायची. त्यावेळी तुझे वेगळेच रूप मी पाहायचो. पहिले पहिले तर तू माझं फार कौतुक करायची. मेसेज पाठवायची. भेटवस्तू द्यायची. त्यावेळी मी ते तुझं माझ्यावरील प्रेम समजलो होतो; पण ते खरं प्रेम नव्हतं, तर जाळ्यात अडकवण्याचा एक भाग होता. हे नंतर लक्षात यायला लागलं होतं. मग मीच माझा सावरत जाण्याचा प्रयत्न करीत होतो. कारण तुला काही आठवण करून दिली तर, 'मी असं कधीच बोलली नाही. तुम्हीच जास्त विचार करता' असं बोलून माझ्यावर तुझ्या चुका ढकलत होती.

हळूहळू मलाच शंकेच्या सिंहासमोर उभे करायची. मग मी काही बोलत नव्हतो; पण तुझा खोटारडेपणा ओळखून होतो आणि त्यावर इलाज शोधत होतो.

तुला समजून घेतांना मी दुखावला तरी माझ्या भावनांकडे दुर्लक्ष करायची. माझा इगो हर्ट केल्यानंतर माझा उतरलेला चेहरा पाहून तुझ्यात काही फरक पडलेला दिसत नव्हता. तू फक्त कामाशी मतलब ठेवायची. मीच मूर्ख की, तुझ्या बदलण्याची वाट पाहायचो. मी नाराज दिसलो किंवा शांत असलो, तर तू म्हणायची, 'तुम्हाला माझी काही काळजी वाटत नाही.' असे गिल्ट फील करायची आणि भीती, नाहीतर दयेची अपेक्षा करून तुझ्या मनासारखं वापरून घ्यायची. कधी कधी खूप जवळ येत होती, तर कधी अचानक दूर जात होती. त्यामुळे मी गोंधळून जात होतो आणि तुझ्या सांगण्याप्रमाणे वागत होतो.

तुझे हे खेळ म्हणजे toxic relationship वाटू लागली, तेव्हा मी शिकलो आणि काय केले ते सांगतो, जेव्हा मला तुझ्यासोबत अस्वस्थ वाटू लागलं, तेव्हा तुझ्या मान्यतेची अपेक्षा सोडून दिली. स्वतःमध्ये समतोल राखला. कारण तू कधी तुझी गरज दाखविली नव्हती; म्हणून आपले भावनिक नाते तयार होऊ शकले नव्हते, मला मात्र कोरडेपणा नको होता. त्यामुळे मलाही तुझी गरज नाही, हे मी मनाशी ठरवून टाकले होते. हळूहळू स्वतःला स्पष्टपणे समजून घेत होतो आणि चुकीचा पॅटर्न्स बदलवत होतो. स्वतःला ओळखत होतो. 'लोकांना खुश करण्याचा प्रयत्न करतोस? नको असताना 'हो' म्हणतोस? कोणाच्या मान्यतेवर अवलंबून असतोस?', अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढली. त्यामुळे तुझ्याशी असलेली नाळ तुटत गेली. तुला नकार

देण्याचा सराव करून स्वतःवर फोकस केला. आता तूच अंतर्मुख हो आणि सांग. पाणी कुठे मुरले?----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३५-

प्रिय फ्रेशर

तू खानदानी आणि शीलवान होती, याची खात्री मला पटलेलीच होती. तुझ्यासारखीच तरुणी मला हवी होती; म्हणून तुला पटवण्याचे आटोकाट प्रयत्न करत होतो. तू मेट्रो सिटीत आल्यापासून तुझा गावठीपणा सोडून एकदम बोल्ड आणि मोकळी झाली होती. उत्तर आधुनिक तरुणीसारखी स्त्री-पुरुष संबंधावर बोलायची, चर्चा करायची. तुझ्या त्या मोकळेपणामुळे माझा गैरसमज झाला होता. तू पटली असल्याचे मी समजून चाललो होतो; पण कामभावनेविषयी तुझा प्रतिसाद नसायचा. चेहरा उतरवून खाली मान घालायची. मी कोड्यात पडायचो की, 'एवढी मोकळेपणे चर्चा करते आणि आपल्यासंबंधाबाबत विषय निघाली की, मौन का पाळते?' तरीही तू मित्र मानल्याने तुझी कंट्रोल पावर ओळखून तुला विचारले होते, 'मैत्रीची शपथ घेऊन सांग, 'स्पर्श केल्याने तुझ्या शरीरात काही बदल होतो का? कामोत्तेजना होते का?' तर तू स्पष्ट नाही म्हणाली होती. मला तर आश्चर्य वाटलं होतं, 'बाप रे !, म्हणजे तू निसर्गाला किती कुलूपबंद करून ठेवलं आहे? एकदम दगडाच्या मूर्तीसारखी अचेतन आहे तू?' असं विचारलं, तर 'मेडिटेशन करते सर, कोणताही पुरुष माझ्यासमोर एक मिनिटही टिकणार नाही.' असं उत्तर तू दिलं होतं. त्याच वेळी मी काय समजायचो ते समजून घ्यायला हवं होतं; पण माझे प्रणयचाळे तू स्वीकारायची की, गरजेपोटी सहन करायची?, हे मला काही कळलेच नव्हते. तू सोडून गेली, तेव्हा तुझे सारे नाटकं डोळ्यासमोर येत गेले.

मी माझ्याच धुंदीत तुला गृहीत धरून चालत होतो आणि तू तुझे काम काढून घेत होती. स्वतःच्या फायद्यासाठी शरीराचं प्रदर्शन करून मोहीत करत होती, हे नंतर लक्षात आलं होतं. तुला लाइफ पार्टनर बनविण्याचे स्वप्न काचेसारखे तडकत होते; म्हणून तुला न दुखावता तू जशी आहे, तशीच ठेवून तुझ्यापासून दूर होण्याचा विचार केला होता. कदाचित मी तुला समजून घेण्यात कमी पडलो असेल. कारण प्रत्येक व्यक्ती ज्याच्या-त्याच्या ठिकाणी ठीकच असते. आपण आपल्या पद्धतीने तिला तोलून पाहतो, ही आपली चूक असते. तू तुझ्या ठिकाणी बरोबर असल्याने ती चूक माझ्याकडूनही झाली होती, हे तुझ्यातील अचेतन मूर्तीचा साक्षात्कार झाल्यानंतर माझी पूर्ण खात्री पटली आणि तुला संपूर्ण स्वातंत्र्य देऊन तुझा सन्मान केला.

पण तुला सांगतो, तुझ्याकडे पाहून असं वाटायचं की, अपुरी झोप आणि थकवा यांचाही परिणाम आरोग्यावर होतो. नात्यातील भांडण, दुर्लक्ष किंवा ताण असेल, तर कामभावना कमी होऊ शकते, हे समजून तुझ्यात थंडापणा असावा, असे वाटायचे आणि मी तुला अधिक खुलवण्याचा प्रयत्न करायचो. विश्वास, सुरक्षितता आणि जवळीकता याचा अनुभव देऊन तुझी इच्छा अजमावून पहायचो. त्यावेळी 'स्त्री-पुरुषांच्या नात्यातील आकर्षण, प्रेम आणि कामभावना यांचा अभ्यास करतांना हेलन फिशर यांनी मांडलेले विचार मी समजून घेतले होते. त्यांच्या मते 'मानवी नातेसंबंध हे एका भावनेवर आधारलेले नसतात, तर तीन वेगवेगळ्या; पण परस्पर जोडलेल्या मानसिक प्रणालींवर उभे असतात. कामभावना, आकर्षण आणि दीर्घकालीन जिव्हाळा. या तिन्ही घटकांचा समतोल कसा राखला जातो, यावर नात्याची गुणवत्ता आणि टिकाऊपणा

अवलंबून असतो.' हे लक्षात घेतले, तर आपल्यातील ते तिन्ही घटक वेळ संपताच तू पुसून टाकले होते. त्यामुळे आपल्या नात्याचा नामकरण विधी होण्याच्या आधीच, तू अनौरस संबंध समजून सोडून दिले होते. मी फक्त सहवास टाळायचे म्हटले होते. तेच शब्द पकडून तू संबंधच टाळले. का म्हणून ? हेसुद्धा तुला विचारण्यासारखं मला वाटले नव्हते. मग यात दोष कोणाचा? तुझा की माझा? की दोघांच्या ठिकाणी असलेल्या अहंकाराचा?; पण एकमेकांचे दोष शोधण्यापेक्षा आत्मचिंतन अधिक महत्त्वाचे असते.

तुला स्त्री-पुरुष यांच्या बाबतीत सांगतो, 'नात्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात आकर्षण अत्यंत तीव्र असते. एखाद्या व्यक्तीकडे विशेष ओढ निर्माण होते, तिच्याबद्दल सतत विचार येतात, तिच्यासोबत वेळ घालवण्याची तीव्र इच्छा निर्माण होते. या अवस्थेत मनात उत्साह, आनंद आणि थोडी अस्थिरतादेखील जाणवते. ही अवस्था नवीनतेवर आधारलेली असते. प्रत्येक भेट, प्रत्येक संवाद वेगळा आणि आनंददायी वाटतो. मेंदूमध्ये आनंद निर्माण करणारी रासायनिक प्रक्रिया सक्रिय होते आणि त्यामुळे त्या व्यक्तीकडे ओढ अधिक वाढते.' ही एक मनोरचना असल्याने माझे मन तसेच बनले होते; पण तू कधी त्या मनाचा विचार करतांना मला जाणवले नव्हते. कदाचित तू माझा तसा विचार केलाही असेल; पण तू स्वतःला चारित्र्यवान समजून माझ्या मनाशी काही घेणे-देणे नसल्याचा विचार करत गेली असेल. तो तुझा प्रश्न होता. त्याचे उत्तर तू तुझ्यापरीने दिले, तेही ठीकच झाले. खरं-खोटं काय ते तू समजून घेशील

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३६ -

प्रिय फ्रेशर

तुझ्या वागण्याचे तंत्र माझ्या समजण्याच्या पलीकडचे होते. तरीही अंधारात दगड मारावा, तसे तुला विचारले होते, 'म्हणजे आपली फिझीकल attachamet होऊ शकणार नाही.?' तेव्हा तू म्हणाली होती, 'मला आधी या प्रोजेक्टमधून मोकळं होऊ द्या. मग सांगते तुम्हाला...' असं म्हणून तू वेळ टाळून द्यायची आणि मी आशेवर बसायचो. आपला तो प्रोजेक्ट पूर्ण झाला की, तुझे मॅनेजर म्हणून प्रमोशन होणार होते. त्यासाठी तू सोबत राहून धडपडत होती. चिखलातील कमळासारखी घाणीतही स्वच्छ राहत होती. मी किंवा टीमचे सदस्य तुझ्यावर कळत-नकळत चिखल फेक करीत होतो; पण तू अंगाला लागू देत नव्हती. तुला सोबत राहण्याचं आणि त्या गोष्टीबाबत विरण्याचं धाडस म्हणजे, मी त्या चिखलाचा एक भाग होता, हे मूर्खपणाचे लक्षण मला माझ्यातही दिसून आले होते; पण त्यावर काही इलाज सापडत नव्हता. जो सापडला तो आपल्यात दरी निर्माण करणारा ठरला. त्याचा तुझ्यावर काही परिणाम नाही झाला. हेही तुझ्या लक्षात आणून द्यावंसं वाटलं. त्यामुळे या पत्रांमधून बऱ्याच गोष्टी सांगितल्या.

तू मात्र एक गोष्ट लक्षात घे, माणूस जितका कोणतीही गोष्ट कायम स्वरूपी काळजात किंवा मनात कोरून ठेवतो ना तितका त्याला त्रास होतो. आयुष्यात अनेक गोष्टींची अदलाबदल करून माणसाने प्रवाही बनलं पाहिजे; पण तसं होत नाही फारसं. चांगलं काय आणि वाईट काय? हे आपल्याला बऱ्याचदा ठरविता येत नाही. ठरविले तर त्यात स्वतःचा कल कमी आणि इतर

गोष्टींचा आपल्यावरील प्रभाव अधिक असतो. आपण जे काही डोळे बंद करून योग्य-अयोग्य, चांगलं-वाईट मानतो, त्याची पायाभूत कारणं काय आहेत? याचा विचार तो करतो का कधी? आपली नैतिकता, आपली मूल्ये, आपले सत्य-असत्याचे मापदंड, हे मोठ्या कटाचा भाग आहेत आणि शतकानुशतकं तो कट स्वतः स्वीकारलेला आहे. फ्रेडरिक नीत्शे यांचे 'चांगलं आणि वाईट'(Beyond Good and Evil) नावाचे पुस्तक वाचले की, ते जाणवतं आणि आपलं खरं रूप कळतं.

'मुक्त आत्मा असलेला माणूस स्वतः विचार करतो, समाजाच्या नियमांना प्रश्न विचारतो आणि एकटा चालायला तयार असतो. धर्म हा भीती आणि कमजोरीतून तयार झाल्याने आपण शक्ती दाखविली की, वाईट समजले जाते. उलट नम्रता चांगली, असं शिकवलं जातं, त्यामुळे आतली शक्ती दडपली जाते आणि माणूस कमकुवत बनतो. एक मालक आणि एक गुलाम, हे दोन माणसंच आहेत; पण त्यांच्या नैतिकतेचे अर्थ सारखे दिसत नाही. मालक नैतिकता म्हणजे शक्ती व अभिमान असते. याउलट गुलाम नैतिकता म्हणजे नम्रता व दया समजली जाते. असे वेगवेगळे मापदंड असल्याने गुलाम नैतिकता अधिक विचारात घेतली जाते. म्हणजे आपण आपली आतली शक्ती दाखवणं कोणाला आवडत नाही. विशेषतः स्त्रीच्या बाबतीत गुलाम नैतिकता अधिक दिसते. तू तरी तुझ्यात शक्ती असूनही दाखवू शकते का? आधी कुटुंब, नंतर धर्म व समाजाचा विचार करते आणि आपण नैसर्गिक शक्तीचा वापर करायचा की नाही, हे ठरवते.

महान व्यक्ती स्वतःवर विश्वास ठेवते. त्याला इतरांच्या मान्यतेची गरज नसते. तो संघर्ष स्वीकारतो आणि स्वतःचे नियम बनवतो, अशी माणसे फार दुर्मिळ असतात. बाकी सारेच मेंढरं दिसून येतात. कारण 'कोणी काही म्हणेल का?' हा प्रश्न डोक्यात घेऊन ते चालत असतात. त्यामुळे कधी भीती, तर कधी आळस त्यांच्या ठिकाणी ठासून भरलेला असतो. कारण त्यांना वेगळे विचार करण्याचे स्वातंत्र्य कोणी दिलेले नसते. नीत्शे काय सांगतो बघ, 'मेंढरू बनू नको. स्वतःचे विचार कर. तुझं जीवन तूच घडव.' माणसं मात्र जगत असतात. सुधारण्यासाठी शक्तीचा उपयोग करत नाहीत; म्हणून काही बदलत नाही. जे बदलतं ते बऱ्याचदा ताणदायक वाटतं. शेवटी जे आहे, ते असं आहे. मला जे पटलं, ते तुला सांगितलं. त्यातून काय घायचं आणि काय टाकून द्यायचं, हा तुझा प्रश्न आहे. नैतिक-अनैतिक झूठ आहे. माणूस तेवढं सच्चा आहे. मात्र त्याला माणूस म्हणून चांगल्या-वाईट भ्रमाच्या भोपळ्यात व भाकड कल्पनांमध्ये अडकवून ठेवलेला आहे. त्यातून तुला बाहेर पडायचे की त्यातच घुसमटून राहायचे? हा तुझा प्रश्न आहे.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३७-

प्रिय फ्रेशर

तुला सांगतो, 'नवा माईंडसेट' खूप प्रभावी असतो; पण त्यात काही गोष्टी संतुलितपणे समजून घेतल्या, तरच तो खऱ्या आयुष्यात उपयोगी पडतो. तुझ्या बॉडी लँग्वेजमधून तुझा आत्मविश्वास दिसला पाहिजे. चार चौघात तुझी उपस्थिती जाणवली पाहिजे. माणसाचं शरीर काय बोलतंय, हे खूप महत्त्वाचं आहे. सरळ उभं राहणं, डोळ्यांना डोळा भिडवणं, शांत हावभाव, यामुळे तो मजबूत आणि स्थिर दिसतो. नेहमी बोलणं गरजेचं नसतं. शांत राहणं हीसुद्धा एक ताकद असते. खूप वेळा शांत राहिलं, तर लोक तुमचं निरीक्षण करतात आणि तुमची किंमत वाढते. जेव्हा बोलाल तेव्हा मुद्याचं आणि स्पष्ट बोललं पाहिजे. अनावश्यक बोलणं टाळावं. कमी बोललं तर शब्दांना वजन येतं. अशाही बायका कमीच बोलतात; पण त्यांच्या बोलण्यात वजन असतेच असे नाही. तर भय अधिक दडलेले असते. राग, दुःख, आनंद, या भावना मात्र नियंत्रणात ठेवतात. त्यांचे भावनांवर नियंत्रण असल्याने त्या कोणत्याही परिस्थितीत मजबूत राहतात; म्हणून कदाचित 'नारी शक्ती' तीच असावी. त्या कोणत्याही गोष्टीवर लगेच प्रतिक्रिया देत नाही. काही अपवाद म्हण किंवा अहंकारी म्हण, विचार न करता लगेच प्रतिक्रिया देतात. त्यामुळे त्या परिपक्व वाटत नाहीत.

बायका सगळं काही सगळ्यांना सांगण्याची गरज दाखवत नाहीत. स्वतःबद्दल गुपित ठेवतात आणि माणसामध्ये कुतूहल निर्माण करतात. त्यामुळे रहस्यमय वाटतात. त्या नेहमीच उपलब्ध राहत नाहीत. कधी-कधी दूर राहतात

आणि रहस्यमय बनतात. त्यामळे त्यांची किंमत कळते. मात्र निर्णय आणि बोलणं अधिक योग्य आणि प्रभावी होण्यासाठी त्या आत्मविश्वासाने पुढे येत नाही. धैर्य राखत नाही आणि स्वतःवर काम करत नाही. त्यासाठी आजही त्यांना सोबत पुरुष हवा असतो. तेव्हा तू यश मिळविण्यासाठी रोज स्वतःमध्ये सुधारणा करत जा. तीच खरी ताकद आहे. कमजोरी पूर्णपणे लपवण्यापेक्षा ती ओळखून सुधरण्यावर लक्ष दे . फक्त 'मजबूत दिसणं' पुरेसं नाही, खरोखर मजबूत होणं महत्त्वाचं आहे. प्रत्येकाला आपले प्लॅन्स किंवा विचार सांगणं गरजेचं नसतं. त्यासाठी योग्य लोकांची निवड करून शेअर करत जा.

तू कुठली, मी कुठला जॉबच्या निमित्ताने आपला संयोग घडला. तू क्रेडिड कार्डसारखा माझा वापर केला. मात्र मुदतीत पुरेसा बॅलन्स नाही ठेवला. तुझ्याकडे ओव्हर ड्यू झाला. नंतर तू खातेच बंद केले आणि माझ्या बँकेला बुडीत काढून पलायन केले. जसे, फुकटात कामं झाले की, फार आनंद होतो; परंतु कृतज्ञता कायम राखली जात नाही. 'काम सरो आणि वैद मरो', अशी स्वार्थी मानसिकता ठेवून स्वतःच्या अभिमानाचे ॲटिट्यूट दाखविले जातात. उपकार कर्त्याचा इगो हर्ट केला जातो. काम होईपर्यंत फार नम्रता व आदर दाखवला जातो. मग अचानक असा बदल का होतो? तर लोकं फार मतलबी असतात. कॉमन सेन्सही बाळगत नाहीत. ते इगो दाखवतात; पण ज्याच्यामुळे आपला इगो वाढला, त्यालाच तो दाखविला तर, याला काय म्हणायचे? माणसांची दुनियाच अशी असते, शिकूनही अडण्यासारखी राहते.

तुझ्या अशा वागण्यामुळेच जगातील सारे विचारवंत गोळा करून खऱ्या- खोट्याचा न्याय-निवडा करण्यासाठी मी हा सारा खटाटोप केलेला

आहे. तू नेहमी म्हणायची की, 'मला नाही वाटत की, माझ्याइतकं कोणी पॉझिटिव्ह असेल म्हणून.' तुझी सकारात्मकता तुझ्यासाठी लखलाभ होती. त्या सकारात्मकतेत असलेला नकाराचा काटा माझ्या दिल आणि दिमागला इतका टुचायचा की, काळजाला रक्तबंबाळ करून जायचा. मात्र त्याचे ओघळ तू कधी पाहिलेच नव्हते. त्यामुळे सारे व्यर्थ वाटू लागले होते, असे असतांना 'जगणे तर संपत नसते आणि संपवायचेही नसते. त्या जगण्याला पॉलीस मारून पुन्हा चकचकीत करायचे असते.' तोच पुरुषार्थ मानून तुझा विचार आणि नाद सोडून मी माझ्याच नादी लागलो होतो.

'कोणीही कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो. आपल्या वागणुकीनुसार नाती तयार होतात.', असे चाणक्य नीती सांगते. 'आपण कोण होतो? कोणीच नव्हतो. होतो फक्त स्त्री-पुरुष.' नातेसंबंध हे केवळ नावापुरते असतात. जैविकता किंवा नैसर्गिकता महत्त्वाची असते. याचा विसर पडल्याने आपल्या नात्याला सहजतेचा अर्थ देता आला नाही. याचे काही दुःखही नाही. वाईट या गोष्टीचे वाटते की, कोणत्याही नात्याची माणसे वापरुन घेतात आणि सोडून देतात, ते असे का करतात? चाणक्य म्हणतात की, 'आयुष्यात योग्य जोडीदार निवडणे खूप महत्त्वाचे आहे. फक्त सौंदर्य किंवा बाह्य गोष्टी न पाहता स्वभाव, संस्कार आणि विचार महत्त्वाचे आहेत.' मी तुझ्या सौंदर्यावर नाही, तर स्वभाव आणि विचारांवर भाळलो होतो; म्हणून तुला अनेकदा सांगितले होते, 'तू सुंदर नाही; पण गोड आहेस.'; म्हणून आवडते. त्यावर तुझी काही प्रतिक्रिया नसायची. कदाचित लोकांना खोट्या स्तुतीची हाव असते, तशी तुलाही असेल. मला

इतरांसारखे स्तुती करणे जमलेच नव्हते. आजच्या काळात तो दोषही असू शकतो.-----

असो. आज एवढंच. तू कंटाळली असेल. इथे थांबतो आणि तुझ्या उत्तराची अपेक्षा न करता, मी माझ्या कामाला लागतो. बाकी काही वाईट वाटलं असेल, तर सोडून दे आणि चांगलं तेवढं घे. म्हणजे तुला राग येणार नाही की ताणही येणार नाही. दुनिया अशीच असते. आपलेच म्हणणे रेटून नेते. तेव्हा आपण ते सगळंच वेचून घ्यायचं नसतं. एवढं लक्षात ठेवलं, तरी पुरे झालं. ----

-

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

३८-

प्रिय फ्रेशर

एवढे पत्र लिहिण्याचं कारण एकच की, तू समजून घेशील आणि जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहशील, अशी अपेक्षा करायाल हरकत नाही. कारण अजूनही थोडीफार जागा तुझ्यासाठी राखून ठेवलेली आहे. ती काही एकाएकी पुसली जाणार नाही; म्हणून नातेसंबंध कसे असतात, कसे असावे आणि व्यक्तीने काय करावे, याचे उत्तर ओशोच्या भाषेत सांगितल्याशिवाय मला चैन पडणार नाही; म्हणून जरा सकारात्मक भावनेने समजून घेशील, नाहीतर त्या महान दार्शनिकाचे म्हणणेही हलक्यात घेशील. दुनिया समजून घेत नाही; म्हणून फसते आणि दुःख उगाळत बसते. तसे व्हायला नको; म्हणून हे पत्रे लिहिली आहेत. त्याची उत्तरे दे अगर नको देऊ. वाचून तरी समजून घेशील. जगणं काय असतं ते.

डोळे मिटून स्वतःला एक प्रश्न विचारला की, अनेकदा आपल्या आयुष्याचं खरं चित्र समोर येतं. 'आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करतो, त्या व्यक्तीसाठी आपण खरंच तितकेच महत्त्वाचे आहोत का?' अनेक वेळा याचं उत्तर मनाला दुखावणारं असतं; पण तेच सत्य असतं. एकतर्फी नात्यात माणूस नेहमी देतच राहतो. तो प्रत्येक वेळी आधी पुढे येतो, चूक नसतांनाही माफी मागतो. समोरच्याच्या शांततेलाही स्वतःची चूक समजतो. अशा नात्यात तो स्वतःच्या भावना, गरजा आणि आनंद बाजूला ठेवून फक्त सोबतच्या व्यक्तीच्या आनंदासाठी जगत राहतो; पण दुसऱ्या बाजूला सोबतची व्यक्ती त्याच्या भावना ओळखत नाही. त्याच्या उपस्थितीची कदर करत नाही आणि त्याच्या

अनुपस्थितीचंही दुःख करत नाही, अशी व्यक्ती अनेक बहाणे करते आणि आपल्याला वाटते की, 'तो व्यस्त आहे, त्याचा स्वभाव तसाच आहे, तो प्रेम व्यक्त करू शकत नाही, कधीतरी सगळं बदलून जाईल.'; असे लालची व मूर्ख माणसाला वाटते. मी मूर्ख ठरलो होतो. 'खरं म्हणजे, जिथे आपली किंमत असते, तिथे वेळ आपोआप मिळतो आणि जिथे आपली किंमत नसते, तिथे कितीही वेळ असला, तरी आपल्यासाठी जागा नसते.' हे तू मला तुझ्या वागण्यातून सिद्ध करून दिलेले आहे.

एकतर्फी नातं म्हणजे एक हाताने टाळी वाजवण्यासारखं आहे. आपण कितीही प्रयत्न केला, तरी आवाज येत नाही. अशा नात्यात राहून माणूस हळूहळू स्वतःला हरवू लागतो. त्याचा आत्मसन्मान कमी होतो, त्याचा आत्मविश्वास ढासळतो आणि तो आतून रिकामा होऊ लागतो. आत्मसन्मान गमावून मिळालेलं प्रेम कधीच खरं प्रेम नसतं. प्रेम ही अशी जागा असते, जिथे आपल्याला स्वतःची किंमत सिद्ध करावी लागत नाही, जिथे आपलं अस्तित्त्वच पुरेसं असतं. जर एखाद्या नात्यात आपल्याला वारंवार स्वतःचं महत्त्व सांगावं लागत असेल, तर ते नातं योग्य नसतं; म्हणूनच प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवं, 'हे नातं मला आनंद देतं का, की मला थकवतं? मी या नात्यात फुलतो आहे का, की कोमेजतो आहे? जर उत्तर नकारात्मक असेल, तर त्या सत्याला स्वीकारणं आवश्यक आहे. कारण सत्य कडू असलं, तरी ते आपल्याला योग्य मार्ग दाखवतं.' तुझ्याशी असलेलं नातं हे थकवणारंच होतं; म्हणून मी आता विश्रांती घेतली आहे. शेवटी, प्रत्येकाने स्वतःला निवडायला हवं. स्वतःच्या आनंदाला, शांतीला आणि आत्मसन्मानाला प्राधान्य द्यायला हवं. जे आपलं

आहे, ते आपल्याकडे स्वतःहून येईल आणि जे आपलं नाही, ते कितीही प्रयत्न केले, तरी आपल्याजवळ राहणार नाही. पूर्ण प्रेम मिळवण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. त्यामुळे अर्धवट नात्यांवर समाधान मानू नये. स्वतःवर प्रेम करणं आणि स्वतःची काळजी घेणं, हाच खरा जीवनाचा मार्ग आहे. हे कळून चुकल्याने मी खऱ्या जीवनाच्या मार्गावर आता उभं राहायला शिकलो आहे.Bottom of Form

आता ह्याच गोष्टी स्त्री-पुरुष नाते संबंधाला लागू केल्या, तर असं दिसतं की, पुरुष समर्पित भावनेने स्त्रीकडे पाहतो. स्त्री मात्र त्याला सामाजिक दृष्टिकोनातून पारखते; म्हणून 'नैतिकता म्हणजे गुलामी. दया म्हणजे पाप.' हे नित्सेचे तत्त्व तिच्या ठिकाणी दिसते. ती नैतिकता पाळून शेवटपर्यंत नवऱ्याची गुलामी करते आणि परपुरुषाला जवळ करणं पाप समजते. त्याला दया दाखवत नाही; पण याचा अर्थ असा नाही की, तिने वाह्यात व्हावं. एक समतोल दृष्टिकोन बाळगावा आणि स्वतः सक्षम व्हावं, असं मला म्हणायचं आहे. कारण मला वाटायचं, आपल्या टीममध्ये मीच तुझ्यासाठी योग्य आहे; पण तू योग्यतेला उपयोगितेच्या दृष्टीने पाहिले आणि माझा भ्रमाचा भोपळा फुटला. पुढे काय झाले, हे तुला माहीत आहे; पण एक कर. कोणी सांगितलं, काही पटवलं किंवा मनाला वाटलं, तर तिकडे दुर्लक्ष कर. कारण तो एक गोंधळ असतो. त्यात हरवून जाऊ नको. आपल्या आत एक विश्व असते. त्याच्या तळातून येणारा आवाज ऐक आणि पुढे चालत राहा. कारण आपण स्वतःला समजतो. तसे आपण नसतो. -----

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

३९-

प्रिय फ्रेशर

तुला खूप काही सांगून झालं आहे. मला जे जे वाटलं, ते ते भडाभडा ओकून टाकलेलं आहे; पण ते पोटात साचलेलं जहर होतं, असं समजू नको. नैसर्गिक जगण्याचा अमृताचा जो हंडा भरलेला सापडला होता, तोच तुझ्या डोक्यातल्या कळशीत थोडाफार ओतला. आता तू म्हणशील, 'हे काय नवीन आहे?' नवीन काही नाही. जे जुनं ते सोनं, तुला इथे दाखवलं आहे. म्हणजे माणसाने कसं जगायचं, हे सांगणारा मी काही फार मोठा विचारवंत नाही. मला जे कळलं ते मी तुला सांगितलं. जगात जे काही दार्शनिक, विचारवंत आणि मानसतज्ञ होते, त्यांना खऱ्या जीवनाचे सूत्र सापडले होते, ते तुला सांगितले. त्यांच्याविषयी तुला थोडीफार जिज्ञासा वाटली, तर गुगलबाबाला भेट आणि सविस्तर माहिती मिळवून घे. त्यातून जगण्याला काही दिशा देता आली तर बग. त्यासाठी त्यांची नावे तुला सांगतो. ओशो, सिग्मण्ड फ्राईड, अल्बर्ट कामू, मार्कस ओरीलीयंस, शोपेनहावर, बुद्ध, विवेकानंद, अरिस्टिपस, निकोलो मॅक्यावेली, जॉर्ज गुर्जिएफ, जॉन बोल्बी, एमिल दुर्खीम, एस्थर पेरेल, हेलन फिशर, चाणक्य आणि फ्रेडरिक नीत्शे, असे किती तरी नावे तुला सांगतो. वेळ मिळाला, तर विकीपिडीयावर त्यांची माहिती मिळवशील.

मोबाईल केवळ टाईमपास करणारे, मनोरंजन करणारे साधन नाही. त्यात माहितीचाही खजाना भरपूर आहे. त्यातील हिरे-मोती वेचून घे आणि समृद्ध हो. आपण एखाद्या नवीन ठिकाणी जातांना वाट चुकू नये; म्हणून कोणाला तरी रस्ता विचारतो आणि त्याने सांगितलेल्या दिशेने जातो, तेव्हा हव्या त्या ठिकाणी

पोहचतो. मला ज्या दिशेने जायचे होते, ते मार्ग या थोर विचारवंतांकडून कळले. आता तुला कुठे? कसे जायचे?, ते तू ठरव. ही लोकशाही आहे. कोणी काही कोणाला जबरदस्ती करू शकत नाही.

खरं तर आपण नोकरीनिमित्त जुळलो होतो काही काळ. माणसं माणसांशी जुळतात. त्यांच्या जोड्या आणि त्यांचे स्वभाव पाहिले तर काय दिसतं बघ. स्वार्थी आणि नि:स्वार्थी यांची जोडी जमली तर स्वार्थी व्यक्ती नि:स्वार्थीचा फायदा घेते. त्याला 'येडा बनून पेढा खाणे' किंवा 'मुंगी होऊन साखर खाणे' अशा काही म्हणी वापरतात. स्वार्थीला फक्त घेणे माहित असते. त्याच्यात देण्याची दानत नसते. नि:स्वार्थी देऊन-देऊन रिक्त तर होतोच, थकूनही जातो. अशा जोडीत एक तर संघर्ष आणि ब्रेकअप होतो. 'स्वार्थी आणि स्वार्थी', ही जोडी 'गिव्ह आणि टेक'चे सूत्र पाळते. त्यांचे संबंध तात्पुरते असू शकतात. त्यात समतोल नसला, तर मध्यम संघर्ष होतो. त्यांचे व्यवहार थांबतात. ते एकमेकांपासून दूर होतात. 'नि:स्वार्थी आणि नि:स्वार्थी' ही जोडी खास असते. ती समर्पणाच्या भावनेने एकमेकांशी जुळलेले असतात. एकाला ठेच लागली की, दुसऱ्याच्या डोळ्यात पाणी येतं. एक उपाशी असला की, दुसऱ्याच्या घशाखाली अन्न उतरत नाही. एकाचा प्रश्न तो दुसऱ्याचाही होतो. दोघेही निर्माण होणारे प्रश्न किंवा समस्या सोडविण्यासाठी समान प्रयत्न करतात. दोघेही एकमेकांसाठी जगतात आणि आयुष्याचं सोनं करतात. कोणीच कोणापासून दुखी नसतं, असं नातं फार दुर्मिळ असतं आणि ते निर्माण होण्यासाठी खूप नशीब लागतं. तेथे नाटक करावं लागत नाही. जे घडतं, ते सहज असतं. अशा सहज नात्याला कधीच कोणी विसरत नसतं. इतिहासात त्याची

नोंद होते आणि त्या नात्याची शपथ घेऊन पुढील पिढी आदर्शाची ग्वाही देत राहते.

आता तूच ठरव, आपली जोडी कशी होती? कोण स्वार्थी आणि कोण कसा होता ते. कोणत्याही गोष्टीची हाव बाळगणे आणि आपल्या युक्तीप्रमाणे हवी ती गोष्ट किंवा गरज पूर्ण करून घेणे. त्या बदल्यात समोरच्याला काही न देणे, हा स्वार्थ असतो. तो पैसा आणि श्रम याबाबत गणला जातो. मात्र वासनेच्या बाबतीत स्वार्थ मानला जात नाही. तो दोघांचा अध्यात्मिक अनुभव असतो. त्यामुळे त्यांचे नातेसंबंध प्रेमाच्या अथांग सागरासारखे असते; पण त्याचे अर्थ तू कधी समजून घेतले नव्हते. पारंपरिक मानसिकतेच्या पुरात वाहून तू गटांगळ्या खात राहिली; पण स्वतःचे बाईपण जिवंत ठेवून खऱ्या अर्थाने जगू शकली नाही. मात्र तू कसे जगावे? हा सांगण्याचा अधिकार मला नाही. तो तुझा प्रश्न आहे आणि तुला सोडवायचा आहे.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

४०-

प्रिय फ्रेशर

तुझे हार्मोन्स चेक करून घे आणि मजबूती, सुख- समाधान व आनंद देणारे हार्मोन्स वाढवून कसे संतुलित ठेवता येतील, ते पाहा. त्यामुळे तुझ्या जुन्या हार्मोन्समधील जुना-पुराणा कचराही साफ होईल. शेवटी एक लक्षात घे, आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकजण इतरांना खुश ठेवण्यासाठी स्वतःला विसरतात. प्रत्येकाच्या अपेक्षा पूर्ण करतांना आपण आपल्या भावना, इच्छा आणि गरजांकडे दुर्लक्ष करतो. सुरुवातीला आपली मदत, आपले समर्पण आणि आपली उपस्थिती लोकांना आवडते; पण हळूहळू तीच गोष्ट त्यांची सवय बनते. जेव्हा एखादी गोष्ट सहज मिळते, तेव्हा तिची किंमत कमी होते, हे जीवनाचे वास्तव आहे; म्हणून पुरुषाने स्त्रीसारखे दुर्लभ व्हावे, म्हणजे त्याची किंमत तिला कळते, असे वाटू लागले आहे.

बऱ्याच वेळा पुरुष 'नाही' म्हणायला घाबरतो. त्याला वाटते की, जर आपण नकार दिला, तर ती आपल्यापासून दूर जाईल. खरे तर प्रत्येक वेळी 'हो' म्हणण्याने त्याची किंमत कमी होते. स्त्री जशी मर्यादा राखते, तशा मर्यादा त्याने ठरवल्या नाही की, तो चाकरमान्या बनतो. तेव्हा त्याने स्वतःसाठी उभे राहणे, आपले मत स्पष्टपणे मांडणे आणि गरज पडल्यास 'नाही' म्हणणे शिकले पाहिजे. स्वतःचा आदर करणे हे स्वार्थीपणाचे लक्षण नाही, तर ते आत्मसन्मानाचे प्रतीक आहे. आपला वेळ, आपली ऊर्जा आणि आपली भावना या गोष्टी मौल्यवान आहेत. त्या प्रत्येकासाठी खर्च करण्याऐवजी, ज्यांना आपली खरी कदर आहे, त्यांच्यासाठीच त्या वापरल्या पाहिजेत. त्यामुळे

नात्यांमध्येही समतोल आणि आदर टिकून राहतो, याचे भान पुरुषाने राखले पाहिजे. म्हणजे त्याने स्त्रीचा आरसा व्हावं, जशी ती तसा तो. मिरर ट्रिकप्रमाणे, असा पुरुष होण्यासाठी मी बऱ्याच गोष्टी ऐकून स्वतःला स्वतःहून पारखत गेलो होतो.

'जीवनात काही वेळा अंतर ठेवणेही आवश्यक असते. हे अंतर इतरांना शिक्षा देण्यासाठी नसून, स्वतःचे रक्षण करण्यासाठी असते. जेव्हा आपण स्वतःला वेळ देतो, तेव्हा आपल्याला आपली खरी ओळख पटते. आपण काय आहोत, आपल्याला काय हवे आहे, हे स्पष्ट होते आणि आत्मविश्वास वाढतो. व्यक्तिमत्त्व अधिक मजबूत बनते.' याची जाणीव होत गेल्याने मी मला माझ्यात शोधत स्वतःकडे आकर्षित झालो होतो. म्हणजे स्व-प्रतिमेचे सौंदर्य मला भावले होते; म्हणून स्वतःची काळजी घेत होतो. त्यामुळे माझे प्रसन्न रूप मला आरशात पाहायला मिळत होते. आपल्याशिवाय आपल्यावर कोणाचं प्रेम असू शकत नाही, हे अनुभवाने फार उशिरा सुचलेले शहाणपण होते; पण काही बिघडले नव्हते. वाट चुकलेलं वासरू परत गोठ्यात येतं, तसं माझं झालं आणि सुरक्षित राहिलो, नाहीतर माणसांच्या जंगलात काही खरं नव्हतं.

शेवटी तुला सांगतो, आपली किंमत आपणच ठरविली पाहिजे. दुसऱ्याने ठरविली, तर तो आपल्याला कामाचे साधन समजतो; म्हणून आपण स्वतःला कधी कमी समजायचे नाही. नाही तर लोकंही आपल्याला कमीच समजतात; पण जेव्हा आपण स्वतःचा आदर करतो, स्वतःच्या मर्यादा जपतो आणि आत्मसन्मानाने जगतो, तेव्हा लोकंही आपल्याला त्याच नजरेने पाहू लागतात; म्हणूनच सांगतो, स्वतःला विसरून इतरांसाठी जगण्याऐवजी,

स्वतःसाठीही जगायला शिक. कारण जेव्हा आपण स्वतःला महत्व देतो, तेव्हाच इतरही आपली खरी किंमत ओळखतात. त्यासाठी कोणाकडून कौतुकाची किंवा मान्यतेची अपेक्षा करू नको. लोकं तात्पुरते कौतुक करतात. तोंडावर गोड बोलतात. त्यांच्या मनात काही वेगळेच बेत असतात. आपल्यामागे दोष हुडकून चर्चा करतात, हे मी जाणून आहे, याचा अनुभव तुलाही येईलच. जस-जशी तू यशाच्या शिखरावर जाशील, तस-तसे आपलीच माणसं तुझ्याबाबत वाईट बोलू लागतील. आलाच तसा अनुभव तर सांगशील.--

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

**** **** ****

४१-

प्रिय फ्रेशर

तुला सांगू, मी इतरांना जितकं तोडू दिलं, तितका मी शक्तिमान होत गेलो. त्यांना मात्र कमजोर हरलेला तुटलेला आणि संपलेला वाटत होतो; परंतु पण त्यांना हे माहित नसतं की, माझ्यासारखे काही लोक हरत नाहीत. ते स्वतःला पुन्हा घडवतात. मीदेखील घडत गेलो. तोच माझा नवा जन्म होता. वेदनेतून, विश्वासघातातून आणि स्वतःशिवाय मला कोणी वाचवणार नाही, या जाणीवेतून तो जन्म झाला आहे. त्याचे जन्मपत्र तुझ्या नावे केले आहे.

माझ्या वाईट परिस्थितीत अनेकांनी मला टाळले होते, त्यावेळी छोट्या-मोठ्या घटना घडत असतांना मला एकटेपण जाणवत होते. मी जसा काही लावारिस आहे, अशा विचाराने एकट्यात रडूनही घेत होतो आणि मीच माझे आसू पुसत होतो. ते कोणाला दाखवण्यात काही अर्थ वाटत नव्हता. कारण आपले आसू ते इतरांचे बनतात हसू. याचा अनुभव मी घेतलेला होता. लोक आसपास असायचे. मात्र माझ्या शब्दांना किंमत नाही द्यायचे. माझ्या उपस्थितीकडे दुर्लक्ष करायचे. बाहेरून सगळं नॉर्मल दिसायचं, पण आतून एक संपूर्ण सिस्टीम कोसळत होती. सुरुवातीला स्वतःलाच समजावत होतो. लोकांना काही दोष देत नव्हतो; पण सत्य नेहमी मार्ग शोधतं, काही मार्गही मला मिळत गेले होते.

लोक बदलत नाहीत. त्यांचं वागणं पुन्हा पुन्हा तेच राहतं, ही जाणीवच मला अस्वस्थ करत होती. त्यावेळी मला निर्णय घ्यायचा होतं. सत्य

स्वीकारायचं, तर सत्य कधीच सोपं नसतं. हे जाणवलं. कारण मी चुकीच्या लोकांना संधी दिली होती. चुकीच्या ठिकाणी स्वतःला गुंतवलं होतं. जे माझ्यासाठी उभेसुद्धा राहिले नव्हते, अशा लोकांसाठी मी स्वतःला तोडलं होतं. माझा अहंकार दुखावला तेव्हा आत्मजाणीव झाली आणि तिथूनच माझ्यात परिवर्तन सुरू झालं. मी हळूहळू मागे हटायला लागलो. तोंडाला कुलूप लावले. बऱ्याच गोष्टी शेअर करणे कमी केले. प्रतिक्रिया बंद केल्या. लोकांना माझ्यातील बदल जाणवू लागला होता; पण त्यांना कारण समजत नव्हतं. मी सांगतही नव्हतो. कारण स्पष्टीकरणाने काही बदलत नाही, हे मला माहित होतं. ज्याला समजून घ्यायचं असतं. तो न बोलताही समजून घेतो आणि ज्याला समजून घ्यायचंच नसतं, त्याला हजार स्पष्टीकरणं दिली, तरी उपयोग नसतो. या विचारानेच मी स्वतःला पुन्हा घडवायला सुरुवात केली होती; पण हा प्रवास साधा नव्हता. त्यात एकटेपण होतं. लांब रात्री असतात. ओव्हरथिंकिंगमुळे रात्र फार मोठी वाटायची. मनात शंका निर्माण व्हायच्या. मीच चुकीचा असल्याचे वाटायचे. कारण आधी सगळं सोपं होतं. लोक स्वीकारायचे; पण त्या स्वीकाराची किंमत होती स्वाभिमान. आणि तोच नाही तर जगणंच काय कामाचं? हा प्रश्न पडला आणि ठरवलं की, 'नाही,आता मी मागे जाणार नाही.', हेच होतं माझ्या अबोध मनातील बीज की, ज्याने मला नवा जन्म दिला होता. तिथून खरा बदल सुरू झाला.

तुला सांगू, निर्णय घेणं सोपं असतं; परंतु त्या निर्णयावर टिकून राहणं कठीण असतं. लोकं आपल्याला पारखतात. बहुतेक लोक दूर जातात. जाणाऱ्याला जाऊ दिले. मी स्वतःला समजवले आणि थांबवले. भावना मारून

टाकल्या. कोणाला उत्तरे देण्याची गरज वाटत नव्हती. त्यामुळे एकांत,शांततेची भीती दूर पळाली. निरीक्षण करीत सत्य शोधत होतो. जो खरोखर काळजी करतो. त्याला स्पष्टीकरणाची गरज नसते आणि ज्याला काळजीच नाही. त्याच्यासमोर स्पष्टीकरण देणं म्हणजे उर्जा वाया घालवणं, कळून चुकलं होतं; म्हणून कोणाच्या मागे जाणं सोडलं. स्वतःचा चांगुलपणा सोडला. म्हणजे वाईट वागायला शिकलो असा त्याचा अर्थ नाही. तर माझी ऊर्जा पुन्हा माझ्याकडे परत घेतली. माझे लक्ष लोकांपेक्षा स्वतःवर केंद्रित केले. ध्येयं, प्राधान्यक्रम व विचारसरणी बदलली. दुसऱ्यांना न दुखावता मी माझा कोश तयार करून घेतला. तो इतरांना घातक वाटला. कोणावर अवलंबून न राहिल्याने कोणी नियंत्रित करू शकत नव्हते.

तुला आणखी सांगतो, कोण फक्त गरज असेल तेव्हाच येतं, कोण फक्त फायदा असेल तेव्हाच बोलतं, कोण फक्त उपयोग असेल तेव्हाच साथ देतं, असे काही मला लोकांचे हेतू स्पष्ट दिसू लागले होते. अशांना ओळखून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यांना सहन करण्यापेक्षा अंतर ठेवून शांतपणे मागे सरकलो. या शांततेनंच लोकांना अस्वस्थ करणारा आरसा दाखवला. जागरूक आणि स्वयंपूर्ण बनून छान जगण्याची शक्ती वाढवत गेलो; पण हे बघ, सूड उगविण्यासाठी काही मी तसे केलेले नव्हते. तर शेवटी स्वतःच्या सत्यासाठी जगायचं होतं. कोणाला हरवण्यासाठी नाही की कोणाला काही सिद्ध करण्याबद्दलही नाही. केवळ स्वतःला पुन्हा मिळवण्याची ही फक्त एक गोष्ट आहे. आणि तेच तुला सांगितली आहे. तोच माझा नवा जन्म आहे. ------

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

४२-

प्रिय फ्रेशर

तुला बरीच पत्रे पाठविली; परंतु त्याचे उत्तरं दिली नाही तू. तुझे प्रमोशन झाल्यापासून दूर गेलीस तू. याबद्दल माझी काही तक्रार नाही. पूर्वी तू रोज व्हाट्सअपवर प्रेमळपणे गुडमॉर्निंग म्हणायची. तुझे स्वप्न साकार झाल्यापासून तेही विसरून गेलीस तू. त्याबद्दलही काही म्हणणे नाही माझे. आता हे आणखी उरलंसुरलं मनातलं सांगून मोकळं होण्यासाठी शेवटचं पत्र देतो आहे. तशी तर व्हॅट्सअपवर चॅटिंग करता आली असती; पण पत्राची गोष्टच वेगळी असते. तुझ्या भावना आणि विचार मी ओळखून आहे; म्हणून तुला कोणाचे मतं पटत नसले तरी सांगतो. नाही तरी लोकं आपापल्या सोईने विचार करतात. त्यामुळे ते दुसऱ्याच्या विचारांना कचऱ्यात फेकतात.

इथे बहुतेक लोक 'समाज काय म्हणेल' यानुसार जगतात. त्यापैकी तूदेखील एक वाटते, तेव्हा तुला हाईडेगर यांच्या विचारांची आठवण करून देतो. त्यांच्या मते, 'लोकांसारखे' जगणे म्हणजे स्वतःला हरवणे असते. खरे जीवन म्हणजे स्वतःच्या निवडी स्वतः करणे, स्वतःच्या मर्यादा स्वीकारणे. तसेच मृत्यूची जाणीव ठेवून अर्थपूर्ण जगणे. मृत्यू हा माणसाचा सर्वात वैयक्तिक सत्य अनुभव आहे. मृत्यू अटळ आहे, हे समजल्यावर माणूस खऱ्या अर्थाने जागा होतो आणि आयुष्य अधिक प्रामाणिकपणे जगू लागतो.' हे तर आपण चर्चा करीत असतांना आधीच तुला सांगितले होते. त्यावर तू मूग गिळून असायची. आता त्याचा प्रूफ म्हणून हाईडेगरला साक्षी बनविले आहे. काळ काय निकाल देईल ते देओ; पण एक खरे आहे, ते सांगतो.

पुरुषाच्या ठिकाणी स्त्रीविषयी आकर्षण, मोह आणि आसक्ती फार असते. त्यामुळे परस्त्रीच काय; पण त्याने पत्नीचाही अतिरिक्त मोह बाळगू नये. कारण स्त्री शेवटी एक स्वतंत्र व्यक्तीमत्व असते. तिच्या इच्छेविरुद्ध पुरुषाने त्याचे मनसुबे रचू नये. ती एक अन्यायकारक जबरदस्ती असते, याची जाणीव झाल्याने तुला शेवटी सांगावसं वाटलं. हा एक नवीन विचार आहे आणि त्याला घेऊन आयुष्याच्या शेवटी शांतपणे उरलेले क्षण घालवावे, असे मी ठरविले आहे. तुला खूप काही आयुष्य बाकी आहे. बरंच काही साध्यही करायचं आहे.

शेवटी सांगून-सांगून थकलो आता, निरोप घेतो जाता-जाता, तू पहिल्यापासूनच नकार देत होती; म्हणून मी स्वतःहून तुझ्यापासून दूर झालो, तर तुला फार आनंद वाटला. माझ्या या निर्णयाने तुला समाधान वाटले. कारण औषध किंवा उपाय न करता तुझी समस्या आपोआप दूर झाली. तुझ्या तब्येतीला पुरेसे औषध मिळाले आणि मुख्य कारण नष्ट झाल्यामुळे तुला त्रास होणे थांबले. काम काढून घ्यायचं होतं, तोपर्यंत तू केवळ झोके देत राहिली. तेव्हा 'तुझे माझ्यावर प्रेम असल्याचे मी समजून चालत होतो. त्यामुळे उत्साही होतो. नंतर लक्षात आले होते की, अति उत्साही माणसाचा इथे वापर करून घेतला जातो. नंतर त्याला कोणी विचारत नाही. तो मूर्ख म्हणून समाजही त्याच्या व्यथा समजून घेत नाही.

उत्साहाच्या भरात, ठोकरा खात, चाचपडत होतो अंधारात. तुझ्या प्रेमाचा उजेड मात्र तू माझ्यापर्यंत खऱ्या अर्थाने येऊच दिला नव्हता; पण लक्षात ठेव, मावळतीचा सूर्य मी कधी पाहणार नाही. माझ्या आयुष्याला उगवतीचा सूर्य दाखवत जाईल, वेळ संपेपर्यंत. शेवटी निसर्ग आहे हा. सूर्य मावळतो, तसा

मीही मावळत जाईल. सूर्य मात्र पुन्हा उगवेल, मी माणूस असल्याने पुन्हा उगवण्याचा निसर्गनियम मलाच काय; पण कोणालाच लागू नाही. मी जेव्हा इकडे-तिकडे पाहतो ना, तेव्हा हे सगळे भौतिकविश्व चीरस्थायी असणार. मी किंवा कोणीही स्थायीरूप नसणार, असे वाटत राहते. 'आपण नसणं' या जाणिवेणंच आयुष्य निरर्थक वाटतं. याची कल्पना काही सगळेच करू शकत नाही. सत्याला सामोरं जाणं त्यांना भयकारी वाटतं; म्हणून ते अनुत्साही व गंभीर राहून मरमर करतात.

एक सांगतो, मावळतीला असतांना अंधार पडण्याआधी एक शेवटचा श्वास घेऊन तुझं स्मरण करेल आणि सांगेल की, 'बाईची जात फार चंचल आणि भावनिक नियंत्रण करणारी असते; म्हणून मित्रांनो सांभाळून राहा. स्वतःला विसरू नका. स्वतःवर प्रेम करा आणि आकाशाला गवसणी घाला. जिचं तुमच्यावर प्रेम असेल, ती बहाणे करणार नाही, तर तुम्ही जसे आहात, तशा रुपात ती तुम्हाला स्वीकारेल आणि जी तुमचा असा स्वीकार करेल, तेव्हा समजून जायचं की, तिचं खरंच तुमच्यावर प्रेम आहे. केवळ 'कामापुरता मामा' ती बनवत नाही, हा विश्वास ठेवून तिला सांभाळा आणि तिच्यासाठी, तिच्या सुरक्षिततेसाठी प्राणाची बाजीही लावा; पण याचा अर्थ असा होत नाही की, 'जिने प्रेम केले नाही किंवा जिच्याकडून तुमच्या इच्छा व अपेक्षा पूर्ण झाल्या नाही; म्हणून तिचा द्वेष करावा किंवा तिच्यावर सूड उगवावा', असं काही करायचं नसतं. तिचा प्रेमाने निरोप घ्यावा आणि तिच्या सुख-समाधानासाठी प्रार्थना करायची की, 'ती आहे, त्या ठिकाणी आनंदी राहील.' कारण तिच्या त्या आनंदात तुमचे मन प्रसन्न असले, तरच तुम्ही स्वस्थ राहू शकता आणि

पुरुषार्थ गाजवू शकता, जर तिच्या इर्षेपोटी तिचा राग धरून तुम्ही ओव्हर थिंकिंग करत असाल, तर तुमचं तिच्यावर प्रेम नव्हतंच. फक्त तिच्या देहाची तुम्हाला भूक होती,असं समजायचं. त्या भुकेपोटी तुम्ही कुपोषित होत जाणार; म्हणून तसे न करता स्वतःवर नियंत्रण ठेवा आणि आभाळ एवढे मोठे व्हा. गरुडासारखी आकाशात उंच झेप घ्या. यातच तुमच्या आयुष्याची सार्थकता ठरलेली असेल आणि ते आपल्याच हातात असतं. त्यालाच पकडून ठेवणं, एक शहाणपण असतं. ते फार कमी तरुणांकडे असतं, तुम्ही त्यांचे भागीदार होणं शिका.

हे बघ, असा विचार करून मी माझ्यासारख्या एकतर्फी प्रेम करणाऱ्या आणि तुटलेल्या तरुणांना हा शेवटचा संदेश दिला आहे. तुला काय वाटेल, ते वाटू दे; पण तू खरंच सुखी आणि समाधानी राहा. तुझ्या सुखात जर थोडाही माझा विचार आला, तर मला टेलिपॅथी होईल आणि कळेल की, 'तुझंही माझ्यावर प्रेम होतं. मात्र या व्यवस्थेनं त्याला वाढू दिलं नाही. जाळून टाकलं. हा दोष तुझा नव्हता, तर तुझ्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या पुरुषी सत्तेचा तो दोष होता. इतर तरुणीसारखी बंड करण्याची तुझी मानसिकता नव्हती. काही तरुणींना त्यांच्या इच्छेप्रमाणे जगणे आवडते; म्हणून त्या व्यवस्थेविरुद्ध जातात. तुझी इच्छा असूनही तुला मनासारखे काही करता आले नाही. परंपरेने तुझा स्वभाव दमनकारी, शरणागत आणि परंपराप्रिय बनविला आहे. त्यात बदल करणे तुला पाप वाटत होते. त्यामुळे निर्माण होणाऱ्या तुझ्या भावना आणि वृत्ती मी जाणून घेतल्या आणि अपेक्षाभंगाच्या खोल पाण्यातून वर आलो. बुडून मरण्यापेक्षा समुद्राच्या लाटा पार करत किनाऱ्याला लागलो. याबाबत तुला काय वाटेल, ते

सांग की नको सांगू. मी तशी काही वाटही पाहणार नाही. मला फक्त तुझ्या निमित्ताने आजच्या भंगलेल्या तरुणांना जे सांगायचे होते, ते आता सर्व सांगून झाले आहे.

माणसानं ऐकणं आणि आपल्या मनासारखं जगणं', हा प्रश्न समाजाने पूर्वीपासून त्याच्या हाती राखून ठेवला आहे. त्याला कोण कसा सोडवतो, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. कारण माणसं संपतात. सांगणं बाकीच असतं. ते पुढे कोणी तरी सांगतं. हे असंच सुरु आहे. सांगणारे सांगून गेले, मीही सांगूनच जातो आहे. बाकी काही नाही. 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' हेही पूर्वजांनी सांगून ठेवले आहे. हाईडेगरच्या निमित्ताने तुला त्याची आठवण करून दिली आहे. 'मृत्यूची जाणीव असणं आणि आपल्या मनाचं ऐकणं' हेच आवश्यक आहे. बाकी समाजाचे म्हणणे आणि त्याला वाटणे, हे झूठ आणि आपले जगणे महत्त्वाचे आहे. याचा अर्थ, समाजद्रोही व्हावं, असं नाही. तर मनाचा गोंधळ होऊ न देता विवेकपूर्ण जागृत मन शाबूत ठेवणे आणि रोज नवा जन्म घेऊन आयुष्याची वाटचाल करणे. बाकी कोण काय म्हणेल, याच्याशी काही घेणे-देणे नको.

तुझा प्रोजेक्ट मॅनेजर

*** *** ***

प्रा. मनोहर सुरवाडे यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके

कव्हरवर क्लिक करताच ई पुस्तके उघडतील.

छापील पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. – संपर्क- ९९७०११७४३९